सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित
लातूर | गुरुवार, ९ जुलै २०२६ । वर्ष ४ थे अंक १२० । पाने १२ । किंमत रु. ८/- | ■ RNI No. MAHMAR/2023/86477 ■ Postal Regd No. SLP/32/2024-2026.
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प



संस्थेमध्ये कागदोपत्री व्यवहार कमीत कमी ठेवावा व चर्चेतून प्रश्न सोडवावेत. सहकाऱ्यांवर प्रचंड विश्वास ठेवावा. कुणाच्याही माघारी (मागे) त्याच्या दोषांबद्दल चर्चा करू नये. दोष ज्याचा त्याला सांगावा. गुण जनांशी सांगावे.

**– स्व. प्रल्हादपंत अभ्यंकर**
रा. स्व. संघाचे माजी महाराष्ट्र प्रांत संघचालक

## विनम्र अभिवादन



**राजमाता जिजाऊ माँसाहेब यांची आज तिथीनुसार पुण्यतिथी**

# ‘ख्रिश्चन मिशनरीज’च्या मालमत्तांची होणार चौकशी

**। सर्व खरेदी-विक्रीच्या व्यवहारांची सखोल तपासणी । बावनकुळे यांची घोषणा**



**पावसाळी अधिवेशन**

**मुंबई, ८ जुलै**

इंग्रजकालीन ख्रिश्चन मिशनरी संस्थांनी राज्यात मागे सोडलेल्या मालमत्तांची राज्यव्यापी तपासणी करून त्यांच्या मालकीहक्क, अभिलेख आणि त्यानंतर झालेल्या सर्व व्यवहारांची सर्वंकश चौकशी केली जाईल, अशी महत्त्वपूर्ण घोषणा महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज विधानसभेत केली. या चौकशीचा अहवाल पुढील तीन महिन्यांत तयार करण्यात येईल, असेही त्यांनी सभागृहाला सांगितले.

विशेष म्हणजे नागपूर शहराच्या मध्यवर्ती भागात ख्रिश्चन संस्थाकडेही खूप मोठ्या प्रमाणात जागा आहेत.

विधानसभेत सदस्य देवयानी फरांदे यांनी यासंदर्भातील लक्षवेधी सूचना मांडली होती, त्याला उत्तर देताना महसूल मंत्र्यांनी सदर घोषणा केली. यावेळी बावनकुळे म्हणाले की, राज्यातील ख्रिश्चन मिशनरी संस्थांच्या मालमत्तांबाबत महसूल अभिलेख, जमाबंदी नोंदी, मालकी हक्कातील बदल तसेच त्यानंतरच्या काळात झालेल्या सर्व खरेदी-विक्रीच्या व्यवहारांची सखोल तपासणी केली जाईल. या प्रक्रियेसाठी विभागीय आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली एक विशेष यंत्रणा कार्यरत केली जाणार आहे. या उच्चस्तरीय तपास यंत्रणेमध्ये महसूल विभाग, जमाबंदी विभाग, नोंदणी व मुद्रांक विभाग, पोलीस आणि इतर संबंधित विभागांच्या वरिष्ठ अधिकार्यांचा प्रामुख्याने समावेश केला जाईल.

नाशिक डायोसेशन ट्रस्ट आणि नाशिक डायोसेशन कौन्सिल यांच्यातील वादग्रस्त मालमत्ता प्रकरणाचा उल्लेख करत महसूल मंत्र्यांनी स्पष्ट केले की, हे प्रकरण सध्या उच्च न्यायालयात न्यायप्रविष्ट आहे. मात्र, असे असले तरी संबंधित मालमत्तांच्या मालकी नोंदी, झालेल्या व्यवहारांची कायदेशीर वैधता, धर्मादाय आयुक्त कार्यालयातील अधिकृत नोंदी तसेच इतर सर्व संबंधित तांत्रिक बाबींची स्वतंत्रपणे सखोल चौकशी करण्यात येणार आहे. अहवालाच्या आधारे शासन कायदेशीर भूमिका उच्च न्यायालयात मांडेल. ◂ (तभा वृत्तसेवा)

### महसूल नोंदीतील संभाव्य अनियमितता तपासणार



या मालमत्तांशी निगडित स्थानिक नागरिकांच्या विविध तक्रारी, काही खासगी संस्थांकडून नागरिकांना होणारा कथित त्रास आणि महसूल नोंदींमधील संभाव्य अनियमितता किंवा फेरफार यांचीही बारकाईने तपासणी केली जाईल. ही संपूर्ण चौकशी पूर्ण झाल्यानंतर जे काही निष्कर्ष समोर येतील, त्यानुसार कायदेशीर आणि प्रशासकीय कार्यवाही तातडीने केली जाईल, अशी ग्वाही महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी यावेळी दिली. ■

## शेतकऱ्याला जमीन भरपाईसाठी
# टोल नाका जप्तीचा आदेश

**चंद्रकांत लोहाणा**




जप्त करण्यात आलेला टोलनाका

**वाशीम, ८ जुलै**

शेतकऱ्याला जमिनीचा योग्य मोबदला न दिल्याने जिल्हा न्यायालयाने कठोर भूमिका घेत चक्क टोल प्लाझा जप्त करण्याचा अभूतपूर्व आदेश दिला. पक्षकाराचे वकील उदय देशमुख यांनी पत्रकार परिषदेत याबाबत माहिती दिली.

या प्रकरणात शेतकऱ्याला हक्काचे पैसे न मिळाल्याने न्यायालयाने तीव्र नाराजी व्यक्त केली. न्यायालयाच्या कठोर आदेशामुळे संबंधित टोल प्रशासनाला मोठा धक्का बसला असून, या निर्णयाची सर्वत्र जोरदार चर्चा सुरू आहे.

राष्ट्रीय महामार्ग क्र. १६१ मध्ये बेबी दिनकर गर्जे व त्यांचा मुलगा विठ्ठल दिनकर गर्जे यांची मौजे जांभरूण नावजी येथील राज्य महामार्ग ५१ वाशीम ते रिसोड लगत असलेले गट क्र. ५५, ५६, ५७ शेती जी अकृषक करण्यात आली होती. तत्कालीन भूसंपादन तथा उपविभागीय अधिकाऱ्यांनी फक्त अधिकृत केलेल्या भूखंडाचाच मोबदला दिला. हे अधिग्रहण करताना लेआऊट मधील रस्ते, खुला प्लॉट व सोयीसाठी सोडलेल्या खुल्या जागेचा भाग अधिग्रहण केला असताना त्याची नुकसानभरपाई दिली नाही. तसेच अधिग्रहण केलेल्या जमिनीचा दर हा राज्य महामार्गाला लागून असल्यामुळे शासकीय रेडीरेकनरच्या चारपट ठरवावा लागतो. मात्र, त्यांनी त्याप्रमाणे कार्यवाही केली नाही. त्यामुळे बेबी व विठ्ठल यांनी अप्पर जिल्हाधिकारी, वाशीम यांच्याकडे याचिका दाखल केली.

राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने ही रक्कम आदेशित केल्याप्रमाणे दिली नाही. त्यामुळे अर्जदारांनी जिल्हा न्यायालयात एकूण सहा याचिका दाखल केल्या होत्या. महामार्ग प्राधिकरणाची जबाबदारी असूनही त्यांनी रक्कम भरली नाही. त्यामुळे वाशीम जिल्ह्याच्या अधिकारक्षेत्रामध्ये गट क्र. ३०२ असलेला तोंडगाव धुमका टोल नाका जप्त करण्याची मागणी केली. त्यानुसार प्रमुख जिल्हा न्यायधीश अनिल सुब्रमण्यम यांनी तोंडगाव-धुमका टोल प्लाझा जप्त करण्याच्या ‘वॉरंट’वर स्वाक्षरी केली. ■

> जप्त केलेला टोल नाका हर्रास करून शेतकऱ्यास नुकसान भरपाई द्यावी, अशी मागणी न्यायालयास करणार आहे.
>
> **ॲड. उज्वल देशमुख**
> वाशीम

# प्रकल्पांना बदनाम केल्यास सोडणार नाही : मुख्यमंत्री



**मुंबई, ८ जुलै**

मला बदनाम करा, देवेंद्र फडणवीस ‘शिव्या प्रूफ’ आहे; त्याला शिव्यांची सवय झाली आहे. परंतु राजकीय स्वार्थासाठी महाराष्ट्राला आणि येथील जागतिक दर्जाच्या प्रकल्पांना बदनाम केलात तर सोडणार नाही, अशा शब्दांत मुंबई-पुणे एक्सप्रेसवेवरील ‘मिसिंग लिंक’ (कनेक्टिंग लिंक) प्रकल्पावर विरोधकांकडून केल्या जाणाऱ्या टीकेचा समाचार घेताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत विरोधकांना निर्वाणीचा इशारा दिला. १० वर्षांनंतर आज टीका करणारे कुठेही दिसणार नाहीत, पण ही ‘मिसिंग लिंक’ दिमाखात उभी असेल आणि त्यावर आमचेच नाव असेल, असा घणाघात त्यांनी सभागृहात केला.

बुधवारी मुख्यमंत्री सत्ताधाऱ्यांच्या २९३ च्या प्रस्तावावरील चर्चेला उत्तर देत होते. विरोधकांनी ‘मिसिंग लिंक’ परिसरात झालेल्या दरड कोसळण्याच्या घटनेचे भांडवल करत संपूर्ण प्रकल्पावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले होते. काही लोक टीव्ही आणि सोशल मीडियावर येऊन तद्दन खोटं बोलत आहेत. १ कोटी खोटारडे लोक मेल्यानंतर अशी माणसे जन्माला येतात. महायुती सरकारकडे हिंमत होती म्हणून आम्ही हा प्रकल्प पूर्ण करून दाखवला. यापूर्वीच्या आघाडी सरकारच्या काळात या ‘मिसिंग लिंक’चा केवळ प्रस्ताव तयार झाला होता, असे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले. ◂ (तभा वृत्तसेवा)

## शाह यांची फडणवीसांसोबत चर्चा

**नवी दिल्ली, ८ जुलै**

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी बुधवारी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत दूरध्वनीवर चर्चा करीत मुसळधार पावसामुळे राज्यात उद्भवलेल्या परिस्थितीचा आढावा घेतला, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली. केंद्र सरकारकडून राज्याला सर्व ती मदत केली जाईल, असे अमित शाह यांनी देवेंद्र फडणवीस यांना आश्वस्त केले.

मुंबईत झालेल्या मुसळधार पावसामुळे लोकल सेवा बाधित झाली. त्यामुळे कार्यालयात जाणाऱ्या चाकरमान्यांची प्रचंड गैरसोय झाली होती. आठवड्याच्या शेवटी शहराला प्रचंड तडाखा बसला आणि मंगळवारी काही प्रमाणात दिलासा मिळाला. ◂ (वृत्तसंस्था)

## ‘तोयबा’च्या कमांडरचा खात्मा

**श्रीनगर, ८ जुलै**

जम्मू-काश्मिरातील शोपियाँ जिल्ह्यात सुरक्षा दलाने बुधवारी धडक कारवाई करीत लष्कर-ए-तोयबाच्या स्वयंघोषित कमांडरचा खात्मा केला, अशी माहिती पोलिसांनी दिली.

सुरक्षा दलांनी दक्षिण काश्मीरमधील सात गावांचा समावेश असलेल्या मीमंदर भागातील दाट फळबागेत ३ जुलै रोजी शोधमोहीम सुरू केली होती. ‘तुम्ही पळू शकता, पण लपू शकत नाही!’ शोपियाँ येथील एसओजीने आरआर आणि सीआरपीएफ यांच्या संयुक्त मोहिमेत तोयबाच्या एका दहशतवाद्याचा खात्मा केला, अशी माहिती जम्मू-काश्मीर पोलिसांनी ‘एक्स’वरील एका पोस्टमध्ये दिली. वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांनी ठार झालेल्या अतिरेक्याची ओळख पटवली असून, झाकीर अहमद गनी, असे त्याचे नाव आहे.

गनी याने २७ सप्टेंबर २०२३ रोजी ‘शटरिंग’चे काम करण्यासाठी डायलगम येथे जाण्यासाठी घर सोडले होते. ◂ (वृत्तसंस्था)

## महत्त्वाचे

### शेअर बाजाराला तणावाचा फटका

**मुंबई** : अमेरिका-इराण दरम्यान वाढलेल्या तणावामुळे जागतिक बाजारातून नकारात्मक संकेत मिळाले. त्यातच कच्चे तेल तब्बल ६ टक्क्यांहून अधिक महागल्याने आणि मध्य पूर्वेतील भू-राजकीय परिस्थिती चिघळल्याने भारतीय शेअर बाजारात सलग दुसऱ्या दिवशी मोठी घसरण पाहायला मिळाली. बुधवारी बाजाराची सुरुवातच घसरणीसह झाली. दुपारच्या सत्रात विक्रीचा दबाव आणखी वाढल्याने चौफेर पडझड झाली आणि निफ्टीने २४,००० चा टप्पा ओलांडून खाली धाव घेतली. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणवरील ताज्या हवाई हल्ल्यानंतर ‘तात्पुरता युद्धविराम संपला’ असल्याचे जाहीर केले. या वक्तव्यानंतर बाजारात घबराट पसरली आणि निफ्टीने २३,८०५ या दिवसाच्या नीचांकी पातळीला स्पर्श केला. ■

## माउलींच्या पालखीचे प्रस्थान

**आळंदी, ८ जुलै**

‘पंढरीची वारी आहे माझ्या घरी। आणिक न करी तीर्थव्रत।।’

अशीच अनुभूती आज अलंकापुरीत आली. अतिवृष्टीचे संकट आणि इंद्रायणीचा पूर अशा नैसर्गिक आपत्तींचे सावट असतानाही वारकऱ्यांची भक्ती आणि उत्साह तसूभरही कमी झाला नाही. जणू वारकऱ्यांची भक्ती पाहून निसर्गालाही या शेकडो वर्षांच्या परंपरेत सहभागी व्हावेसे वाटले. पूर ओसरला, पावसानेही विश्रांती घेतली आणि ‘ज्ञानोबा-तुकाराम’च्या गजरात संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्याने सायंकाळी देऊळवाड्यातून पंढरपूरच्या दिशेने प्रस्थान ठेवले.

८ जुलै रोजी पहाटे ४ वाजता प्रस्थान सोहळ्याच्या विविध धार्मिक विधींना सुरुवात झाली. ज्ञानेश्वर माऊलींच्या समाधीवर पवमान अभिषेक करण्यात आला. माऊलींचा चांदीचा मुखवटा समाधीवर ठेवून त्याची विधिवत पूजा करण्यात आली. त्यानंतर भाविकांसाठी दर्शनबारी सुरू करण्यात आली. ◂ (तभा वृत्तसेवा)



# ममतांना हायकोर्टाचा दणका



**कोलकाता, ८ जुलै**

पश्चिम बंगालमध्ये तृणमूल काँग्रेसशी संबंधित कथित फंडिंग प्रकरणात अंमलबजावणी संचालनालयाने (ईडीने) पक्षाच्या बँक खात्यांमधील सुमारे ४४० कोटी रुपयांच्या निधीचा तपास सुरू करत ही बँक खाती गोठवली. ममता बॅनर्जी यांनी कोलकाता उच्च न्यायालयात धाव घेत ईडीच्या कारवाईला स्थगिती देण्याची मागणी केली होती. बुधवारी झालेल्या सुनावणीत न्यायालयाने ममता यांची याचिका फेटाळून लावत कारवाईत हस्तक्षेप करण्यास नकार दिला.

बॅनर्जी यांच्या गटाने बँक खाती गोठवण्याच्या कारवाईला कोलकाता उच्च न्यायालयात आव्हान दिले होते, परंतु न्यायालयाने त्यांना तातडीने कोणताही दिलासा देण्यास नकार दिला. न्यायालयाच्या या भूमिकेनंतर ईडीने या प्रकरणात मनी लाँड्रिंगच्या (पैशांची अफरातफर) दृष्टीने तपास सुरू केला. खात्यांमध्ये एवढी मोठी रक्कम कुठून आली आणि ती कोणत्या कारणांसाठी वापरली जाणार होती, याचा शोध आता यंत्रणा घेत आहे. दरम्यान ईडीने बुधवारी एका खासगी विमान कंपनीच्या कार्यालयावर छापे टाकले. या कंपनीने ममता आणि अभिषेक बॅनर्जी यांच्यासह तृणमूलच्या वरिष्ठ नेत्यांना चार्टर्ड विमानांची सेवा पुरवल्याचा संशय आहे. ◂ (वृत्तसंस्था)

## सर्व एसटी बसेस इलेक्ट्रिक होणार

**मुंबई, ८ जुलै**

पर्यावरणपूरक, आधुनिक आणि शाश्वत सार्वजनिक वाहतूक व्यवस्था उभारण्याच्या उद्देशाने राज्य मार्ग परिवहन (एसटी) महामंडळाचा संपूर्ण बस ताफा २०३५ पर्यंत टप्प्याटप्प्याने इलेक्ट्रिक करण्यात येणार असल्याची महत्त्वाची माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी आज विधानपरिषदेत प्रश्नोत्तराच्या तासात दिली. भाजपाचे श्रीकांत भारतीय यांनी या संदर्भातला प्रश्न उपस्थित केला होता. ◂ (वृत्तसंस्था)

**ताज्या घडामोडी**
क्षणाक्षणाला मिळविण्यासाठी **तरुण भारत पोर्टलला भेट द्या** किंवा ९८८१०११६६२ व्हॉट्सॲप क्रमांकावर संपर्क साधा. सोबत असलेला क्यूआर कोड स्कॅन करा आणि रहा **क्षणाक्षणाला अपडेट!**

# मध्यपूर्वेत पुन्हा भडका

**शांतता करार रद्दची ट्रम्प यांची घोषणा | दोन्ही देशांचे परस्परांवर भीषण हल्ले | होर्मुझमध्ये वाढला तणाव**

**दुबई, ८ जुलै**

आंतरराष्ट्रीय जलवाहतुकीसाठी अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या होर्मुझ जलमार्गात व्यत्यय आणत इराणी सैन्याने मंगळवारी चार जहाजांवर हल्ले केले. शांतता करारादरम्यान इराणच्या कुरापतींना प्रत्युत्तर देत अमेरिकेच्या सैन्याने बुधवारी जोरदार हल्ले चढवले. यानंतर इराणने कतार आणि बहरीन येथील अमेरिकेच्या लष्करी तळावर हल्ले केले.

अमेरिकन सेंट्रल कमांडने जारी केलेल्या निवेदनात म्हटले की, होर्मुझ जलमार्गात जहाजांवर केलेला हल्ला आणि आंतरराष्ट्रीय मार्गात अडथळा आणण्याच्या कृतीला प्रत्युत्तर म्हणून इराणच्या ८० पेक्षा जास्त लष्करी तळांवर अचूक आणि अत्यंत शक्तिशाली हवाई हल्ले करण्यात आले. अचूक मार्गदर्शित शस्त्रांचा वापर करून इराणची हवाई संरक्षण प्रणाली, लष्करी कमांड आणि नियंत्रण नेटवर्क, किनारी रडार आणि जहाजविरोधी क्षेपणास्त्र तळ, तसेच आयआरजीसीच्या ६० हून अधिक लहान नौकांना उद्ध्वस्त करण्यात आले.

क्षेपणास्त्र आणि ड्रोनचा मारा करत इराणने बहरीन आणि कुवेतमधील अमेरिकेच्या लष्करी, वायुतळावर हल्ले केले. ◂ (वृत्तसंस्था)

### कोणत्याही परिस्थितीत झुकणार नाही



इराणच्या संसदेच्या अध्यक्ष मोहम्मद गालिबाफ म्हणाले, दहशत आणि खंडणीचे युग संपले आहे. अमेरिकेने कराराचे उल्लंघन केल्याने आम्हाला प्रतिकार करावा लागला. लेबनॉनवर हल्ले सुरूच असून, त्यांनी दक्षिण इराणमध्ये अनेक हल्ले केले. आम्ही कोणत्याही परिस्थितीत अमेरिकेसमोर झुकणार नाही. ■

### यापुढे वाटाघाटी नाही



तुर्कीची राजधानी अंकारा येथे आयोजित नाटो शिखर परिषदेदरम्यान पत्रकारांशी बोलताना ट्रम्प म्हणाले, युद्ध संपवण्यासाठी इराणसोबत झालेला करार संपला आहे. ते खूप वाईट लोक आहेत. त्यांचे नेतृत्व विकृत मानसिकतेचे आहेत. त्यांच्याशी वाटाघाटी करणे म्हणजे केवळ वेळेचा अपव्यय आहे. ■




अमेरिकेच्या हवाई हल्ल्यात दक्षिण इराणमधील अनेक इमारतींचे नुकसान झाले

# देशातील पहिली हायड्रोजन ट्रेन १७ जुलैला धावणार

**नवी दिल्ली, ८ जुलै**

भारताच्या पहिल्या हायड्रोजनवर चालणाऱ्या ट्रेनच्या उद्घाटनाची तारीख जाहीर करण्यात आली आहे. हरियाणातील जिंद-सोनिपत मार्गावर १७ जुलैला ही ट्रेन धावणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी या ट्रेनला हिरवी झेंडी दाखविणार आहेत. विशेष म्हणजे हे ट्रेन धावताना प्रदूषण जवळपास शून्य असेल, असा दावा केला जात आहे.

या ट्रेनसाठी जिंदमध्ये एक विशेष हायड्रोजन साठवणूक आणि इंधन भरण्याची सुविधा विकसित करण्यात आली आहे. जीवाश्म इंधनाऐवजी हायड्रोजनचा वापर करून निर्माण होणाऱ्या इंधनावर ही ट्रेन धावणार आहे. भारतात वीजेवर चालणाऱ्या रेल्वेगाड्या हा प्रदूषण कमी करण्याचा एक चांगला मार्ग मानल्या जातो. परंतु त्यांच्या वापराचा एक तोटा असा आहे की, यासाठी तयार केली जाणारी वीज कोळसा (दुसरे जीवाश्म इंधन) वापरणाऱ्या वीज केंद्रांमधून निर्माण केली जाते. वीजेवर धावणाऱ्या रेल्वेगाड्या स्वतः थेट प्रदूषण करत नसल्या, तरी त्या पुरवत असलेली वीज जीवाश्म इंधनांपासून निर्माण केली जाते, ज्यामुळे कार्बन उत्सर्जनात भर पडते. यामुळे हायड्रोजनवर चालणाऱ्या ट्रेन्स पर्यावरणासाठी अधिक चांगल्या ठरतात. या ट्रेन्स केवळ कार्बन उत्सर्जन पूर्णपणे थांबवत नाहीत, तर पारंपरिक इंधनांपेक्षा अधिक स्वच्छ आणि अधिक ऊर्जा-कार्यक्षम असल्याचेही सिद्ध करतात.

रेल्वे मंत्रालयाने २०२३-२४ च्या अर्थसंकल्पात हायड्रोजन ट्रेन प्रकल्पाच्या विकासासाठी २,८०० कोटी रुपयांची तरतूद केली आहे. ही रक्कम संशोधन, रचना, चाचणी आणि आवश्यक पायाभूत सुविधांच्या विकासासाठी वापरली जात आहे. भारतीय रेल्वेने ‘हायड्रोजन फ्युएल सेल’ बसविण्यासाठी १११.८३ कोटी रुपयांच्या एका प्रायोगिक प्रकल्पालाही मंजुरी दिली आहे. ◂ (वृत्तसंस्था)



### अशी आहे पहिली ‘हायड्रोजन ट्रेन’

**मार्ग** : जिंद-सोनिपत
**अंतर** : सुमारे ९० किमी
**प्रारंभिक चाचणी वेग** : ७५ किमी/तास
**स्थानके** : एकूण सहा
**किमान भाडे** : पाच रुपये
**कमाल भाडे** : २५ रुपये
**अंदाजित प्रवासाचा वेळ** : सुमारे एक तास
**शिफारस केलेला कमाल वेग** : ११० ते १४० किमी/तास
**क्षमता** : सुमारे २५०० प्रवासी

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



## महत्त्वाचे

### शिवसेनेचे नगरसेवक रमेश म्हात्रे अटकेत

**मुंबई :** कल्याण डोंबिवली महापालिकेच्या शास्त्रीनगर रुग्णालयात महिला डॉक्टर, नर्स आणि कर्मचाऱ्यांना मारहाण करण्याच्या आरोपात पोलिसांनी बुधवारी शिवसेनेचे नगरसेवक रमेश म्हात्रे यांच्यासह चौघांना अटक केली. या प्रकरणी टीकेचा भडीमार होताच आणि वैद्यकीय कर्मचाऱ्यांनी आंदोलन सुरू केल्यानंतर ही कारवाई करण्यात आली.

म्हात्रे यांनी दोन डॉक्टर, दोन नर्स आणि रुग्णालयातील कर्मचाऱ्यांना मारहाण केल्याच्या प्रकरणाचे तीव्र पडसाद उमटले. डोंबिवलीतील शास्त्रीनगर रुग्णालयात घडलेल्या या घटनेप्रकरणी गुन्हा दाखल केल्यानंतर पोलिसांनी आधी तिघांना अटक केली. मात्र, विरोधकांनी संताप व्यक्त केल्यानंतर म्हात्रे यांनाही विष्णुनगर पोलिसांकडून अटक करण्यात आली.

### 'त्या' आरोपींकडे बनावट दान पावत्या

**लखनौ :** अयोध्या श्रीराम मंदिरासाठी दान करण्यात आलेल्या रकमेच्या अपहार प्रकरणात अटक करण्यात आलेल्या आरोपीकडून बनावट दान पावत्या जप्त करण्यात आल्या. या पावत्या कोणी आणि कोठे छापल्या याचा तपास पोलिस करत आहेत. अनुकल्प मिश्रा, लवकुश मिश्रा आणि करुणेश पांडे यांना न्यायालयाने दोन दिवसांची पोलिस कोठडी सुनावली. या पावत्यांचा वापर फसवणुकीसाठी केल्याचा संशय आहे.

# १० नवीन शासकीय नर्सिंग महाविद्यालयांची स्थापना

## चंद्रपूर, यवतमाळ, अमरावती, गडचिरोलीचा समावेश

**मुंबई, ८ जुलै**

ज्यातील आरोग्य यंत्रणा बळकट करण्यासाठी आणि प्रशिक्षित परिचारिकांचे मनुष्यबळ वाढवण्यासाठी राज्यात १० नवीन शासकीय परिचर्या पदवी महाविद्यालये स्थापन करण्यास राज्य सरकारने अधिकृत मंजुरी दिली आहे. यात विदर्भातील चंद्रपूर, यवतमाळ, अमरावती, गडचिरोली चार जिल्ह्यात महाविद्यालय उभारले जाणार आहे.



पावसाळी अधिवेशन

२१ जून २०२६ रोजी झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत या प्रस्तावाला मंजुरी देण्यात आली होती, ज्यावर आता अंमलबजावणीची मोहर उमटली आहे. वैद्यकीय शिक्षण विभागाने दिलेल्या माहितीनुसार, राज्यातील प्रत्येकी १०० विद्यार्थी प्रवेश क्षमता असलेली ही १० नवीन शासकीय नर्सिंग महाविद्यालये चंद्रपूर, सिंधुदुर्ग, यवतमाळ, अलिबाग (रायगड), रत्नागिरी, अमरावती, धाराशिव, गडचिरोली, पालघर आणि अहिल्यानगर या १० जिल्ह्यांमध्ये सुरू केली जाणार आहेत. या नवीन महाविद्यालयांच्या स्थापनेमुळे राज्यात दरवर्षी अतिरिक्त १ हजार नर्सिंग पदवीधरांचे प्रशिक्षित मनुष्यबळ तयार होणार असून, ग्रामीण आणि दुर्गम भागातील आरोग्य व्यवस्थेला याचा मोठा फायदा होणार आहे. या १० नवीन संस्थांच्या अनावर्ती खर्चासाठी प्रति संस्था ३३.४८ कोटी रुपयांनुसार एकूण ३३४.८० कोटी रुपयांच्या निधीला आणि खर्चाला शासनाने मान्यता दिली आहे.

यापैकी यवतमाळ, चंद्रपूर आणि सिंधुदुर्ग या ३ महाविद्यालयांना केंद्र पुरस्कृत योजनेअंतर्गत प्रत्येकी १० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून घेतला जाणार आहे. या संपूर्ण पायाभूत सुविधांमध्ये अध्यापन विभागासह अत्याधुनिक प्रयोगशाळा, संगणक कक्ष, ग्रंथालय आणि भारतीय परिचर्या परिषदेच्या निकषांनुसार विद्यार्थ्यांसाठी भव्य वसतिगृह इमारतींचे बांधकाम केले जाणार आहे.

उच्चस्तरीय सचिव समितीच्या मंजुरीने प्रत्येक नवीन महाविद्यालयासाठी वर्ग १ ते वर्ग ४ अंतर्गत एकूण ८६ पदे निर्माण केली जाणार आहेत, ज्यामध्ये प्राचार्य, उपप्राचार्य, प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक, ट्युटर, ग्रंथपाल आणि इतर प्रशासकीय व कंत्राटी कर्मचाऱ्यांचा समावेश आहे.

(तभा वृत्तसेवा)



# सीमाप्रश्नी आरपारच्या लढाईसाठी महाराष्ट्र सज्ज

## शरद पवारांच्या अनुभवाची ढाल; फडणवीस सरकारची आक्रमक चाल

**मुंबई, ८ जुलै**

महाराष्ट्र आणि कर्नाटक यांच्यात गेल्या अनेक दशकांपासून धुमसत असलेल्या सीमावादाच्या लढ्याने आता एक अत्यंत निर्णायक टप्पा गाठला आहे. सर्वोच्च न्यायालयात होणाऱ्या आगामी महत्त्वपूर्ण सुनावणीसाठी राज्य सरकारने कंबर कसली असून, कायदेशीर लढाईची धार अधिक तीव्र केली आहे. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या उच्चाधिकार समितीच्या बैठकीत या प्रश्नावर सखोल मंथन करण्यात आले. विशेष म्हणजे, या आरपारच्या लढाईत राज्याची बाजू भक्कम करण्यासाठी ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या प्रदीर्घ अनुभवाची ढाल वापरण्याचा मोठा आणि रणनीतिक निर्णय घेण्यात आला आहे.

सीमाभागातील मराठी माणसाच्या हक्कासाठी झालेल्या अनेक आंदोलनांचे शरद पवार हे प्रत्यक्ष साक्षीदार आहेत. या संवेदनशील प्रश्नातील बारकावे आणि इतिहासाची त्यांना असलेली सखोल जाण सर्वोच्च न्यायालयात महाराष्ट्राची बाजू मांडताना अत्यंत कळीची ठरणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार आणि केंद्रीय मंत्री नारायण राणे यांसारख्या दिग्गज नेत्यांच्या उपस्थितीत पार पडलेल्या या उच्चस्तरीय बैठकीत न्यायालयात सादर करायचे भक्कम पुरावे आणि युक्तिवादाची सविस्तर रूपरेषा निश्चित करण्यात आली. तब्बल ३४ वर्षांच्या प्रदीर्घ काळानंतर शरद पवार यांनी नुकतीच विधिमंडळात लावलेली हजेरी राजकीय वर्तुळात नवचैतन्य निर्माण करणारी ठरली असतानाच, आता त्यांचा सीमाप्रश्नातील सक्रिय सहभाग राज्याच्या लढ्याला मोठी ताकद देणारा ठरला आहे.

१ नोव्हेंबर १९५६ रोजी देशात भाषेच्या आधारावर राज्यांची पुनर्रचना झाली आणि बेळगाव, निपाणी, कारवार, बिदर, भालकी यांसारख्या अस्सल मराठी भाषिक प्रदेशांसह तब्बल ८६५ गावे कर्नाटकच्या घशात घातली गेली. हा ऐतिहासिक अन्याय महाराष्ट्र कधीही विसरलेला नाही. भौगोलिक सलगता आणि बहुसंख्य मराठी भाषिक हा महाराष्ट्राच्या दाव्याचा मुख्य आणि भक्कम पाया राहिला आहे.

(तभा वृत्तसेवा)

### सर्वोच्च न्यायालयाकडे खिळल्या नजरा

मराठी भाषकांवर होत असलेल्या अन्यायाविरुद्ध रस्त्यावर आणि न्यायालयात प्रखर लढा देणाऱ्या सीमाभागातील लाखो मराठी बांधवांच्या नजरा आता सर्वोच्च न्यायालयातील आगामी सुनावणीकडे खिळल्या आहेत. राज्य सरकारने आखलेली ही नवी आक्रमक रणनीती आणि सर्वांनी मिळून बांधलेली एकजुटीची वज्रमूठ सीमाभागातील मराठी जनतेला न्याय मिळवून देईल, अशी दाट आशा आता निर्माण झाली आहे.

### १६ ऑगस्टपासून व्यावहारिक मराठी बंधनकारक

राज्यातील व्यावसायिक प्रवासी वाहन चालकांना आता व्यवहारिक मराठीचे ज्ञान असणे बंधनकारक करण्यात आले आहे. महाराष्ट्र शासनाच्या परिवहन विभागाने महाराष्ट्र मोटार वाहन नियम, १९८९ मध्ये सुधारणा करून हा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला असून, १६ ऑगस्ट २०२६ पासून त्याची अंमलबजावणी केली जाणार असल्याची माहिती, राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी विधिमंडळात निवेदनाद्वारे दिली.मंत्री प्रताप सरनाईक यांनी सांगितले की, मराठी ही कोणालाही दूर करणारी नव्हे, तर माणसाला माणसाशी जोडणारी भाषा आहे. महाराष्ट्राने रोजगाराच्या शोधात देशाच्या विविध भागांतून येणाऱ्या प्रत्येक नागरिकाचे नेहमीच स्वागत केले आहे. मात्र, राज्यातील जनतेशी प्रभावी संवाद साधण्यासाठी व्यावसायिक प्रवासी वाहन चालकांना व्यवहारिक मराठीचे ज्ञान असणे ही केवळ कायदेशीर अट नसून सामाजिक जबाबदारीदेखील आहे.

### विधानभवनात 'व्हिबी-जीरामजी' कायद्यावर कार्यशाळा संपन्न

'विकसित भारत-रोजगार व आजीविका हमी मिशन (ग्रामीण) २०२६' म्हणजेच 'व्हिबी - जीरामजी' योजनेत ग्रामीण भागाच्या उत्थानाची आणि देशातील लाखो कुटुंबांना थेट प्रगतीच्या मुख्य प्रवाहात आणण्याची प्रचंड क्षमता असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

'विकसित भारत-रोजगार व आजीविका हमी मिशन (ग्रामीण) २०२६' म्हणजेच 'व्हिबी - जीरामजी' कायद्याविषयी सविस्तर मार्गदर्शन करणारी एक महत्त्वपूर्ण कार्यशाळा आज विधान भवनातील मध्यवर्ती सभागृहात पार पडली. याप्रसंगी राज्याचे रोजगार हमी योजना मंत्री भरत गोगावले यांनी, विधान परिषद सभापती प्रा. राम शिंदे, विधानसभा अध्यक्ष अॅड. राहुल नार्वेकर, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, आमदार तथा रोजगार हमी योजना समिती प्रमुख सुनील शेळके, केंद्रीय ग्रामविकास विभागाच्या सहसचिव रोहिणी भाजीभाकरे उपस्थित होते.

# ऑर्केस्ट्रातील अश्लीलतेला लागणार लगाम

### डान्सबार सुधारणा विधेयक मंजूर

**मुंबई, ८ जुलै**

हॉटेल, उपाहारगृहे आणि बारमधील ऑर्केस्ट्रा परवान्याच्या आड सुरू असलेल्या कथित अश्लील नृत्यांवर प्रभावी नियंत्रण आणण्यासाठी राज्य सरकारने महत्त्वाचे विधेयक विधान परिषदेत मंजूर केले. गृह राज्यमंत्री (ग्रामीण) डॉ. पंकज भोयर यांनी मांडलेले 'महाराष्ट्र हॉटेल, उपाहारगृहे व बाररूममधील अश्लील नृत्यांवर प्रतिबंध व तेथे काम करणाऱ्या महिलांच्या प्रतिष्ठेचे संरक्षण (सुधारणा) विधेयक' मंजूर झाले. या सुधारणेमुळे ऑर्केस्ट्रा परवान्याच्या नावाखाली सुरू असलेल्या गैरप्रकारांवर कारवाईचा मार्ग अधिक सुलभ होणार असून, नियमांचे तीन वेळा उल्लंघन करणाऱ्या आस्थापनांचा परवाना कायमस्वरूपी रद्द करण्याची तरतूद करण्यात आली आहे.



राज्य सरकारच्या मते, २०१६ मध्ये डान्सबारमधील अश्लील नृत्यांवर बंदी घालण्यासाठी स्वतंत्र कायदा करण्यात आला होता. मात्र त्यानंतर अनेक बारचालकांनी महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ मधील कलम ३३ अंतर्गत मिळणाऱ्या 'लाइव्ह ऑर्केस्ट्रा' परवान्याचा आधार घेत अश्लील नृत्यांचे कार्यक्रम सुरू ठेवल्याचे सरकारच्या निदर्शनास आले. या कायदेशीर पळवाटीमुळे पोलिसांना प्रभावी कारवाई करण्यात अनेक अडचणी येत होत्या. याच पार्श्वभूमीवर नव्या सुधारणेनुसार हॉटेल, उपाहारगृहे आणि बारमधील लाइव्ह म्युझिक व ऑर्केस्ट्रा कार्यक्रमांना महाराष्ट्र पोलिस अधिनियमातील परवाना व्यवस्थेतून वगळण्यात आले आहे. यापुढे अशा सर्व आस्थापनांना २०१६ च्या विशेष अधिनियमांतर्गतच परवाना घ्यावा लागणार असून, त्याच कायद्याअंतर्गत तपास, दंडात्मक कारवाई आणि फौजदारी गुन्हे दाखल करण्याचा मार्ग खुला झाला आहे.

(तभा वृत्तसेवा)

# विदर्भपुत्र सुरेश हावरे सीईओ निवड समितीचे सदस्य

### श्रीराम जन्मभूमी तीर्थक्षेत्र न्यासकडून नियुक्ती

**पश्चोट, ८ जुलै**

येथील भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते स्व. दादासाहेब हावरे याचे चिरंजीव, साईबाबा संस्थान शिर्डीचे माजी अध्यक्ष, अणुशास्त्रज्ञ तथा प्रसिद्ध उद्योजक आणि अमरनाथ श्राईन बोर्डचे संचालक विदर्भपुत्र डॉ. सुरेश हावरे यांची श्रीराम जन्मभूमी तीर्थक्षेत्र न्यासने मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ) निवड समितीच्या सदस्यपदी नियुक्ती केली आहे.

अयोध्येतील श्रीराम मंदिराचे दैनंदिन कामकाज पाहण्यासाठी न्यासने मुख्य कार्यकारी अधिकारी नेमण्याचा निर्णय घेतला आहे. त्यासाठी सीईओ निवडण्यासाठी न्यासने तीन सदस्यीय समिती स्थापन केली असून त्यात डॉ. सुरेश हावरे यांचा समावेश आहे. सुरेश हावरे हे श्री साईबाबा संस्थान ट्रस्ट शिर्डीचे दहा वर्षे अध्यक्ष राहिले आहेत. त्यांना मंदिर व्यवस्थापनाचा मोठा व यशस्वी अनुभव आहे. ते मूळचे एक प्रसिद्ध उद्योजक आणि अणुशास्त्रज्ञ आहेत. तीन सदस्यांच्या समितीमध्ये निवृत्त



न्यायमूर्ती प्रदीप कोहली, निवृत्त लेफ्टनंट जनरल विष्णुकांत चतुर्वेदी आणि महाराष्ट्रातील अमरावती जिल्ह्यातील पश्चोट येथील सुरेश हावरे यांचा समावेश आहे. ही समिती सीईओ पदाच्या निवडीची संपूर्ण प्रक्रिया करेल. समितीची पहिली बैठक २२ जुलैला होणार आहे. डॉ. सुरेश हावरे यांनी साईबाबा संस्थान अध्यक्षीय कार्यकाळात शिर्डीत विविध उपक्रम राबविले आहेत. मंदिराचे व्यवस्थापन व योग्य मनुष्यबळ उपलब्ध करण्यासाठी व्यावसायिक अभ्यासक्रम तयार करण्याची कल्पना त्यांनी मांडली आहे. या सर्व कार्याची दखल घेऊन त्यांची नियुक्ती करण्यात आल्याचे सांगण्यात येत आहे. या निवडीबद्दल पश्चोटसह जिल्ह्यातील सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक क्षेत्रातील व्यक्तींनी त्यांचे अभिनंदन केले आहे. हावरे यांचे वडील व तत्कालीन भाजपा नेते स्व. दादासाहेब हावरे यांचा डिसेंबर १९९२ रोजी अयोध्येत जमलेल्या लाखो कारसेवकांमध्ये समावेश होता. त्यांच्याच चिरंजीवावर श्रीराम जन्मभूमी तीर्थक्षेत्र न्यासचा सीईओ निवडण्याची जबाबदारी आली आहे.

(तभा वृत्तसेवा)



राजधानी दिल्लीतील रोहिणी परिसरात पावसाच्या तडाख्याने एक चार मजली इमारत कोसळली. या घटनेनंतर एनडीआरएफ, अग्निशमन विभागाच्या पथकाने बचावकार्य सुरू केले. आतापर्यंत दोन मृतदेह बाहेर काढण्यात आले असून, ढिगाऱ्यात अडकलेल्या इतर पाच जणांचा शोध सुरू आहे

# मोशी कचरा डेपो दुर्घटनेत अडकलेल्या १२ पैकी सहा जणांची सुटका

**पिंपरी, ८ जुलै**

मोशी येथील वेस्ट टू एनर्जी प्रकल्पाच्या इमारतीवर बुधवारी ८ जुलै रोजी कचऱ्याचा ढीग कोसळल्याने या ठिकाणी अडकलेल्या १२ जणांपैकी सहा जणांची सुखरूप सुटका करण्यात प्रशासनाला यश आले. रात्री उशीरापर्यंत सुरू असलेल्या बचाव मोहिमेत अग्निशमन दल, एनडीआरएफचे जवान यांनी शर्थीचे प्रयत्न करून कर्मचाऱ्यांची सुटका केली. सतत पडणाऱ्या पावसामुळे कचऱ्याचा ढिगारा जमिनीवर आला. या ठिकाणी असणाऱ्या इमारतीवर हा ढीग कोसळल्याने त्याच्या वजनाने इमारतीचा पाया ढासळला आणि इमारत देखील कोसळली. दीडच्या सुमारास ही घटना घडल्यानंतर तातडीने बचावकार्य सुरू करण्यात आले. महापौर रवी लांडगे, आमदार शंकर जगताप, आमदार महेश लांडगे यांनी देखील येथील परिस्थितीचा आढावा घेतला. पोलिस आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे, पोलिस आयुक्त विनयकुमार चौबे यांनीच या ठिकाणी धाव घेतली.

इमारतीवरील स्लॅब तोडून एनडी आरएफ आणि भारतीय सैन्य दलाच्या जवानांना आत सोडण्यात आले. त्यांनी सहा जणांना सुखरूप बाहेर काढले. उरलेले ९ ते १० जण सुरक्षित असून त्यांनी आवाजाला प्रतिसाद दिल्याचे आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी सांगितले.

(तभा वृत्तसेवा)

### प्रबोवो सुबियांतो यांची फसवणूक

**वॉशिंग्टन, ८ जुलै**

अमेरिकेत फसवणुकीच्या प्रकरणांचा सामना करत असलेले भारतीय वंशाचे व्यावसायिक गौरव श्रीवास्तव यांच्यावर आता इंडोनेशियामध्येही मोठ्या फसवणुकीचा आरोप करण्यात आला आहे. स्वतःला सीआयए एजंट असल्याचे सांगून राष्ट्राध्यक्ष प्रबोवो सुबियांतो (तेव्हाचे संरक्षण मंत्री) यांचा विश्वास जिंकला आणि संरक्षण करारांच्या नावाखाली ४२५ कोटी रुपयांचे बनावट कर्ज मंजूर करून घेतल्याची माहिती अमेरिकन तपास यंत्रणांच्या तपासात समोर आली.

(वृत्तसंस्था)

# महाराष्ट्रासह दहा राज्यांत एनआयएचे छापे

## दहशतवादी संघटनांशी संबंधित सदस्य लक्ष्य, २० ठिकाणी शोधमोहीम

**नवी दिल्ली, ८ जुलै**

तरुणांना समाज माध्यमावरून दहशतवादी संघटनेशी जोडण्यासाठी कार्यरत असलेल्या इस्लामी कट्टरवाद्यांच्या १० राज्यातील २० ठिकाणांवर राष्ट्रीय तपास संस्थेने (एनआयए) बुधवारी छापे टाकले. इसिस आणि अल कायदा यांसारख्या दहशतवादी संघटनांच्या विचारधारेचा प्रचार करण्यासाठी देशभरातील विविध ठिकाणी त्यांचे प्रयत्न सुरू होते. सरकारविरुद्ध हिंसक जिहाद पुकारून देशाला इस्लामिक राष्ट्रात रूपांतरित करणे हा यामागील उद्देश होता अशी माहिती तपासात समोर आली.

एनआयएच्या पथकांनी आंध्र प्रदेश, तेलंगणा, कर्नाटक, महाराष्ट्र, उत्तर प्रदेश, पश्चिम बंगाल, बिहार, राजस्थान, गुजरात आणि दिल्ली येथील २० ठिकाणी एकाचवेळी छापे टाकले. या कालावधीत अनेक डिजिटल उपकरणे जप्त करण्यात आली. कट्टरतावादाच्या कटाबद्दल अधिक धागेदोरे शोधण्यासाठी या



उपकरणांची न्यायवैद्यक तपासणी केली जाईल. या प्रकरणात आतापर्यंत अकरा आरोपी आणि एका अल्पवयीन मुलाला अटक करण्यात आली आहे. त्यांच्याकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे एनआयएने बुधवारी १० राज्यात छापे टाकल्याची माहिती एका एनआयए अधिकाऱ्याने वृत्तसंस्थेला दिली.

आंध्र प्रदेश पोलिसांनी मार्च महिन्यात मुख्य आरोपी रहमतुल्ला शरीफ मोहम्मद याच्या घरावर छापा टाकल्यानंतर गुन्हा दाखल केला. या कारवाईत त्याच्या घरातून बंदी घातलेली दहशतवादी संघटना 'अल-कायदा इन द इंडियन सबकाँन्टिनेंट' आणि इसिसशी संबंधित आक्षेपार्ह साहित्य सापडले होते. त्यानंतर संबंधित तपास एनआयएकडे सोपवण्यात आला. एनआयएने याप्रकरणात ११ आरोपींना ताब्यात घेऊन तपास सुरू केला.

(वृत्तसंस्था)

### जिहादी विचारसरणीचा प्रसार

याप्रकरणातील आरोपींनी देशात अस्थिरता निर्माण करण्याचा कट आखला. अटक केलेले आरोपी आणि त्यांचे साथीदार हिंसक जिहादी मजकूर आणि चुकीच्या माहितीच्या माध्यमातून देशभरातील तरुणांना कट्टरतावादी बनवण्यात गुंतले होते. जिहादी विचारसरणीचा प्रसार करण्यासाठी आणि भारतविरोधी कट रचण्यासाठी ते परदेशात असलेल्या त्यांच्या सूत्रधारांच्या संपर्कातही होते.

### मानवी तस्करी प्रकरणात कारवाई

एनआयएने कंबोडियाशी संबंधित मानवी तस्करी आणि सायबर गुलामगिरी प्रकरणाच्या संदर्भात तीन राज्यांतील सहा वेगवेगळ्या ठिकाणी छापे टाकले. तपास पथकाने या छाप्यांदरम्यान स्मार्टफोन, लॅपटॉप, विविध डिजिटल उपकरणे, अनेक महत्त्वाची कागदपत्रे आणि इतर साहित्य जप्त केले. बिहारमधील गोपालगंज, सिवान, सारण आणि पूर्व चंपारण जिल्ह्यांमध्ये, तसेच उत्तर प्रदेश आणि दिल्लीमध्ये प्रत्येकी एका ठिकाणी शोधमोहीम राबवली.

### बारुईपूर प्रकरणातील आरोपीचा खात्मा

**कोलकाता, ८ जुलै**

पश्चिम बंगालमधील बारुईपूर येथे ११ वर्षांच्या मुलीवर बलात्कार आणि तिची हत्या केल्याप्रकरणी मुख्य आरोपीपैकी एकाचा बुधवारी पहाटे झालेल्या चकमकीत पोलिसांनी खात्मा केला. गुन्ह्याचे दृश्य उलगडण्यासाठी त्याला घटनास्थळी नेले असता, त्याने पोलिसांच्या हातातील बंदूक हिसकावून घेतली आणि पोलिसांच्या ताब्यातून पळून जाण्याचा प्रयत्न केला, अशी माहिती एका वरिष्ठ अधिकाऱ्याने दिली.

मे महिन्यात राज्यात भाजपा सरकार आल्यानंतर ही अशाप्रकारची पहिलीच पोलिस कारवाई आहे. या गुन्ह्याविरोधात लोकांमध्ये तीव्र संताप निर्माण झाला असताना ही कारवाई करण्यात आली आहे. या गुन्ह्याच्या विरोधात हिंसक निदर्शने झाली होती तसेच पोलिसांवर प्रचंड दबाव निर्माण झाला होता. या प्रकरणातील प्रभास मंडल हा अटक करण्यात आलेला पहिला आरोपी होता.

(वृत्तसंस्था)

# चंपत राय यांना विश्वासू माणसांनीच दिला धोका

### स्वामी गोविंद देव गिरी महाराज यांचे प्रतिपादन

**अयोध्या, ८ जुलै**

राम मंदिरासाठी मिळालेल्या देणग्यांमधील कथित अपहाराबाबत निर्माण झालेल्या वादाच्या पृष्ठभूमीवर श्री राम जन्मभूमी तीर्थक्षेत्र ट्रस्टचे कोषाध्यक्ष स्वामी गोविंद देव गिरी महाराज यांनी ट्रस्टचे माजी सरचिटणीस चंपत राय यांचा बचाव केला. ज्या लोकांवर त्यांनी विश्वास ठेवला, त्यांनीच विश्वासघात केला, असे स्वामी गोविंद देव गिरी महाराज यांनी म्हटले.

विश्वस्तांनी कोणताही विश्वासघात केला नाही. उलट चंपत राय यांचीच फसवणूक झाली आहे. आम्ही त्यांना अत्यंत सज्जन व्यक्ती मानतो. परंतु, त्यांनी चुकीच्या लोकांवर विश्वास ठेवला आणि अनेक वर्षे आपल्यासोबत ठेवले, त्या लोकांनीच ट्रस्टची फसवणूक केली. तरीही देणगी व्यवस्थापन प्रक्रियेच्या देखरेखीत राय आणि मिश्रा यांच्याकडून चुका झाल्याचे गिरी यांनी मान्य केले.

इतक्या दीर्घकाळापर्यंत त्यांनी निष्काळजीपणा आणि सतर्कतेचा अभाव दर्शवला हे अगदी बरोबर आहे. असे घडायला नको होते, असे गिरी म्हणाले. राय यांचा राजीनामा स्वीकारतानाही, राम मंदिर आंदोलन आणि अयोध्येतील मंदिर उभारणीमध्ये त्यांनी दिलेल्या योगदानाचे ट्रस्टने एकमताने कौतुक केले.

राय यांची प्रतिमा निष्कलंक राहिली आहे, असे गिरी यांनी माजी सरचिटणीसांची पाठराखण करताना सांगितले. राम मंदिराच्या कार्यासाठी आपले आयुष्य समर्पित करणाऱ्या चंपत राय यांच्याबाबत सांगितले की, त्यांची एकमेव चूक म्हणजे त्यांनी चुकीच्या व्यक्तींवर विश्वास ठेवला. चौकशी होईपर्यंत आणि दोषींना शिक्षा होईपर्यंत सरचिटणीस पदावर कायम राहणे योग्य ठरणार नाही, असे वाटल्यानेच राय यांनी स्वेच्छेने राजीनामा दिला, असे गिरीयांनी सांगितले.

ट्रस्टने मंदिरात देणगीस्वरूपात मिळालेल्या आणि यापूर्वी चोरीला गेल्याचा आरोप असलेल्या अनेक मौल्यवान वस्तू प्रसारमाध्यमांसमोर प्रदर्शित केल्या, असे गिरी यांनी सांगितले. २,८०० वस्तूंची नोंद ठेवली गेली आहे. रामचरितमानसची हस्तलिखित प्रत आणि देवतेला अर्पण केलेला एक सुंदर हार यासारख्या ज्या पाच वस्तूंची चर्चा होत होती, त्या प्रसारमाध्यमांसमोर सादर करण्यात आल्या. तुम्ही त्या नक्कीच पाहिल्या असतील. अशा सर्व वस्तूंची नोंद उपलब्ध आहे आणि अधिकृत व्यक्ती त्यांची तपासणी करू शकतात, असे गिरी म्हणाले.

(वृत्तसंस्था)

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# विदेशी गुंतवणूकदारांचा भारतावर मोठा विश्वास

**। युनोचा अहवाल । वर्षभरात ४४ टक्क्यांनी वाढ । दोन स्थानांची झेप**

**संयुक्त राष्ट्र, ८ जुलै**

केंद्र सरकारने राबवलेल्या योजना आणि देशाची विकासाच्या दिशेने सुरू असलेल्या वाटचालीच्या पृष्ठभूमीवर परदेशी गुंतवणूकदारांनी भारतावर विश्वास दाखवला आहे. गेल्या वर्षभरात भारतात परदेशी गुंतवणुकीत ४४ टक्क्यांनी वाढ होऊन ती ३८ अब्ज डॉलर्सवर पोहोचली आहे. परदेशी गुंतवणुकीत भारताने दोन स्थानांची झेप घेत जगात ११ व्या स्थानावर पोहोचल्याची माहिती एका अहवालातून समोर आली.

भारत २०२५ मध्ये थेट परकीय गुंतवणूक (एफडीआय) स्वीकारणारा ११ वा सर्वात मोठा देश बनला आहे. देशात परदेशी गुंतवणुकीत ४४ टक्क्यांनी वाढून ३८.८९ अब्ज डॉलर्सवर पोहोचली, तर भारतीय कंपन्यांची परकीय गुंतवणूकही विक्रमी पातळीवर पोहोचल्याची माहिती संयुक्त राष्ट्र व्यापार आणि विकास परिषदेने जारी केलेल्या जागतिक गुंतवणूक अहवालातून समोर आली. उत्पादन क्षेत्राचे आधुनिकीकरण आणि सेवा क्षेत्राला प्रोत्साहन यांसारख्या सरकारी धोरणांमुळे, भारताने २०२५ मध्ये दोन स्थानांची झेप घेत थेट परकीय गुंतवणूक स्वीकारणारा ११ वा सर्वात मोठा देश बनण्याचा मान मिळवला आहे. गेल्या वर्षी देशात ३८.८९ अब्ज डॉलर्सची गुंतवणूक आली, जी २०२४ मधील २७.०९ अब्ज डॉलर्सच्या तुलनेत ४४ टक्क्यांनी अधिक आहे. २०२४ मध्ये, भारत परदेशी गुंतवणुकीत १३ व्या क्रमांकावर होता. ◂ (वृत्तसंस्था)

## आशियाई देशांत अव्वल स्थान




गुंतवणुकीमुळे भारताला आपले स्थान पुन्हा मिळविण्यात मदत झाली आहे, जे दोन वर्षांपूर्वी जगातील पहिल्या १० देशांच्या यादीतून बाहेर पडल्यानंतर भारताने गमावले होते. भारतातील ही वाढ विकसनशील देशांमध्ये दिसून येणाऱ्या मंद प्रवृत्तीच्या विरुद्ध आहे, जिथे थेट परकीय गुंतवणुकीचा ओघ केवळ दोन टक्क्यांनी वाढला. आशियाई विकसनशील अर्थव्यवस्थांमधील परकीय गुंतवणूक तीन टक्क्यांनी वाढली असून, भारत आशियाई देशात अव्वलस्थानी आहे. ■




## जागतिक थेट परकीय गुंतवणुकीत ६ टक्के वाढ

- २०२५ मध्ये जागतिक थेट परकीय गुंतवणुकीचा ओघ ६ टक्क्यांनी वाढून १.६ ट्रिलियन डॉलर्सवर पोहोचला
- पहिल्या २० देशांना एकूण जागतिक थेट परकीय गुंतवणुकीपैकी जवळपास ८० टक्के वाटा मिळाला.
- विकसित अर्थव्यवस्थांमधील थेट परकीय गुंतवणूक ११ टक्क्यांनी वाढून ७२३ अब्ज डॉलर्सवर पोहोचली
- विकसनशील देशांमधील गुंतवणूक ९०१ अब्ज डॉलर्स इतकी होती ■

## डेटा सेंटरला पसंती



भारतात एकूण थेट परकीय गुंतवणुकीचा ओघ वाढला असला तरी, प्रकल्पस्तरीय निर्देशक गुंतवणुकीत अल्प प्रतिसाद मिळाला आहे. यामुळे ग्रीनफील्ड गुंतवणुकीच्या मूल्यात २०२४ मधील १११.१४ अब्ज डॉलर्सवरून २०२५ मध्ये ७४.१२ अब्ज डॉलपर्यंत घट झाली. अमेरिकन कंपनी अल्फाबेट इंक.ने भारतात डेटा सेंटरसाठी १४.५ अब्ज डॉलर्स गुंवणुकीची घोषणा करून जागतिक यादीत अव्वल स्थान पटकावले. ■

## भारतीय कंपन्यांचा परदेशात डंका

भारतीय कंपन्यांनी २०२५ मध्ये परदेशात ३५.६६ अब्ज डॉलर्सची गुंतवणूक केली, जी २०२४ मधील २४.२६ अब्ज डॉलर्सपेक्षा ४७ टक्के अधिक आहे. यामुळे गुंतवणुकीच्या बाबतीत जगातील अव्वल देशांतर्गत अर्थव्यवस्थांच्या यादीत भारताला दोन स्थानांनी झेप घेऊन १८ वे स्थान मिळण्यास मदत झाली. भारतीय कंपन्यांनी परदेशात घोषित केलेल्या ग्रीनफील्ड गुंतवणुकीचे मूल्य देखील ४१ टक्क्यांनी वाढून २५.२९ अब्ज डॉलर्स झाले आहे. ■

## ८० लाखांचे हेरॉईन जप्त; पाच जणांना अटक

**अलीगड, ८ जुलै**

एका महिलेसह मादक पदार्थांची आंतर-जिल्हा तस्करी करणाऱ्या टोळीतील पाच संशयितांना पोलिसांनी अटक केली. त्यांच्याकडून ८० लाख रुपयांहून अधिक किमतीचे हेरॉईन जप्त करण्यात आले असल्याची माहिती पोलिसांनी बुधवारी दिली. शहरातील पोलिस आणि मादकपदार्थ विरोधी विशेष पथक यांनी संयुक्तपणे राबविलेल्या मोहिमेदरम्यान मंगळवारी सायंकाळी रोरावार पोलिस ठाण्याच्या हद्दीत ही कारवाई करण्यात आली.

मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे पोलिसांनी सापळा रचला आणि शहरात प्रवेश करणाऱ्या या आरोपींना अडवले. स्थानिक संपर्कातील व्यक्तीला मादकपदार्थांचा साठा पोहोचविण्यापूर्वीच या पाच जणांना अटक करण्यात आली, असे पोलिसांनी सांगितले. आरोपींकडून ८६४ ग्रॅम हेरॉईन आणि ४.५ लाख रुपये रोख रक्कम जप्त करण्यात आल्याचे सर्कल ऑफिसर धनंजय सिंह यांनी सांगितले. या पाचही जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून मादकपदार्थांच्या तस्करीच्या या आंतर-जिल्हा जाळ्यातील इतर सदस्यांची ओळख पटवण्यासाठी त्यांची चौकशी केली जात आहे. ◂ (वृत्तसंस्था)



# तस्करी रोखण्यासाठी ब्रिक्स देश एकवटले

**आंतरराष्ट्रीय संघटित गुन्हेगारीचा मुकाबला करण्याच्या वचनबद्धतेचा पुनरुच्चार**




ब्रिक्स परिषदेच्या बैठकीत सहभागी झालेल्या सदस्य देशांचे प्रतिनिधी

**गुवाहाटी, ८ जुलै**

अमली पदार्थांच्या तस्करीचे बदलणारे स्वरूप, सिंथेटिक ड्रग्सचा वाढता प्रसार, नवीन सायकोॲक्टिव्ह पदार्थ, पूर्वसूचक रसायनांचा गैरवापर, उदयोन्मुख तंत्रज्ञान, व्हर्च्युअल मालमत्तेचा गैरवापर आणि आंतरराष्ट्रीय गुन्हेगारी नेटवर्कद्वारे सागरी मार्ग व डिजिटल प्लॅटफॉर्मचा होणारा गैरवापर यावर ब्रिक्स देशांनी चिंता व्यक्त केली आहे. मादकपदार्थ तस्करी रोखण्यासाठी माहितीची देवाघेवाण करण्यावर ब्रिक्स देशांनी सहमती दर्शवली.

गुवाहाटी येथे झालेल्या ब्रिक्स देशांच्या अमली पदार्थ विरोधी संस्थांच्या प्रमुखांच्या दोन दिवसीय बैठकीत, भारताने आंतरराष्ट्रीय अमली पदार्थ सिंडिकेट्सचा मुकाबला करण्यासाठी जलद, विश्वसनीय आणि अखंड रिअल-टाइम गुप्त माहितीच्या देवाणघेवाणीवर आधारित भागीदारीचे आवाहन केले. ब्रिक्स देशांनी अवैध अमली पदार्थांची तस्करी आणि संबंधित आंतरराष्ट्रीय संघटित गुन्हेगारीचा मुकाबला करण्याच्या आपल्या वचनबद्धतेचा पुनरुच्चार केला आहे. यावेळी सदस्य देशांनी बैठकीत चर्चा झालेल्या मुद्यांवर संयुक्त घोषणापत्र जारी केले. त्यात म्हटले की, राष्ट्रीय कायदे आणि आंतरराष्ट्रीय जबाबदाऱ्यांनुसार, गुप्तचर माहिती आणि सर्वोत्तम पद्धतींची वेळेवर देवाणघेवाण वाढवण्याच्या गरजेवर भर देण्यात आला. अमली पदार्थांच्या विरोधात नवीन तंत्रज्ञान, डिजिटल साधनांवर भर दिला जात आहे. ◂ (वृत्तसंस्था)

### या देशांनी सहभाग घेतला


या बैठकीत ब्राझील, चीन, इथिओपिया, भारत, इंडोनेशिया, इराण, रशिया आणि संयुक्त अरब अमिराती या ब्रिक्स देशांच्या अमली पदार्थ विरोधी संस्थांच्या प्रमुखांनी बैठकीत सहभाग घेतला. ■

## अमेरिकेने रद्द केला इराणी तेलाच्या विक्रीचा परवाना

**दुबई :** इराणच्या तेलाच्या विक्रीला अधिकृत करणारा परवाना अमेरिकेने रद्द केला आहे, असे ट्रेझरी विभागाने मंगळवारी सांगितले. दोन्ही देशांमधील युद्ध संपवण्यासाठी झालेल्या अंतरिम कराराचा भाग म्हणून इराणच्या तेलावरील निर्बंध शिथिल करून ट्रेझरी विभागाने गेल्या महिन्यात हा ६० दिवसांचा परवाना जारी केला होता. ■

## चित्रपट वार्ता

### ‘टॉक्सिक’मधील पहिले गाणे, ‘तबाही’ प्रदर्शित



**मुंबई :** दिग्दर्शिका गीतू मोहनदास यांचा ‘टॉक्सिक : अ फेअरी टेल फॉर ग्रोन-अप्स’ हा चित्रपट २६ ऑगस्ट रोजी चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होणार आहे. चित्रपटाच्या प्रदर्शनापूर्वी निर्मात्यांनी त्याचे पहिले गाणे ‘तबाही’ प्रदर्शित केले. या गाण्यात यश आणि कियारा अडवाणी मुख्य भूमिकेत आहेत. हे गाणे हिंदी, तमिळ, तेलगू, कन्नड आणि मल्याळम भाषांमध्ये प्रदर्शित झाले आहे. विशाल मिश्रा यांनी गायले असून लेखन राज शेखर यांनी केले तर संगीत विशाल, बिटुपोन बोरुआ, कंदर्पा कलिता आणि त्रिहंगकू लहकर यांनी दिले आहे. प्रदर्शनाच्या तारखेत अनेक बदल झाल्यानंतर, ‘टॉक्सिक’ हा चित्रपट येत्या २६ ऑगस्ट रोजी जगभरातील चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होणार आहे. गीतू मोहनदास दिग्दर्शित या चित्रपटात कियारा अडवाणी आणि यश यांच्यासोबत हुमा कुरेशी, नयनतारा, रुक्मिणी वसंत आणि तारा सुतारिया यांच्या प्रमुख भूमिका आहेत. ■

### ‘वेलकम टू द जंगल’ची भरारी

**मुंबई :** अक्षय कुमार स्टार ‘वेलकम टू द जंगल’ या कॉमेडी चित्रपटाने प्रेक्षकांना खळखळून हसवले. केवळ विकेंड नाही तर



विकडेजमध्येही या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर धुरळा उडवला आहे. १० दिवसांत या चित्रपटाने ९० कोटींचा टप्पा पार केला असून अवघ्या १२ दिवसांत १२०.५५ कोटींचे बॉक्स ऑफिस कलेक्शन केले. हा चित्रपट १२५ कोटी रुपये बजेटमध्ये तयार झाला. १२ दिवसांत या चित्रपटाने ९६.४४ टक्के खर्ज वसूल केला आहेत. दरम्यान, चित्रपटाला यशस्वी होण्यासाठी आणखी पाच कोटी कमावणे गरजेचे आहे. येत्या काही दिवसांत हा चित्रपट १५० कोटींचा टप्पा पार करेल, अशी शक्यता वर्तविण्यात येत आहे. ■

### गरोदरपणात केले चित्रीकरण

**मुंबई :** अभिनेत्री दीपिका पदुकोणची एक नवीन जाहिरात समाजमाध्यमावर चर्चेत आहे. दीपिकाने एका हॉटेल चेनसाठी ही जाहिरात केली आहे; ज्यात तिचा बेबी बंप स्पष्ट दिसत आहे. ही जाहिरात दीपिकाने तेव्हा शूट केली होती जेव्हा ती चार महिन्यांची गर्भवती होती. जाहिरातीत दीपिका पदुकोण खूप स्टायलिश आणि वेगळ्या लूकमध्ये दिसत आहे. व्हिडीओमध्ये ती हॉटेलच्या वेगवेगळ्या भागांमध्ये फिरताना आणि नृत्य करताना दिसते आहे. या संपूर्ण जाहिरातीत तिचा प्रेग्नेंसी ग्लो स्पष्टपणे दिसतो आहे. रणवीर सिंग आणि दीपिका पदुकोण यांनी काही काळापूर्वीच इंस्टाग्रामवर एक जॉइंट पोस्ट शेअर करून दुसऱ्यांदा पालक बनल्याची माहिती दिली होती. ■



# लॉरेन्स बिश्नोई टोळीला एफबीआयचा दणका

**अमेरिका-कॅनडासह अनेक देशांमध्ये ५० ठिकाणी छापे**

**वॉशिंग्टन, ८ जुलै**

अमेरिकेची तपास यंत्रणा एफबीआयने पहिल्यांदाच कुख्यात गुन्हेगार लॉरेन्स बिश्नोई, गोल्डी ब्रार आणि जग्गू भगवानपुरिया यांच्या टोळीतील सदस्यांच्या ५० ठिकाणांवर छापे टाकले. अमेरिका, कॅनडा आणि युरोपमध्ये संयुक्त कारवाईदरम्यान भारताशी संबंधित गुन्हेगारांच्या २४ साथीदारांना अटक करण्यात आली, तर ३७ आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



लॉरेन्स आणि गोल्डी यांना खलिस्तान समर्थक हरदीप सिंग निज्जर हत्याकांडातील आरोपी बनवण्यात आले आहे. दोघांनी मिळून कट रचल्याचा आरोप आहे. आरोपींमध्ये रोहित गोदारा आणि इतर साथीदारांची नावेही समाविष्ट करण्यात आली. अमेरिकेच्या फेडरल न्यायालयाने दिलेल्या आदेशाची अंमलबजावणी करत एफबीआयने मंगळवारी छापे टाकले. एफबीआयच्या एका अधिकाऱ्याने वृत्तसंस्थेला सांगितले की, लॉरेन्स भारतातील तुरुंगात असतानाही आपली टोळी चालवतो आणि त्याचे साथीदार भारत, अमेरिका, कॅनडा तसेच युरोपमध्ये गुन्हेगारीत सक्रिय आहे. भारतीय सरकारकडे लॉरेन्स बिश्नोई, जग्गू भगवानपुरिया यांच्या प्रत्यार्पणाची मागणी केली जाईल. गोल्डी ब्रारवर ५० हजार डॉलर्सचे बक्षीस जाहीर केले आहे.

**मादकपदार्थ, शस्त्रे जप्त**

एफबीआयच्या कारवाईत हजारो किलो मादकपदार्थ आणि शस्त्रे जप्त करण्यात आली आहेत. यूएस फेडरल सरकार आणि लॉस एंजेलिसच्या जिल्हा ॲटर्नी जनरलच्या प्रतिनिधींनी सांगितले की, या संपूर्ण गुन्हेगारी संघटनेच्या नेटवर्कचे नेतृत्व भारतातील तुरुंगात असलेला लॉरेन्स करत आहे. उत्तर अमेरिकेत त्याची टोळी गोल्डी ब्रार चालवत होता. युरोपमध्ये सर्व काम रोहित गोदारा सांभाळत होता. ◂ (वृत्तसंस्था)



पंजाब पोलिसांनी पकडलेले आरोपी व शस्त्रसाठा

# पंजाबमध्ये उधळला बॉम्बस्फोटाचा कट


**तीन आरोपी अटकेत**

**सहा हॅण्ड ग्रेनेड, दारूगोळा जप्त**

**अमृतसर, ८ जुलै**

पंजाब पोलिसांच्या अमृतसर येथील राज्य विशेष कृती दलाने (स्टेट स्पेशल ऑपरेशन्स सेल) बॉम्बस्फोटाचा कट उधळत तीन आरोपींना अटक केली. त्यांच्या ताब्यातून बारा पिस्तूल आणि सहा हॅण्ड ग्रेनेड जप्त आणि दारूगोळा जप्त केला. या कारवाईनंतर सुरक्षा यंत्रणा सतर्क झाल्या असून त्यांनी याप्रकरणातील मुख्य आरोपींचा शोध सुरू केला आहे.

लोपोके पोलिस ठाण्याच्या परिसरात काही तरुण शस्त्रे आणि स्फोटकांसह उपस्थित असल्याची आणि त्यांची घातपाताची योजना असल्याची गोपनीय माहिती कृती दलाला मिळाली होती. त्यानंतर पथकाने एक विशेष मोहीम सुरू केली आणि रामतीर्थजवळ घेराव घातला. पोलिस पथकाला पाहताच आरोपींनी घटनास्थळावरून पळून जाण्याचा प्रयत्न केला, परंतु सतर्क पोलिस अधिकाऱ्यांनी तिघांनाही जागीच पकडले. तिघेही आरोपी लोपोके पोलिस ठाण्याच्या हद्दीतील कक्कर गावचे रहिवासी आहेत. शोधमोहिमेदरम्यान पोलिसांनी त्यांच्या ताब्यातून १२ पिस्तूल आणि ६ हँड ग्रेनेड आणि दारूगोळा मिळाला. जप्त केलेली शस्त्रे आणि स्फोटकांची वैज्ञानिक तपासणीची प्रक्रिया सुरू करण्यात आल्याची माहिती एका पोलिस अधिकाऱ्याने दिली. ◂ (वृत्तसंस्था)



दक्षिण भारतातील सर्वच राज्यांमध्ये पावसाने धुमाकूळ घातल्याने फळभाज्या आणि अन्य पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. कर्नाटकातील चिकमंगलूरू येथे शेतकरी कृषी उत्पन्न बाजार समितीत विक्रीसाठी आणलेले शेकडो क्विंटल टोमॅटो पावसाने सडल्याने फेकून द्यावे लागले

## ट्रेलर फूटपाथवर चढला; वडिलांसह तीन मुलांचा मृत्यू

**जयपूर, ८ जुलै**

भरधाव ट्रेलरने फूटपाथवर बसलेल्या एका कुटुंबातील पाच जणांना चिरडले. या अपघातात तीन मुलांसह वडिलांचा मृत्यू झाला तर आईचे दोन्ही पाय तुटले. हा अपघात इतका भीषण होता की, एका मुलाचे दोन तुकडे झाले. सर्वजण नाल्यात पडले. ही घटना मंगळवारी सकाळी नऊ वाजताच्या सुमारास जयपूरमधील कमला नेहरूनगरात घडली. चंद्रप्रकाश व त्यांची मुले रमेश, दीपक व रतन रा. जैतपुरा, अशी मृतकांची नावे आहेत.

अपघाताला बळी पडलेले बागरी समाजाचे कुटुंब वैशाली नगरमध्ये भाड्याच्या घरात राहत होते. फुटपाथवर झाडू बनवून विकत होते. मंगळवारी सकाळी गावी जाण्यासाठी बसची वाट पाहत होते. यादरम्यान ट्रेलरने रेलिंग तोडून आई-वडील आणि तिन्ही मुलांना चिरडले. ◂ (वृत्तसंस्था)



# नर्मदेतून महाराष्ट्राला १० टीएमसी पाणी

**। २० वर्षांपासूनचा प्रलंबित प्रश्न सुटला**
**। मुख्यमंत्री फडणवीस यांची दिल्लीत बैठक**

**नवी दिल्ली, ८ जुलै**

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या प्रमुख उपस्थितीत नर्मदा प्रकल्पाच्या प्रलंबित प्रश्नांबाबत आज सायंकाळी झालेल्या महाराष्ट्र, गुजरात, मध्य प्रदेश आणि राजस्थान या चार राज्यांच्या मुख्यमंत्र्यांच्या महत्वपूर्ण बैठकीत वीस वर्षापासून प्रलंबित असलेला प्रश्न सुटला असून महाराष्ट्राला दहा टीएमसी पाणी मिळण्याचा मार्ग मोकळा झाल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. या पाण्यापैकी पाच टीएमसी पाणी उकाई धरणातून उचलण्याबाबतही या बैठकीत अनुकूल निर्णय घेण्यात आला.

नवी दिल्लीत गृहमंत्री अमित शहा, केंद्रीय जलशक्ती मंत्री सी. आर. पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत नर्मदा प्रकल्पाच्या प्रलंबित प्रश्नांबाबत महाराष्ट्र, गुजरात, मध्य प्रदेश आणि राजस्थान या चारही राज्यांच्या मुख्यमंत्र्यांची महत्त्वाची बैठक झाली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मध्यप्रदेशचे मुख्यमंत्री मोहन यादव, राजस्थानचे मुख्यमंत्री भजनलाल शर्मा, गुजरातचे मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल यांची या बैठकीस उपस्थिती होती.

देवेंद्र फडणवीस यांनी माध्यम प्रतिनिधींना या बैठकीत झालेल्या महत्त्वपूर्ण निर्णयाची माहिती दिली. नर्मदा प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर त्यातून महाराष्ट्राला केवळ वीज मिळाली. मात्र राज्याच्या वाट्याचे १० टीएमसी पाणी मिळाले नव्हते. त्या दृष्टीने आजच्या बैठकीमध्ये महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला.

राज्यासाठी देय असलेल्या निधीसह इतरही अनेक प्रलंबित प्रश्नांबाबत सकारात्मक निर्णय झाले. महाराष्ट्राला आता केवळ २७ कोटी देय असून उर्वरित देय रक्कम रद्द झालेली आहे. महाराष्ट्राच्या वाट्याचे १० टीएमसी पाण्यापैकी नर्मदा-तापी वळण योजनेत पाच टीएमसी आणि उकाई प्रकल्पातून पाच टीएमसी पाण्याची मागणी महाराष्ट्राने केली होती. त्याही संदर्भात आजच्या बैठकीत अनुकूल नर्णिय झाला. पावसाच्या कालावधीत म्हणजे उकाई धरणात पाणी असतानाच्या काळात हे पाणी उचलण्यास गुजरातने अनुकूलता दर्शवली. गृहमंत्री अमित शाह आणि जलशक्ती मंत्री सी. आर. पाटील यांनी त्याला मान्यता दिली आहे. उकाई धरणातून पाणी उचलण्याबाबत महाराष्ट्र सरकारकडून सुव्यवस्थित आराखडा तयार करण्यात येत असून या पाण्याचा उत्तर महाराष्ट्रातील जिल्ह्यांना मोठ्या प्रमाणावर फायदा होणार आहे, असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. ◂ (तभा वृत्तसेवा)

### कुसुम योजनेत महाराष्ट्राला अधिक निधी

केंद्रीय नवीन व नवीकरणीय ऊर्जा मंत्री प्रल्हाद जोशी यांच्या अध्यक्षतेखाली आज झालेल्या बैठकीत महाराष्ट्रातील अक्षय ऊर्जा क्षेत्रातील विविध योजनांचा आढावा घेण्यात आला. केंद्र सरकारने कुसुम योजनेअंतर्गत महाराष्ट्राला देशातील सर्वाधिक म्हणजेच एकूण निधीपैकी ५१ टक्के निधी उपलब्ध करून दिल्याबद्दल त्यांनी केंद्रीय मंत्र्यांचे आभार मानले. ■

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## अग्रलेख

# आरटीओच्या भ्रष्टाचाराचे डोंगर

‘आरटीओ’ आणि ‘भ्रष्टाचार’ या जणू एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत, असे वाटावे इतकी बेबंदशाही या विभागात दिसते. महाराष्ट्राच्या विविध भागांत लोक हे अनुभवत आहेतच. शिवाय, नागपूर आणि विदर्भातील या परिवहन कार्यालयांतून समोर आलेले अवैध वसुलीचे रॅकेट, चोरीच्या तब्बल १५०० वाहनांची बेकायदेशीर नोंदणी आणि कोट्यवधी रुपयांच्या करचुकवेगिरीचे प्रकार केवळ धक्का देणारे नाही, तर संबंधित व्यवस्थेच्या अब्रूची लक्तरे वेशीवर टांगणारे आहे. विरोधकांनी यासंदर्भात विधानसभेत पुराव्यांसह श्राव्य फिती सादर केल्यानंतर याची गंभीरतेने दखल घेतली गेली. या कथित भ्रष्टाचाराच्या चौकशीसाठी ‘एसआयटी’ स्थापन करण्यात आली आहे. खरे तर, या निमित्ताने पुन्हा एकदा सर्वसामान्यांसमोर कायम उभा ठाकणारा जुनाच प्रश्न ऐरणीवर आला आहे. तो म्हणजे, हा विभाग नक्की जनतेच्या सेवेसाठी आहे, की अधिकारी आणि दलालांचे घरे भरण्यासाठी आहे?

खरे तर, ‘आरटीओ’ विभाग भ्रष्टाचाराच्या शर्यतीत नेहमीच अग्रेसर राहिला आहे, या धाडसी विधानासाठी फार मोठ्या संशोधनाची गरज उरलेली नाही. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या वार्षिक अहवालांवर नजर टाकली, तरी महसूल आणि पोलिस खात्याच्या बरोबरीने किंबहुना अनेकदा त्यांच्याही पुढे या विभागाचे नाव येते. लाच घेण्यासोबतच स्वतःची कातडी वाचवण्यासाठी लाच देण्यातही हा विभाग पुढे असल्याचे जाणकार सांगतात. एका अभ्यासानुसार, सीमा तपासणी नाक्यांवर होणारी अवैध वसुली आणि वाहन नोंदणीतील त्रुटींमुळे राज्याच्या तिजोरीला दरवर्षी हजारो कोटी रुपयांचा फटका बसतो. महाराष्ट्रात राहून, कोट्यवधींच्या आलिशान गाड्या मिरवायच्या, त्या दामटायच्या आणि कर चुकवण्यासाठी त्यांची नोंदणी मात्र दमण, दीव किंवा पुद्दुचेरीमध्ये करायची! हा भ्रष्ट खेळ आरटीओ अधिकाऱ्यांच्या अभयाशिवाय आणि आर्थिक तडजोडीशिवाय शक्य आहे का? १५-१५ वर्षे एकाच भागात ठाण मांडून बसलेले अधिकारी अवैध वसुलीचे साम्राज्य उभे करतात, तेव्हा एकूण यंत्रणा काय करीत असते असा प्रश्न सर्वसामान्यांनी विचारू नये का? काही लोक म्हणतात- परिवहन विभागाची सगळी यंत्रणा ‘ऑनलाईन’ केल्याने दलालांचा संसर्ग संपला आहे. आता सारा कारभार पारदर्शक झाला आहे. मुळात या केवळ वल्गना आहेत. सातत्याने पुढे येणाऱ्या या विभागातील अधिकारी व दलालांच्या भ्रष्ट आचरणातून ते स्पष्ट दिसते. ‘डिजिटलायझेशन’च्या नावाखाली कागदावरची यंत्रणा तेवढी बदलली असेलही. पण इथे विविध पदांवर बसलेल्या माणसांची नियत बदललेली नाही. या विभागातून दलाल हद्दपार झाल्याचा दावा केला जातो, पण आज तीच दलाली ‘स्मार्ट’ बनून पुढे आली आहे. सामान्य माणसाला साध्या परवान्यासाठी किंवा वाहन पासिंगसाठी आजही आरटीओ कार्यालयांचे आणि त्या कार्यालयांसमोर थाटलेल्या दलालांच्या दुकानांचे खेटे घालावे लागतातच, हे वास्तव आहे. एक तर अजूनही सर्वसामान्य माणूस ‘ऑनलाईन’ अर्ज भरण्याइतपत ‘टेक्नोसॅव्ही’ झाला नाही आणि झाला असेल, तर नोंदणीची अधिकृत ‘साईट’ त्याला प्रतिसाद देत नाही! ‘ऑनलाईन’ यंत्रणेत गैरप्रकार होत नाही, हा अधिकाऱ्यांचा दावा, चोरीच्या १५०० गाड्यांची नोंदणी होत असताना कुठे जातो? कळस म्हणजे, जे काही बोटावर मोजता येईल इतके शिल्लक प्रामाणिक अधिकारी आहेत आणि ज्यांनी या अवैध रॅकेटला विरोध केला, त्यांच्या विरोधात ‘ट्रान्सपोर्टर्स’मार्फत खोट्या तक्रारी दाखल केल्या जातात. त्यांना लाचलुचपत विभागाच्या जाळ्यात अडकवण्याचा प्रयत्न होतो, हा विधानसभेत झालेला गंभीर आरोप प्रशासकीय दहशतवादाचा प्रकार आहे. अशा भ्रष्टाचारावर प्रभावी उपाय केल्याचा दावा वारंवार होतो. प्रत्येक घोटाळ्यानंतर चौकशी लागते. पण काहीच दिवसांत सारे काही थंड बस्त्यात जाते. पुन्हा कुठेतरी नवा भ्रष्टाचार, नवी ‘ऑडिओ क्लिप’ आणि नवे वसुलीचे अद्ययावत ‘मॉडेल’ समोर येते. आयपीएस अधिकारी प्रियांका ननावरे यांच्या नेतृत्वाखालील ‘एसआयटी’ आता या प्रकरणांची पाळेमुळे खणून काढणार आहे. उच्चस्तरीय चौकशीचे स्वागतच आहे. परंतु, महिनाभरात येणारा त्यांचा अहवाल नेहमीप्रमाणे धूळ खात पडला राहील की, कथित दोषींना थेट तुरुंगाची हवा दाखवण्यासाठी वापरला जाईल, यावर या यंत्रणेची पत ठरणार आहे. एकट्या नागपूर आणि विदर्भ क्षेत्रात गेल्या काही महिन्यांत झालेल्या ८ मोठ्या छाप्यांमध्ये २० पेक्षा जास्त आरटीओ अधिकारी आणि कर्मचारी लाच घेताना रंगेहात पकडले गेले आहेत. हा आकडा फक्त हिमनगाचे टोक आहे. अगदी ताजे उदाहरण बघायचे तर, जून २०२६ मध्ये नागपूर ग्रामीण आरटीओ अंतर्गत येणाऱ्या खुरसापार (महाराष्ट्र-मध्य प्रदेश सीमा) या तपासणी नाक्यावर ‘एसीबी’ने छापा टाकला. त्यात, ज्या मोटार वाहन निरीक्षकाने आधी इतर अधिकाऱ्यांविरुद्ध भ्रष्टाचाराची तक्रार केली होती, तोच खाजगी दलालांमार्फत ट्रकचालकांकडून बेकायदेशीर वसुली करताना पकडला गेला! या छाप्यात घटनास्थळावरून सुमारे ४७,००० रुपयांची संशयास्पद रोख रक्कम जप्त करण्यात आली. बाकी किती पैसा कुठे गेला असेल कुणास ठावूक. अशी अनेक उदाहरणे महाराष्ट्र-तेलंगणा (तत्कालीन आंध्रप्रदेश) सीमेवरील लक्कडकोट नाक्यावरही उघडकीस आली आहेत. कारवाया अनेक झाल्यात. पण एकाही दोषी मोटार वाहन निरीक्षकाने पूर्ण शिक्षा भोगली, असे ऐकिवात नाही. इतके खोलवर रुजले आहे हे रॅकेट! किस्से येथे संपत नाहीत. भ्रष्ट अधिकाऱ्यांचा खरा मलिदा ‘लक्झरी’ गाड्यांच्या करचुकवेगिरीत आहे. महाराष्ट्राच्या रस्त्यांवर धावणाऱ्या कोट्यवधींच्या आलिशान गाड्यांवर दमण-दीव आणि पुद्दुचेरीच्या ‘नंबर प्लेट्स’ झळकत असतात. महाराष्ट्रातील २० टक्के रस्ता कर चुकवून बोगस कागदपत्रांच्या आधारे अवघ्या अडीच टक्क्यांत या गाड्यांची नोंदणी होते. एका २ कोटींच्या गाडीवर थेट ३० ते ३५ लाख रुपयांचा कर बुडवला जातो. या दरोडेखोरीने राज्याचा हजारो कोटींचा महसूल दरवर्षी बुडतो आणि जनतेच्या या पैशांवर अधिकारी स्वतःची घरे भरतात. दलालांचीही चांदी होते. परिवहन विभागाचा सगळा कारभार ‘सारथी’ आणि ‘वाहन’ या ऑनलाईन प्रणालीवर आणल्याचा ढोल तेवढा पिटला जातो. दलाल संपल्याचा दावाही केला जातो. खरेच जर यंत्रणा १०० टक्के ऑनलाईनने सुरक्षित झाली असेल तर देशाच्या विविध भागांतून चोरलेल्या १ हजार ५०० वाहनांची नोंदणी एकट्या नागपुरात कशी काय होते हो...! याचा सरळ अर्थ असा की, चोरांकडे असणारा ‘डेटा’ आणि आरटीओ अधिकाऱ्यांचे ‘लॉगिन आयडी-पासवर्ड’ यांचे कुठेतरी साटेलोटे आहे. ऑनलाईन प्रणाली ही पारदर्शकतेसाठी आहे की, या अधिकाऱ्यांनी घरबसल्या ‘डिजिटल’ स्वाक्षरीने घोटाळे करण्यासाठी आहे? या पृष्ठभूमीवर, आरटीओ यंत्रणेत पारदर्शकता आणण्यासाठी आणि महसूल गळती रोखण्यासाठी परिवहन मंत्रालयाने काही महत्त्वाचे बदल जाहीर केले आहेत. यापुढे महागड्या गाड्यांच्या नोंदणीवेळी बँक लोनची कागदपत्रे, मूळ रहिवासी पुरावा आणि जीएसटी अत्यंत कडक पद्धतीने तपासले जाणार आहे. १ ऑगस्ट २०२६ पासून कोणत्याही व्यावसायिक प्रवासी वाहन चालकासाठी ‘बॅज’ अनिवार्य करण्यात येणार असून, त्यासाठी संबंधित चालकाकडे स्थानिक नागरिकत्वाचा दाखला आणि व्यावहारिक मराठी भाषेचे ज्ञान असणे बंधनकारक केले जाईल. याउपरही सामान्य नागरिकाला परवान्यासाठी महिनोन्महिने ताटकळत ठेवणारी ही यंत्रणा कोट्यवधींचा कर बुडवणाऱ्या बड्या धेंडांसाठी घातलेल्या पायघड्या मोडेल का? विभागातील अंतर्गत भ्रष्टाचार, सीमा तपासणी नाक्यांवरील बेकायदेशीर वसुली आणि राज्याचा कोट्यवधी रुपयांचा महसूल बुडवणाऱ्यांना विभागातून हद्दपार करेल का, हे बघावे लागेल. त्यासाठी आरटीओ अधिकाऱ्यांच्या बदल्यांचे दर हा कळीचा मुद्दा. मलिद्याच्या पोस्टिंग त्यावर मिळतात. ‘एसआयटी’ला प्रादेशिक परिवहन कार्यालयांतील या भ्रष्टाचाराची खोली मोजणे कितपत जमेल, हेही येणारा काळ सांगेल. एक नक्की सांगता येते आणि ते असे की- प्रामाणिकपणे तपास केला तर भ्रष्टाचाराचे इतके डोंगर उघडे पडतील की ते मोजायला अखखा शासकीय कर्मचारी वर्ग अपुरा पडेल! ■


## तंत्रवेध

**डॉ. दीपक शिकारपूर**

# किशोरवयीन मुले आणि एआयशी संवाद

आजचे जग कृत्रिम बुद्धिमत्तेच्या नव्या पर्वात प्रवेश करत आहे. संगणक, इंटरनेट, स्मार्टफोन आणि समाजमाध्यमांनंतर आता कृत्रिम बुद्धिमत्ता हे मानवी जीवनावर प्रभाव टाकणारे सर्वांत परिवर्तनकारी तंत्रज्ञान ठरत आहे. या तंत्रज्ञानाचा सर्वाधिक जाणवणारा आणि सर्वसामान्यांना सहज उपलब्ध झालेला भाग म्हणजे एआय चॅटबॉट्स. हे संवादक्षम संगणकीय सहायक आज शिक्षण, व्यवसाय, आरोग्य, मनोरंजन, संशोधन आणि वैयक्तिक मार्गदर्शन अशा अनेक क्षेत्रांमध्ये वापरले जात आहेत. मानव हा स्वभावतः संवादप्रिय प्राणी आहे. हजारो वर्षे संवाद हा फक्त मानव ते मानव अशा स्वरूपात घडत होता. परंतु आज प्रथमच इतिहासात मानव आणि यंत्र यांच्यामध्ये नैसर्गिक भाषेत संवाद घडू लागला आहे. विशेष म्हणजे हा संवाद अनेकदा इतका सहज, प्रवाही आणि मानवी वाटतो की समोर प्रत्यक्ष व्यक्ती आहे की कृत्रिम बुद्धिमत्ता याचा विसर पडतो. याच ठिकाणी टीनएज अर्थात किशोरवयीन मुलांच्या सुरक्षिततेचा आणि मानसिक विकासाचा प्रश्न अत्यंत महत्त्वाचा ठरतो. आजची किशोरवयीन पिढी जन्मापासूनच डिजिटल वातावरणात वाढत आहे. त्यांच्या हातात स्मार्टफोन आहे, त्यांच्या अभ्यासात इंटरनेट आहे आणि त्यांच्या मनोरंजनात डिजिटल माध्यमांचा मोठा वाटा आहे. त्यामुळे एआय चॅटबॉट्स त्यांच्यासाठी नवी गोष्ट नसून दैनंदिन जीवनाचा भाग बनत आहेत. अनेक मुले अभ्यासासाठी, माहिती मिळवण्यासाठी, भाषा शिकण्यासाठी, कथा लिहिण्यासाठी किंवा केवळ गप्पा मारण्यासाठी चॅटबॉट्सचा वापर करत आहेत.

योग्य वापर केल्यास एआय चॅटबॉट्स टीनएज मुलांसाठी अत्यंत उपयुक्त ठरू शकतात. शिक्षणाच्या क्षेत्रात त्यांचे योगदान उल्लेखनीय आहे. प्रत्येक विद्यार्थ्याची शिकण्याची पद्धत आणि गती वेगळी असते. वर्गात शिक्षकांना सर्व विद्यार्थ्यांकडे समान लक्ष देता येणे नेहमीच शक्य नसते. अशा वेळी एआय चॅटबॉट्स वैयक्तिक मार्गदर्शकाची भूमिका निभावू शकतात. गणितातील अवघड संकल्पना समजावून सांगणे, विज्ञानातील प्रयोगांचे स्पष्टीकरण देणे, इतिहासातील घटनांचा संदर्भ स्पष्ट करणे किंवा भाषेतील व्याकरण शिकवणे यासाठी



हे साधन प्रभावी ठरते. भाषिक कौशल्यांच्या विकासातही चॅटबॉट्स मोठी मदत करू शकतात. इंग्रजीसह विविध परदेशी भाषांचा सराव करण्यासाठी ते उत्तम साथीदार ठरतात. विद्यार्थ्यांना संवाद साधण्याचा आत्मविश्वास मिळतो. लेखन कौशल्य सुधारते. विचार मांडण्याची पद्धत विकसित होते. अनेक वेळा विद्यार्थी वर्गात प्रश्न विचारण्यास संकोच करतात परंतु चॅटबॉटसमोर त्यांना असा संकोच वाटत नाही. सर्जनशीलतेच्या क्षेत्रातही या तंत्रज्ञानाने नवे दरवाजे उघडले आहेत. कथा, कविता, नाटिका, भाषणे, प्रकल्प अहवाल किंवा नवकल्पनांसाठी कल्पना शोधताना चॅटबॉट्स प्रभावी सहकारी ठरतात. विद्यार्थ्यांच्या कल्पनाशक्तीला चालना मिळते. नव्या दृष्टिकोनातून विचार करण्याची प्रेरणा मिळते. त्यामुळे केवळ माहिती ग्रहण करणारी नव्हे तर सर्जनशील विचार करणारी पिढी घडण्यास मदत होऊ शकते. मानसिक आणि भावनिक पातळीवरही काही सकारात्मक परिणाम दिसून येतात. किशोरवय हा भावनिक चढउतारांचा काळ असतो. अनेक मुलांना आपल्या भावना व्यक्त करण्यासाठी योग्य व्यक्ती मिळत नाही. मित्र, कुटुंब किंवा शिक्षक यांच्याशी सर्व गोष्टी बोलणे त्यांना सोपे वाटत नाही. अशा वेळी काही मुले चॅटबॉट्सशी संवाद साधतात. त्यांना वाटते की कोणी तरी त्यांचे म्हणणे ऐकत आहे. त्यामुळे तात्पुरत्या स्वरूपात तणाव कमी होण्यास मदत होऊ शकते. मात्र या सर्व फायद्यांबरोबरच काही गंभीर धोकेही समोर येत आहेत. एआय चॅटबॉट्स हे माणूस नसतात. त्यांना भावना नसतात, नैतिक जाणीव नसते, अनुभव नसतो आणि जबाबदारीची जाणीवही नसते. ते केवळ उपलब्ध माहिती आणि प्रशिक्षणाच्या आधारे उत्तरे देतात. त्यामुळे काही वेळा त्यांची उत्तरे दिशाभूल करणारी, अपूर्ण किंवा धोकादायक असू शकतात. अलिकडील काही घटनांनी या धोक्यांची तीव्रता अधोरेखित केली आहे. अमेरिकेत एका किशोरवयीन मुलाच्या आत्महत्येनंतर एआय चॅटबॉट्सच्या सुरक्षिततेविषयी गंभीर चर्चा सुरू झाली. आरोप असे होते की संबंधित मुलगा एका आभासी पात्राशी इतका भावनिकदृष्ट्या जोडला गेला होता की त्याने वास्तव आणि आभासी जगातील सीमारेषा धूसर केल्या. मानसिक संघर्षाच्या काळात त्याला योग्य मानवी आधार मिळाला नाही आणि तो यंत्राशी अधिक संवाद साधत राहिला. ही घटना आपल्याला एक महत्त्वाचा धडा देते. चॅटबॉट्स हे मित्र, पालक, शिक्षक किंवा समुपदेशक यांची जागा घेऊ शकत नाहीत. ते सहायक असू शकतात परंतु ते मानवी नात्यांचा पर्याय असू शकत नाहीत.

एखादे मूल भावनिक संकटात असते, तेव्हा त्याला सहानुभूती, समजूतदारपणा आणि मानवी स्पर्शाची गरज असते. ही गरज कोणतेही यंत्र पूर्ण करू शकत नाही. आणखी एक गंभीर धोका म्हणजे चुकीची माहिती. एआय चॅटबॉट्स अनेकदा आत्मविश्वासाने चुकीची उत्तरे देऊ शकतात. टीनएज मुलांमध्ये माहितीची पडताळणी करण्याची सवय नसल्यास ते अशा उत्तरांवर सहज विश्वास ठेवू शकतात. त्यामुळे डिजिटल साक्षरता आणि चिकित्सक विचारसरणी विकसित करणे अत्यावश्यक बनते. गोपनीयतेचाही प्रश्न तितकाच महत्त्वाचा आहे. अनेक मुले नकळत आपली वैयक्तिक माहिती, छायाचित्रे, आवडी-निवडी किंवा कौटुंबिक माहिती चॅटबॉट्सशी शेअर करतात. ही माहिती भविष्यात कशाप्रकारे वापरली जाईल याची त्यांना कल्पना नसते. त्यामुळे मुलांना माहिती सुरक्षेचे शिक्षण देणे अत्यावश्यक आहे. या पृष्ठभूमीवर तंत्रज्ञान विकसित करणाऱ्या कंपन्यांवर मोठी जबाबदारी येते. वयानुसार सुरक्षितता नियंत्रण, संवेदनशील विषयांवरील निर्बंध, आत्महत्येसारख्या संकटाच्या परिस्थितीत त्वरित मदतसेवा सुचवणे, पालक नियंत्रण सुविधा आणि संवादाचे नैतिक परीक्षण यांसारख्या उपाययोजना प्रत्येक एआय प्रणालीत असणे आवश्यक आहे. ■

(लेखक उद्योजक व संगणक साक्षरता प्रसारक आहेत.)

## वेध

**विजय कुळकर्णी**

# काय आहे एफएमजीई परीक्षा?

आपण डॉक्टर व्हावे. आपले व आपल्या कुटुंबाचा समाजात चांगला लौकिक करावा. परिवाराला आर्थिक हातभार लावावा, असे स्वप्न अनेक विद्यार्थी उराशी बाळगून असतात. मात्र, सर्वांचे हे स्वप्न पूर्ण होतेच, असे नाही. कारण, अनेक विद्यार्थ्यांना पात्रता प्रवेश परीक्षा चांगल्या गुणांनी उत्तीर्ण न झाल्यामुळे वैद्यकीय अभ्यासक्रमाला प्रवेश मिळू शकत नाही. वैद्यकीय अभ्यासक्रमासाठी असलेली पात्रता प्रवेश परीक्षा उत्तीर्ण करण्यासाठी कमीत कमी १२० गुण आवश्यक असतात. पण, त्या विद्यार्थ्यांना शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेश मिळत नाही. असे असले तरी, खाजगी वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेश मिळू शकतो. पण, त्यासाठी असलेले शैक्षणिक शुल्क भरमसाट असते. अंदाजे १ कोटी रु. लागतात. एवढे पैसे भरण्याची सर्वांचीच आर्थिक परिस्थिती नसते. ज्यांची असते ते पालक आपल्या पाल्यांना खाजगी वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेश देतात. अशा वेळी काही जण परदेशात वैद्यकीय शिक्षण घेण्याचा सल्ला देतात. रशिया, चीन, युक्रेन, फिलिपिन्स इत्यादी देशांत आपल्या देशातील खाजगी महाविद्यालयांपेक्षा कमी पैशात वैद्यकीय शिक्षण मिळते. आपल्या देशात १ कोटी रु. लागत असतील तर, तिकडे ३० ते ४० लाखांत हे शिक्षण घेऊन एमबीबीएसची पदवी मिळविता येते. पण, असा सल्ला जर कोणी देत असेल आणि आपण त्यानुसार परदेशात जाण्याची तयारी करीत असाल तर, जरा थांबा. कारण, केवळ तिकडची डिग्री घेतली म्हणजे भारतात आपल्याला प्रॅक्टिस करता येईल, असे समजू नका. भारतात प्रॅक्टिस करण्यासाठी एफएमजीई या पात्रता परीक्षेच्या दिव्यातून जावे लागते. आता एफएमजीई ही काय भानगड आहे, असे साहजिकच आपल्या मनात प्रश्न उत्पन्न होईल. तर, एफएमजीई म्हणजे फॉरेन मेडिकल ग्रॅज्युएट एक्झामिनेशन.

परदेशातून एमबीबीएसची पदवी घेऊन येणाऱ्या विद्यार्थ्यांसाठीच ही परीक्षा आहे. म्हणजे, एखाद्या विद्यार्थ्याला वैद्यकीय शिक्षण पात्रता परीक्षेत १२० गुण मिळाले. त्याने भारतातीलच एखाद्या खाजगी वैद्यकीय महाविद्यालयातून वैद्यकीय शिक्षणाची पदवी मिळविली असल्यास त्याला अशी कोणतीही परीक्षा न देता प्रॅक्टिस सुरू करता येते. पण, परदेशातून अशी पदवी प्राप्त करून आल्यावर त्या विद्यार्थ्याला एफएमजीई ही परीक्षा द्यावीच लागते. केवळ परीक्षा देऊन भागत नाही तर, ती उत्तीर्ण करावी लागते आणि उत्तीर्ण होण्यासाठी किमान ५० टक्के गुण मिळवावे लागतात. म्हणजे ३०० गुणांच्या पेपरमध्ये किमान १५० गुण प्राप्त झाले तरच तो विद्यार्थी उत्तीर्ण होतो. अन्यथा परदेशातील वैद्यकीय पदवीचा कोणताही उपयोग होत नाही. त्यामुळे एमबीबीएस झाला असला तरी तो विद्यार्थी १२ वी पासच समजला जातो. २००२ साली तत्कालीन सरकारने ही परीक्षा सुरू केली होती. यावर्षी जूनमध्ये ही परीक्षा घेण्यात आली. नुकताच निकालही जाहीर झाला. या परीक्षेला देशभरातून ३७ हजार ४४८ विद्यार्थी बसले होते. त्यापैकी ३१ हजार ६४५ नापास झाले. त्यातही ४ हजार १५७ विद्यार्थी असे आहेत ज्यांना १४० ते १४९ दरम्यान गुण मिळाले. तर, ६३२ विद्यार्थ्यांना १४९ गुण प्राप्त झाले. त्यामुळे ते नापास झाले. आता या विद्यार्थ्यांना पुन्हा ही परीक्षा द्यावी लागणार आहे. या परीक्षेत विचारण्यात आलेले प्रश्न मास्टर्स म्हणजे एम. डी. अभ्यासक्रमातील होते, असे विद्यार्थ्यांचे म्हणणे आहे. खरं म्हणजे ज्या देशातून या विद्यार्थ्यांनी वैद्यकीय पदवी मिळविली आहे, त्या देशाने त्यांना त्याच देशात प्रॅक्टिस करण्याची परवानगी दिली आहे. आता कोणताही देश आपल्या देशातील नागरिकांच्या जिवाशी खेळणार नाही, हे नक्की. मग, भारतात आल्यावर एवढी कठीण परीक्षा घेण्याचे कारण काय? असा निर्णय घेताना तत्कालीन सरकारच्या मनात काय होते? या प्रश्नांची उत्तरे शोधावी लागणार आहे. यावर्षी घेण्यात आलेल्या परीक्षेचे हॉल तिकीट विद्यार्थ्यांना चार दिवस अगोदर ऑनलाईन पाठविण्यात आले. त्यात केवळ परीक्षा कोणत्या शहरात होणार एवढेच सांगितले होते. विद्यार्थ्यांनी परीक्षा होणाऱ्या ज्या शहरांची नाव दिली होती, त्यापैकी त्यांच्या शहरापासून लांब असलेल्या शहरात त्यांना परीक्षा केंद्र देण्यात आले. कदाचित अलिकडे झालेल्या पेपरफुटीच्या प्रकरणांमुळे असे करण्यात आले असावे. देशांतर्गत वैद्यकीय शिक्षण स्वस्त झाल्यास आपले विद्यार्थी परदेशात वैद्यकीय शिक्षण घेण्यासाठी जाणारच नाहीत. तेव्हा, सरकारने याकडे गांभीर्याने लक्ष देण्याची गरज आहे. ■

८८०६००६१४९

## दिल्ली वार्तापत्र

**श्यामकांत जहागीरदार**

# पंजाब काँग्रेसमधील गटबाजीचा दुसरा अंक

पंजाब विधानसभेची निवडणूक अद्याप जाहीर झाली नसताना प्रदेश काँग्रेसमध्ये कलगीतुरा सुरू झाला आहे. निवडणुकीच्या तयारीला लागायच्या आधी काँग्रेस नेतृत्वाची ताकद राज्यातील नेत्यांची मनधरणी करण्यात खर्ची पडत आहे. हा सगळा वाद सुरू झाला, तो अमरिंदरसिंग राजा वडिंग यांना प्रदेश अध्यक्ष पदावर कायम ठेवण्याच्या काँग्रेस नेतृत्वाच्या निर्णयामुळे. माजी मुख्यमंत्री चरणजितसिंग चन्नी यांना प्रदेश अध्यक्ष व्हायचे होते, म्हणजे पंजाब विधानसभेची निवडणूक आपल्या नेतृत्वात लढवायची होती. राज्यातील बहुतांश काँग्रेस नेत्यांचा त्यांना पाठिंबाही होता. या वादावर तोडगा काढण्यासाठी काँग्रेसच्या नेतृत्वाने तीन सदस्यीय समिती पंजाबला पाठवली. अजय माकन, मीनाक्षी नटराजन आणि भजनलाल यादव यांच्या समितीने राज्यातील सर्व स्तरावरील काँग्रेस नेत्यांशी चर्चा करीत अमरिंदरसिंग राजा वडिंग यांना हटवत चन्नी यांना प्रदेश अध्यक्ष करण्याची शिफारस केली. मात्र, काँग्रेसच्या नेतृत्वाने ही शिफारस फेटाळून लावत अमरिंदरसिंग यांना अध्यक्ष पदावर कायम ठेवण्याचा निर्णय घेत चन्नी यांची प्रदेश प्रचार समितीचे अध्यक्ष म्हणून नियुक्ती केली.

येथून वाद चिघळला. चन्नी गटाने बंडखोरीचे निशाण फडकवले. अध्यक्ष नाही तर चन्नी यांना मुख्यमंत्रिपदाचा उमेदवार जाहीर करा, अशी मागणी त्यांच्या गटातर्फे करण्यात आली. पक्षांतर्गत गटबाजी टाळण्यासाठी सामूहिक नेतृत्वाच्या आधारावर विधानसभा निवडणूक लढवायची काँग्रेस नेतृत्वाची भूमिका होती. विशेष म्हणजे प्रदेश अध्यक्ष अमरिंदरसिंग राजा वडिंग यांनी मुख्यमंत्रिपदाच्या वादापासून स्वतःला दूर ठेवले. चन्नी वा अन्य कोणताही काँग्रेस नेता मुख्यमंत्रिपदाच्या शर्यतीत राहू शकतो, पण मी त्या शर्यतीत नाही. राहुल गांधी ज्याला मुख्यमंत्रिपदाचा उमेदवार जाहीर करतील, त्याच्यासोबत मी उभा राहील, अशी संयमित प्रतिक्रिया त्यांनी व्यक्त केली.

राज्यातील परिस्थिती हाताबाहेर जात असल्याचे लक्षात आल्यावर काँग्रेसच्या नेतृत्वाने डॅमेज कंट्रोलसाठी प्रदेश प्रभारी भूपेश बघेल यांना तातडीने पंजाबमध्ये पाठवले. पण चन्नी गटाने त्यांच्याशी चर्चा न करता दिल्ली गाठली आणि आम्ही फक्त काँग्रेसच्या नेतृत्वाशीच चर्चा करू, अशी भूमिका घेतली. या वादात काँग्रेस नेते मनीष तिवारी यांच्या नाराजीचे वेगळे उपकथानकही आहे. राज्यातील निवडणूक समितीत स्थान न मिळाल्यामुळे तिवारी यांनी समाजमाध्यमातून आपली नाराजी व्यक्त केली.

पंजाब काँग्रेसला तसाही गटबाजीचा शाप आहे. २०२२ च्या विधानसभा निवडणुकीच्या आधीही पंजाब काँग्रेसमध्ये वाद झाला होता, त्यावेळी वादाचा केंद्रबिंदू अमरिंदरसिंग होते; आणि योगायोग म्हणजे २०२६ मध्येही प्रदेश काँग्रेसमध्ये जो वाद सुरू आहे, त्या वादाचा केंद्रबिंदूही अमरिंदरसिंग आहेत. फरक म्हणजे त्यावेळचे अमरिंदरसिंग कॅप्टन होते आणि आताचे अमरिंदरसिंग राजा वडिंग आहेत.

२०२६ मध्ये चरणजितसिंग चन्नी आणि अमरिंदरसिंग राजा वडिंग यांच्यात जसा वाद सुरू आहे, तसाच २०२२ मध्ये कॅप्टन अमरिंदरसिंग आणि नवज्योतसिंग सिद्धू यांच्यात सुरू झाला होता. २०१७ ची निवडणूक काँग्रेसने जिंकली आणि कॅप्टन अमरिंदरसिंग मुख्यमंत्री झाले. २०१७ ची निवडणूक आपली शेवटची निवडणूक आहे, यानंतरही आपण निवडणूक लढणार नाही, असा भावनिक प्रचार तेव्हा कॅप्टन अमरिंदरसिंग यांनी केला होता. त्यामुळे काँग्रेसला बहुमत मिळाल्यानंतर कॅप्टन मुख्यमंत्री झाले. २०१७ च्या विधानसभा निवडणुकीच्या आधी सिद्धू यांनी भाजप सोडून काँग्रेसमध्ये प्रवेश केला. सिद्धू हे राज्यातील काँग्रेसचे भविष्य असल्याची प्रतिक्रिया तेव्हा प्रदेश प्रभारी असलेले हरीश रावत यांनी व्यक्त केली होती; पण याच सिद्धूंनी नंतर राज्यातील काँग्रेसचे भविष्य अंधकारमय केले. काँग्रेसच्या नेतृत्वालाही तेव्हा सिद्धू यांच्याकडून खूप अपेक्षा होत्या. कॅप्टन अमरिंदरसिंग यांच्या मंत्रिमंडळात सिद्धू यांचा समावेश झाला, पण या दोघांचे काही जमले नाही. कॅप्टन अमरिंदरसिंग आणि नवज्योतसिंग सिद्धू यांच्यात वाद नाही तर संघर्ष सुरू झाला. त्यामुळे काँग्रेसच्या नेतृत्वाने कॅप्टन अमरिंदरसिंग यांनी मुख्यमंत्रिपदावरून हटवत त्यांच्या जागेवर चरणजितसिंग चन्नी यांना मुख्यमंत्री केले. एवढेच नाही तर सुनील जाखड यांना प्रदेश अध्यक्ष बनवले. मात्र, सिद्धू यांचे समाधान झाले नाही. मुख्यमंत्रिपदावर डोळा असलेल्या सिद्धू यांचे नंतर चन्नी यांच्याशीही पटले नाही, दोघांतील संबंध तणावपूर्ण झाले. त्याची परिणती राज्यातील काँग्रेसच्या सत्ता गमावण्यात झाली. विशेष म्हणजे मुख्यमंत्रिपद गमावल्यामुळे कॅप्टन अमरिंदरसिंग यांनी काँग्रेस सोडत आधी आपला वेगळा पक्ष स्थापन केला आणि नंतर भाजपात प्रवेश केला, तर नवज्योतसिंग सिद्धू यांनी आधी काँग्रेस आणि राजकारणही सोडले. आज सिद्धू कुठे आहे, हे कोणालाही माहीत नाही. कॅप्टन अमरिंदरसिंग आणि सिद्धू यांच्यात वाद सुरू होता, तेव्हा सुनील जाखड प्रदेश काँग्रेस अध्यक्ष होते. काही दिवसांनी सुनील जाखड यांनीही काँग्रेसला कंटाळून भाजपात प्रवेश केला. आताआतापर्यंत सुनील जाखड पंजाब भाजपाचे अध्यक्ष होते. पंजाब काँग्रेसमध्ये जेव्हा जेव्हा वाद झाला, त्याचा फायदा भाजपाला झाला आहे. यावेळी पंजाब भाजपा अध्यक्षांनी चरणजितसिंग चन्नी यांना भाजपात येण्याचे निमंत्रण देऊन टाकले. दुसरीकडे पंजाब काँग्रेसचे नेते सुखजिंदरसिंह रंधावा यांनी गृहमंत्री अमित शाह यांची नुकतीच भेट घेतल्यामुळे वेगळी चर्चा सुरू झाली आहे. पंजाब प्रदेश काँग्रेसमधील ताज्या पेचप्रसंगांची परिणती अखेर कशात होणार, हे आताच सांगता येणार नाही. या वादात अमरिंदरसिंग राजा वडिंग यांचा बळी जाणार की चरणजितसिंग चन्नी माघार घेणार, हे आताच सांगता येणार नाही. मात्र एक नक्की आहे, याचा फटका काँग्रेसला बसणार! राज्यात तशीही काँग्रेस सत्तेवर येण्याची शक्यता नाहीच्या बरोबर आहे. काँग्रेसची यात दुहेरी गोची आहे. काँग्रेस चन्नी यांच्यावर कोणतीही कारवाई करू शकत नाही. कारण चन्नी हे राज्यातील दलित नेते आहेत आणि पंजाबमध्ये दलित मतदारांची संख्या ३० ते ३५ टक्के आहे. चन्नी यांच्यावर कोणतीही कारवाई केली तर दलितांची नाराजी काँग्रेसला ओढवून घ्यावी लागेल; जी काँग्रेसला परवडणारी नाही. २०२२ च्या विधानसभा निवडणुकीतील पराभवानंतर काँग्रेसने अमरिंदरसिंग राजा वडिंग यांना प्रदेश अध्यक्ष बनवले. आपल्या अध्यक्षपदाच्या कार्यकाळात अमरिंदरसिंग यांनी काँग्रेसला लोकसभा निवडणुकीत चांगले यश मिळवून दिले. त्यामुळे राज्यातील विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर त्यांना हटवणे काँग्रेसच्या नेतृत्वाला योग्य वाटले नाही, त्यामुळे त्यांना अध्यक्षपदावार कायम ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला. २०२२ मध्ये काँग्रेसच्या राज्यातील पराभवाची पटकथा सिद्धू यांनी लिहिली, यावेळी त्या भूमिकेत चरणजितसिंग चन्नी आहेत. पंजाबमध्ये काँग्रेसला पराभूत करण्यात भाजपाला फारसे कष्ट घ्यावे लागणार नाही, भाजपाची ही जबाबदारी राज्यातील काँग्रेसच्या नेत्यांनी आपल्या शिरावर घेतली आहे आणि ती ते प्रामाणिकपणे पार पाडतील, यात शंका नाही. पंजाब काँग्रेसच्या नेत्यांनी राजकीय आत्महत्या करण्याचे ठरविले असेल तर त्याला कोणी कसे काय रोखू शकणार? ■

९८८१७१७८१७

### समाधान, शांती आणि आरोग्य...

मानवी जीवनात सुख, समाधान आणि मानसिक शांतता यांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. आजचा माणूस सुखाच्या शोधात सतत धावत आहे. अधिक पैसा, मोठे घर, महागड्या वस्तू यांनाच सुख समजले जाते. परंतु खरे सुख साधेपणात आणि समाधानात दडलेले असते. साधे जीवन जगणारा माणूस आनंदी, निरोगी आणि शांत राहतो. अनेक थोर व्यक्तींनी साधेपणाने जीवन जगून समाजाला आदर्श घालून दिला. साधे जीवन म्हणजे गरजा मर्यादित ठेवणे, अनावश्यक खर्च टाळणे आणि प्रामाणिकपणे जीवन जगणे. साध्या जीवनामुळे मनावर ताण कमी येतो. कमी अपेक्षा ठेवल्यास माणूस जे आहे त्यात समाधान मानतो. त्यामुळे मानसिक शांती मिळते. नियमित दिनचर्या, साधा आहार आणि व्यायाम यामुळे शरीर निरोगी राहते. माणसामध्ये नम्रता, प्रामाणिकपणा, सहकार्य आणि प्रेम या गुणांचा विकास होतो. तो इतरांना मदत करण्यासही नेहमी तयार असतो. त्यामुळे समाजातही चांगले संबंध निर्माण होतात. साधेपणाने जगणारी व्यक्ती निसर्गाच्या सान्निध्यात, कुटुंबाच्या प्रेमात आणि



चांगल्या नातेसंबंधांत खरे समाधान शोधते. प्रत्येकाने आपल्या जीवनात साधेपणाचा स्वीकार करावा.

साधेपणामुळे माणूस इतरांच्या दुःखाची जाणीव ठेवतो, समाजाशी जोडला जातो आणि पर्यावरणाचेही संरक्षण करण्यास हातभार लावतो. साधेपणा हा जीवनातील खरा आनंद आणि समाधान मिळवून देणारा मार्ग आहे. तो आपल्याला स्वार्थ, दिखाऊपणा आणि अनावश्यक स्पर्धेपासून दूर ठेवतो. शेवटी असे म्हणता येईल की, खरे सुख संपत्तीत नसून समाधानात असते. साधेपणा, प्रामाणिकपणा आणि सकारात्मक विचार यांच्या आधारावर जगलेले जीवन खऱ्या अर्थाने सुखी आणि समाधानी असते. साधे जीवन जगून उच्च विचार जोपासल्यास वैयक्तिक तसेच सामाजिक जीवन अधिक आनंदी, शांत आणि निरोगी होईल.

**श्रीकांत संभाजी मगर**/९६८९११७१६९

## वाचक पत्रे

### लोकप्रतिनिधींनी कायद्याचा आदर करावा

कल्याण डोंबिवली महानगर पालिकेच्या डॉक्टर व परिचारिकांना एका नगरसेवकाने बेदम मारहाण केल्याची बातमी वाचण्यात आली. नगरसेवकाने डॉक्टर व परिचारिकांना मारहाण करतानाचा व्हिडीओ देखील समाज माध्यमात व्हायरल झाला आहे. डॉक्टर आणि परिचारिकांना मारहाण करण्याची नगरसेवकाची कृती चुकीचीच आहे. डॉक्टर असो की परिचारिका, अधिकारी असो की कर्मचारी जर चुकीचे वागत असतील तर लोकप्रतिनिधींनी त्यांच्या विरोधात कायदेशीर कारवाई करावी. त्यांची तक्रार वरिष्ठांकडे किंवा मुख्यमंत्र्यांकडे करावी. अधिकाऱ्यांना अशाप्रकारे अपमानित करणे, मारहाण करणे लोकप्रतिनिधींना शोभत नाही. लोकप्रतिनिधीच कायदा हातात घेऊ लागले तर देशात अराजकता माजेल. अधिकारी आणि लोकप्रतिनिधी ही लोकशाहीच्या रथाची दोन चाके आहेत. ती सोबत चालली तरच लोकशाहीचा रथ पुढे ओढता येईल याचे भान दोघांनीही ठेवायला हवे.

**श्याम ठाणेदार**/पुणे. ९९२२५४६२९५

■■■

### प्रदूषण टाळा, नद्या वाचवा

भारतात अनेक नद्या आहेत. नद्या जीवनदायिनी आहेत. प्राचीन काळी नद्यांच्या काठानेच मनुष्याने वस्ती वसवली. मनुष्य, प्राणी, पक्षी यांचे जीवन या नद्यांच्या जलावर अवलंबून आहे. पण भारतात पवित्र मानल्या जाणाऱ्या या नद्या आज प्रदूषित झाल्या आहेत आणि याला मनुष्यच कारणीभूत आहे. जलप्रदूषणाच्या अनेक कारणांपैकी औद्योगिक सांडपाणी मुख्यत्वे आहे. मोठे उद्योग, कारखाने यातील रासायनिक पाणी, कचरा नदीत सोडला जातो. तसेच घरगुती कचरा, प्लास्टिक इत्यादी गोष्टींमुळे सुद्धा जलप्रदूषण होते. त्याचप्रमाणे हल्ली शेतीसाठी पिकांवर रासायनिक फवारणी केली जाते, त्यामुळे सुद्धा नद्यांचे पाणी प्रदूषित होते. काही ठिकाणी नदीकाठी कपडे धुतले जातात, त्यातील डिटर्जंटने जलप्रदूषण होते. नदीतील जल प्रदूषित झाल्यास त्याच्या वापरामुळे मनुष्याच्या व प्राण्यांच्या आरोग्यावर त्याचा गंभीर परिणाम होतो. प्रदूषित गढूळ पाणी प्यायल्याने कॉलरा, कॅन्सर, त्वचाविकार, श्वसनाचे विकार मनुष्याला होतात. तर प्राणी सुद्धा याला बळी पडतात. पाण्यात रसायने जमा झाल्याने शेवाळाची वाढ होते. त्यामुळे पाण्यातील ऑक्सिजन कमी होतो. त्याचा गंभीर परिणाम जलचरांवर होतो. ज्या पाण्याशिवाय आपण एक क्षणही राहू शकत नाही त्याबद्दल आपली उदासीनता नव्हे कृतघ्नपणा यावरून दिसून येतो. यावर उपाय म्हणून कारखान्यांच्या सांडपाण्यातील विषारी घटक कमी करणे, पर्यावरणपूरक उत्पादने वापरणे, कीटकनाशकांऐवजी जैविक खते वापरणे. यामुळे काही प्रमाणात का होईना प्रदूषण कमी होईल. ■

**माधवी पत्की**/नागपूर

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
**tbedit2016@gmail.com**

# आर. गंगाधरण यांना दुहेरी मुकुट

## वरिष्ठांची जागतिक मानांकन लॉन टेनिस स्पर्धा

### सोलापूरचे राजीव देसाई व विकास सोनी यांना उपविजेतेपद




**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, ८ जुलै -**

सोलापूर जिल्हा लॉन टेनिस संघटनेने अखिल भारतीय लॉन टेनिस संघटना व महाराष्ट्र राज्य लॉन टेनिस संघटनेच्या मान्यतेखाली आयोजित केलेल्या वरिष्ठांच्या पाचव्या जागतिक मानांकन लॉन टेनिस स्पर्धेत ७५ वर्षांवरील पुरुष गटात आर. गंगाधरण यांनी एकेरी व दुहेरी या दोन्ही गटात विजेतेपद पटकावत दुहेरी मुकुट संपादन केला.

एमएसएलटीए टेनिस सेंटर, जिल्हा क्रीडा संकुल आणि इलिझियम क्लबच्या मैदानावर सुरू असलेल्या या स्पर्धेत ७५ वर्षांवरील पुरुष गटात बिगर मानांकित आर. गंगाधरणने तिसऱ्या मानांकित गोविंद कुमारचा ६-२, ६-१ असा पराभव करून विजेतेपद पटकावले. दुहेरीत याच गटात राजेंद्र अगरवाल व आर. गंगाधरण यांनी मुकेश बजाज व शैलेंद्र खंडेलवाल यांचा ६-७(५), ६-२, १०-२ असा पराभव करून विजेतेपद पटकावले.

५५ वर्षांवरील पुरुष गटात अंतिम लढतीत दुसऱ्या मानांकित तुलेश्वर सिंग थोंगबम याने अव्वल मानांकित सुधीर गोठेचा ४-६, ६-३, १०-६ असा तर, ६० वर्षांवरील पुरुष गटात अव्वल मानांकित नागराज रेवणसिद्धियाहने तिसऱ्या मानांकित राज दत्त यांचा ६-३, ६-१ असा पराभव करून विजेतेपदाचा मान पटकावला.

६५ वर्षांवरील पुरुष गटात तिसऱ्या मानांकित प्रमोद दिक्षितने चौथ्या मानांकित मेहेरप्रकाश कोडुरीचा ६-४, ६-१ असा पराभव करून विजेतेपद पटकावले.

दुहेरीत ६० वर्षांवरील पुरुष गटात दुसऱ्या मानांकित नागराज आर व अमित सांगल यांनी राजीव देसाई व विकास सोनी यांचा ६-१, ६-४ असा पराभव करून विजेतेपद पटकावले.

स्पर्धेतील विजेत्या व उपविजेत्या खेळाडूंना करंडक अशी पारितोषिके देण्यात आली. स्पर्धेचे पारितोषिक वितरण ओएसिस मॉलचे व्यवस्थापकीय संचालक सिद्धार्थ गांधी व भारतीय टेनिस संघाचे माजी जेष्ठ प्रशिक्षक ताहिर अली यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी स्पर्धा संचालक रामा राव डोसा, एम एसएलटीएचे सह सचिव राजीव देसाई, आयटीएफ सुपरवायझर वैशाली शेकटकर आदी मान्यवर उपस्थित होते.

**अंतिम निकाल :**

**६० वर्षांवरील पुरुष:** नागराज रेवणसिद्धियाह१(भारत)वि.वि.राज दत्त३(भारत)६-३, ६-१.

**७० वर्षांवरील पुरुष:** तुलसी रामू बिलिकेरे सिद्धराजू१(भारत)वि.वि. एकनाथ किणीकर(भारत)६-२, ६-०.

**दुहेरी: ५५ वर्षांवरील पुरुष:** सुधीर गोठे/विमल रॉय२(भारत) वि.वि.जयप्रकाश निषाद/तुलसीवर सिंग थोंगबम१(भारत) ७-६(३), ६-२.

**६५ वर्षांवरील पुरुष:** अजित भारद्वाज/राकेश कोहली१(भारत) वि.वि.ओंकार दिक्षित/प्रमोद दिक्षित२(भारत)७-५, ६-२.

---

## IN THE COURT OF CIVIL JUDGE, INDI AT : INDI

O.S.No. 377/2016

**1. Rayawwa W/o Bhaganna Koli And others. - Plaintiffs**

Vs.

**1. Yallappa S/o Neelappa Talawar And others - Defendants**

**NOTICE TO DEFENDANT NO. 1(A) To 1(C) and 1(E)**

Defendant No.1 legal heirs

**1(a) Mayakka W/o Siddaram Koli**
Age: 50 years, Occ: H.H.Work,.
R/o Kale, Tq: Karad, Dist: Satara. Pin-415104.

**1(b) Siddappa S/o Yallappa Koli**
Age: 42 years, Occ: Agril,
R/o Santkabir Nagar, Bhosale Military, (Moodal Colony) Nasik, Tq: & Dist:Nasik (MS). Pin-422007.

**1(c) Dyamakka W/o Baburao Koli,**
Age: 40 years, Occ: H.H.Work,
R/o Durga Nagar, Nasik,
Tq: & Dist:Nasik (MS). Pin-4220071

**1(e) Sadashiv S/o Yallappa Koli**
Age: 36 years, Occ: Driver
R/o Durga Nagar, Nasik, Tq: & Dist:Nasik (MS). Pin-4220071

**NOTICE U/S 5 RULE 20(1A) OF C.P.C.**

Whereas the above named plaintiffs have instituted a suit against you in above said court, you are herby summoned to appear in this court either in person or through Advocate duly instructed by you on the date of 23/07/2026 in the forenoon to answer the claim and you are directed to produced to produce on the day all the documents upon which you intend to rely in support of your defense.

Take summons that in default of your appearance on the day fixed your appearance in above mentioned suit will be heard and determined in your absence.

Given under my hand and seal of the court this day. 06/07/2026

**(Signature)**
**Advocate for Plaintiff**
**S.G.Kulkarni, Advocate**
**Indi**

Court Stamp

**(Signature)**
**(Shri.R.Y.Bhavimani)**
**Sr. Shirastedar (Admn)**
**Civil Judge Indi**

---

## सोलापूर महानगरपालिका सोलापूर

पत्ता - इंद्रभुवन, पुण्यश्लोक अप्पासाहेब वारद पथ,
रेल्वे लाईन्स, सोलापूर ४१३००१

**नगर अभियंता मुख्य कार्यालय**

**जा.क्र.नगर अभियंता/२०२६/५०५** **दिनांक - ०८/०७/२०२६**

सोलापूर महानगरपालिका क्षेत्रात मंडप, फर्निचर व इतर अनुषंगिक साहित्य भाडे तत्त्वावर पुरवठाबाबत वार्षिक मक्तेदार नेमणेबाबत.

१) Tender Id- 2026_SMC_1315399_1

या कामाचे टेंडर शासनाच्या https://mahatenders.gov.in या वेबसाईटवर दि. ०८/०७/२०२६ सकाळी ११ वा. पासून पाहण्यास उपलब्ध आहे.

**सही/-**
**(सारिका आकुलवार)**
**उप. नगर अभियंता**
**सोलापूर महानगरपालिका, सोलापूर.**

---

## भा.कृ.अनु.प.-राष्ट्रीय अनार अनुसंधान केंद्र, सोलापूर

**ICAR - National Research Centre On Pomegranate**

(Indian Council Of Agricultural Research)
NH-65, Solapur-Pune Highway, Kegaon, Solapur-413 255(M.S.)
T-(0217) 2354330, 2350074, 2350263, F-(0217) 2353533
E-mail : nrcpomegranate@gmail.com, Website: nrcpomegranate.icar.gov.in
**(ISO 9001:2015 Certified Institute)**

### WALK IN INTERVIEWA

Walk in interview will be held on 28/07/2026 10:30 AM at ICAR-National Research Centre on Pomegranate, Kegaon, Solapur for engagement of Part Time Medical Officer on contractual basis at a consolidated remuneration.

| Name of Post | Number of Posts |
|---|---|
| Part Time Medical Officer | 01 |

For more details of posts, application form, essential and desirable qualifications, Job requirements and the terms and conditions please visit our website: nrcpomegranate.in

**Sd/-**
**DIRECTOR**

---

## सावधानतेची जाहीर नोटीस

तमाम लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मिळकतीचे वर्णन :- डि. व सब डि. सोलापूर पैकी ता. उत्तर सोलापूर पैकी मौजे मंद्रुप येथील भुमापन क्र. १६३/२ यांसी एकूण क्षेत्र १हे.९० आर पो.ख. ०हे.०१ आर यांसी एकूण क्षेत्र १हे. ९१ आर यांसी आकार ४ रुपये ६० यापैकी क्षेत्र १हे.०९ आर + पो.ख. ०हे. ०१ आर असे एकुण क्षेत्र १ हे. १० आर यांसी आकार २ रुपये ६४ पैसे, अशी मिळकत ही आमचे अशिल चरणसिंग गुलाबसिंग लंगडेवाले यांचे आजोबा नामे जमनसिंग लंगडेवाले यांनी काबाडकष्ट करून वर नमूद जमीन त्यांचे नावाने विकत घेतली होती. सबब, सदरची मिळकत ही वडिलापार्जित असून त्यात आमचे अशिल चरणसिंग गुलाबसिंग लंगडेवाले यांचा देखील अविभक्त हिस्सा आहे. तसेच सदरची जमीन आजतागायत वाटणी झालेली नाही. सबब अशी वस्तुस्थिती असताना वर नमूद शेतजमीन ही ललिता उर्फ दुलारी गुलाबसिंग लंगडेवाले व जयसिंग गुलाबसिंग लंगडेवाले हे वर नमूद मिळकत तिऱ्हाईत इसमास विक्री करण्याचा प्रयत्न करीत आहेत. सदरची जमीन आमचे अशिलांच्या वडिलापार्जित असून त्यात आमचे अशिलांचा अग्रहक्काचा अधिकार आहे. सबब, वर नमूद मिळकतीमध्ये कोणीही कोणत्याही प्रकारचा खरेदी, विक्री, गहाण, दान, वगैरे हितसंबंध निर्माण करू नये व कसल्याही प्रकारचा व्यवहार करू नये. सदर वर नमूद मिळकतीवर आमचे अशिलांचा हिस्सा व अधिकार आहे. सबब, असे असताना सदर ललिता उर्फ दुलारी गुलाबसिंग लंगडेवाले व जयसिंग गुलाबसिंग लंगडेवाले हे वर नमूद मिळकत ही इतरत्र विक्री करून सदर मिळकतीमध्ये त्रयस्थ हक्क व हितसंबंध निर्माण करण्याच्या प्रयत्नात असल्याचे आमचे अशिलांना खात्रीलायक रित्या समजले आहे. सबब, या सावधानतेच्या जाहीर नोटीसीने तमाम लोकांना कळविण्यात येते की, वर नमूद मिळकतीबाबत कोणीही सदर ललिता उर्फ दुलारी गुलाबसिंग लंगडेवाले व जयसिंग गुलाबसिंग लंगडेवाले यांचेशी कसलाही प्रकारचा वर नमूद मिळकतीबाबत आर्थिक व्यवहार अथवा खरेदी विक्री, गहाणदाण, लिज, बोजा, भाडेकरार, इत्यादी तत्सम दस्ताने व्यवहार करू नये अन्यथा असे व्यवहार व करार मदार हे आमचे अशिल व वर नमूद मिळकतीवर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी. कोणाचीही फसवणुक होवू नये म्हणून ही सावधानतेची जाहीर नोटीस दिली असे. दि. ०८/०७/२०२६

**सही/-**
**ॲड. अशोक जी. श्रीवास्तव**
**५७, नेताजी नगर, जोडभावी पेठ,**
**सोलापूर. मो.नं. ९४२१०२४०९७**
**अशिल - चरण गुलाबसिंग लंगडेवाले**

---

## खरेदीपुर्व जाहीर नोटीस

सोलापूर येथील तमाम लोकांस विशेषतः सोलापूर येथील लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, मिळकतीचे वर्णन :- डि व सब डि सोलापूर पैकी तालुका दक्षिण सोलापूर येथील कुंभारी ग्रामपंचायत हद्दीतील सर्व्हे नंबर ६५७/१/१ यापैकी नियोजित विशाल नगर मधील प्लॉट नं. ३१ याचे हद्द पुर्वपश्चिम १२.१९ मी. दक्षिणोत्तर ६.१० मी असे एकुण क्षेत्र ७४.३६ चौ.मी अथवा ८०० चौ. फुट इतके आहे. सदर बिनशेती खुली प्लॉटची चतुःसिमा खालीलप्रमाणे पुर्वेस : रस्ता, दक्षिणेस : प्लॉट नं. ३०, पश्चिमेस : प्लॉट नं. ४०, उत्तरेस : रस्ता येणेप्रमाणे वर नमुद चतुःसिमेतील संपूर्ण खुली प्लॉट जागा ही श्रीनिवास पुडलिक एकबोटे यांच्या मालकी कब्जे वहिवाटीची असून त्यांनी सदरहू खुली प्लॉट जागा हि आमचे अशिलास कायम खुषखरेदीने देण्याचे ठरवून दिनांक ०८/०७/२०२६ रोजी इसारा रक्कम घेऊन साठेखत व कब्जा पावती करारपत्र आमच्या अशिलाच्या नावे लिहून देऊन सदर खुली प्लॉट जागा खरेदी देण्याचे ठरविले. व सदरहू खुली प्लॉट जागा हि निर्वेध व निजोखमीची आहे अशी हमी व खात्री मिळकतदारांनी आमचे अशिलास दिलेली आहे. तथापि, वर नमुद खुली प्लॉट जागेवर कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, मालकी, दावा, लीज, जप्ती, वारसा हक्क, दान, टाच, गहाण, बक्षीस पत्र, मुखत्यारपत्र, वहीवाटी हक्क, वाटणी हक्क, बँकेचे कर्ज, सावकारी कर्ज, खरेदी विक्री व्यवहार वगैरे वा अन्य प्रकारचे करार वा मदार असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ८ (आठ) दिवसांच्या आत कागदोपत्रानिशी व पुराव्यानिशी खालील नमुद पत्त्यावर लेखी हरकत नोंदवून खात्री करुन द्यावेत. अगर मुदतीत कोणाचेही कसल्याही प्रकारची हरकत व तक्रार न आल्यास वर नमुद खुली प्लॉट जागा मिळकत ही निर्वेध व निजोखमी आहे असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील मग मात्र कोणाचेही कसल्याही प्रकारचा हरकत, तक्रार चालणार नाही. व ते आमचे अशिलाच्या रजि. खरेदीखतावर मुळीच बंधनकारक राहणार नाही. कोणाचेही कसल्याही प्रकारची फसवणूक होऊ नये यास्तव सदरहू नोटीस दिली. तारीखः ०८ जुलै २०२६.

**सही/-**
**जी. एच. नोरा**
**बी.कॉम., एलएल.बी., ॲडव्होकेट**
**ऑफीस - २३५/१०/१ तेलंगी पाच्छा पेठ,**
**सोलापूर ४१३००५ मो. ९८२२२५५४५०**
**अशिल सौ. प्रभावती अंबुलाल पासकंटी**
**या अशिलातर्फे ॲडव्होकेट**

---

## MAHATRANSCO — SRM E-Tender Notice

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

Digitally signed online bids are invited through E-tender process of MSETCL in two-bid system from bidders who are registered Contractors of MSETCL. **RFx No.7000040664 E-Tender No. SE/EHV/O&M/Circle/SHP/E-Tender: 16/2026-27, Particulars:** Work of providing & fixing of additional jumpers on tension towers of the various lines by using boltless C-type wedge connectors for EHV LMSD I & II Baramati under EHV O&M Division Baramati. **Estimated cost:** Rs. 1,79,65,234.51/- **E.M.D. (Approx. 1% of est. cost):** Rs 1,79,652/- **Tender cost in Rs.** 5000.00+ GST, **Sale period:** 07.07.2026 to 23.07.2026 **Last Date of Submission:** 23.07.2026 up to 23:59 Hrs, **Date of opening (Tech. bid):** 24.07.2026 at 12:00 Hrs. (If possible). **Contact person:** Executive Engineer -7447440852 For further details

**Subsequent call intimations (2nd/3rd calls, if any) will not be re-published in newspapers and will only be available on the e-tender portal: please visit.**

**1) https://srmetender.mahatransco.in. 2) https://mahatransco.in**

**Note:** All eligible Supplier/Contractors are mandated to get enrolled on SRM E-enquiry (New) portal of MSETCL.

**Superintending Engineer, EHV O&M Circle Solapur**

---

## मध्य रेल्वे

**सोलापूर विभाग**

**सिग्नलिंगचे काम**

**निविदा सूचना क्र. SUR-N-T-2026-27-23, दिनांक: 07/07/2026;** मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागातील डीआरएम (S&T) कार्यालय, भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने, खालील कामांसाठी सक्षम आणि प्रतिष्ठित कंपन्या/कंत्राटदारांकडून रेल्वेच्या ई-प्रोक्योरमेंट वेबसाइट www.ireps.gov.in वर ऑनलाइन ई-निविदा मागवत आहे: अनुक्रमांक: 1, कामाचे नाव आणि ठिकाण: मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागात ट्रॅक मशीन साइडिंगसाठी पायाभूत सुविधांच्या विकासाशी संबंधित सिग्नलिंगचे काम. निविदा क्र.: SUR-N-T-2026-27-23, कामाचा अंदाजित खर्च: रु. 61,19,978.18, निविदा अर्जाचे मूल्य: शून्य (NIL), अनामत रक्कम: रु. 1,22,400, काम पूर्ण करण्याचा कालावधी: 12 महिने, निविदा बंद होण्याची तारीख आणि वेळ: 05/08/2026 रोजी 15:30 नंतर. तपशील ireps वेबसाइटवर उपलब्ध आहेत. शुद्धिपत्रक/बदल असल्यास ते केवळ वरील ई-प्रोक्योरमेंट वेबसाइटवरच अपलोड केले जातील. केवळ ऑनलाइन निविदा स्वीकारल्या जातील. मॅन्युअल/टपाल/ई-मेल/फॅक्स किंवा प्रत्यक्ष (by hand) सादर केलेल्या निविदा स्वीकारल्या जाणार नाहीत. बोलीदारांना विनंती आहे की त्यांनी कंपनीच्या नावासह क्लास III डिजिटल सिग्नेचर सर्टिफिकेट (Class III DSC) मिळवावे आणि त्याची www.ireps.gov.in वर नोंदणी करावी. अनामत रकमेचा (EMD) भरणा नेट बँकिंग, पेमेंट गेटवे किंवा बँक गॅरंटीद्वारे स्वीकारला जाईल; तसेच, मूळ बँक गॅरंटी निविदा दस्तऐवजात नमूद केलेल्या अधिकृत अधिकाऱ्याकडे बोली सादर करण्याच्या अंतिम तारखेपूर्वी (म्हणजेच बोली सादर करण्याच्या अंतिम दिवसाव्यतिरिक्त) प्रत्यक्ष सादर करणे आवश्यक आहे. अधिक तपशीलांसाठी कृपया www.ireps.gov.in ला भेट द्या.

**डीआरएम (एस अँड टी)**
29 **सोलापूर, मध्य रेल्वे**

**रेल्वे मार्ग अनधिकृतपणे ओलांडणे हा शिक्षेस पात्र गुन्हा आहे.**

---

## बँक ऑफ़ बड़ौदा / Bank of Baroda

**नवी पेठ, शाखा**
**पहिला मजला, डांगेकर कॉम्प्लेक्स, नवी पेठ, सोलापूर - ४१३००१**

### मागणी नोटीस U/S 13(2)

**सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेटस् ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट २००२ चे कलम १३(२) अनुसार नोटीस**

१. कर्जदाराचे, जामिनदार व कायदेशीर वारसदार यांचे नाव व पत्ता

| अ. क्र. | शाखा / कर्जदार / जामिनदार / गहाणदारांची नावे आणि पत्ते | मागणी नोटीसीची तारीख / अनुत्पादक मालमत्तेची तारीख | मंजूर कर्ज रक्कम | खाते क्रमांक / खात्याचा प्रकार / व्याज दर | येणे रक्कम | स्थावर / जंगम मालमत्तेचा तपशील |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | **श्री. लायेश बालाजी क्यातम**<br>रा. टु. नं. ०१, सीटीएस क्र. १०३८७, प्लॉट नं. ३३/३, सब प्लॉट क्र.२३ब, पश्चिमे कडील भाग, न्यु पाच्छा पेठ, सोलापूर ४१३००६<br>**सौ. अपेक्षा लायेश क्यातम**<br>रा. टु. नं. ०१, सीटीएस क्र. १०३८७, प्लॉट नं. ३३/३, सब प्लॉट क्र.२३ब, पश्चिमे कडील भाग, न्यु पाच्छा पेठ, सोलापूर ४१३००६ | ०१/०७/२०२६<br>१०/०८/२०२५<br><br>०१/०७/२०२६<br>१०/०८/२०२५ | रु. १६,२९,०००/-<br><br>रु. ९,२५,०००/- | (०६/१४३९)<br>गृह कर्ज-<br>७.१०%<br><br>(०६/२५१७)<br>टॉप अप लोन<br>१०.०५% | रु.१३,८४,१२८/- + व्याज + इतर खर्च<br><br>रु. ९,१४,४२५.३३ + व्याज + इतर खर्च<br><br>**एकुण येणे रु. २२,९८,५५३.३३/- + १०/०५/२०२५ पासूनचे व्याज + इतर खर्च**<br>(अक्षरी - बावीस लाख आठ्यानऊ हजार पाचशे त्रेपण्ण रुपये आणि तेहतीस पैसे फक्त) | सोलापूर जिल्हा व उप जिल्हा आणि उत्तर सोलापूर तालुका येथील सिटी सर्व्हे नंबर १०३८७, फायनल प्लॉट नंबर ३३/३, सब प्लॉट नंबर २३/ब एकुण क्षेत्रफळ २९०.०० चौ.मी. या मालमत्तेपैकी पश्चिमेकडील ४६.४६ चौ.मी. क्षेत्रफळाचा भाग, जी मालमत्ता सोलापूर महानगरपालिका हद्दीतील न्यु पाच्छा पेठ, सोलापूर येथे स्थित असून तिचा महानगरपालिका घर क्रमांक ३३/३/२३ असा आहे आणि जी श्री. लायेश बालाजी क्यातम व सौ. अपेक्षा लायेश क्यातम यांच्या मालकीची आहे. चतु:सिमा -<br>**पुर्वेस** : श्री अंबाजी आनंद कट्टा यांची सब प्लॉट नं. २३/ब ची मालमत्ता<br>**दक्षिणेस** : फायनल प्लॉट नं. ३३/३/२४<br>**उत्तरेस** : सब प्लॉट नं. २३/ब, आणि लहान बोळ<br>**पश्चिमेस** : रोड |

२) मुख्य कर्जदार (कर्जदार) याने / हिने / त्याच्या / त्यांच्या देणे रक्कमेची फरतफेड करण्यास कसूर केले असल्याने आम्ही यांचे / हिचे / त्याचे / त्यांचे खाते रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांनी जारी केलेल्या मार्गदर्शक सुचनांनुसार निश्चित केले आहे. ३) आपणांस ही सूचना सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेटस् ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट २००२ नुसार जारी करण्यात आली आहे, कारण रजिस्टर्ड पोस्टाने आपणांस पाठविण्यात आलेली नोटीस पोहोच न होता परत आली, यानुसार आपणांस पुढीलप्रमाणे रक्कमेची व्याजासह भरणा करण्यास बजावण्यात येत आहे. ४) आपणांस देण्यात आलेली कर्जसुविधेची रक्कम वरीलप्रमाणे मालमत्ता / सिक्युरिटीजद्वारे सुरक्षित करण्यात आली आहे ५) आता या जाहीर सूचनेद्वारे आम्ही आपणांस या सूचनेच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत येणे रक्कम, व्याज, भविष्यातील व्याज आणि प्रासंगिक खर्च आणि किंमत यांसह परत करण्याचा सल्ला देत आहोत. अन्यथा बँक सरफेसी ॲक्ट २००२ अनुसार कारवाई करतील. खाली सही करणार यांच्याकडे सदर मालमत्तांचा ताबा घेणे. त्यानंतर सदर मालमत्तांची विक्री करण्याचे अधिकार आहेत आणि ते सरफेसी ॲक्ट सेक्शन १३ अनुसार बँकेचे अधिकृत अधिकार आहेत.

**दिनांक - ०१-०७-२०२६, स्थळ - नवी पेठ, सोलापूर** **(मजकूरात संदिग्धता असल्यास इंग्रजी मजकूर ग्राह्य धरा)**

सही/- **अधिकृत अधिकारी**
**बँक ऑफ बडौदा**

---

नि.दि.दा. क्र. ३९३ / २०२२
शिवलीला वि. महादेव नि.क्र. ५१

## उमरगा येथील दिवाणी न्यायाधीश व. स्तर, यांच्या न्यायालयाात.

**वाद प्रश्न नक्की करण्यासाठी समन्स ( नियमक्रम ५, नियम १,५ )**

प्रति,
**८. शमशाद बेगम यूनूस जिकरे,**
रा. ३३ सिध्देश्वर नगर, दहिटणे,
हैद्राबाद रोड, जि. सोलापूर.

ज्याअर्थी अर्जदार शिवलिला सिध्दराम भालखेड, रा. तोरणी, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर, यांनी सोबतच्या नकलेप्रमाणे यासाठी तुमच्या विरुद्ध या न्यायालयात वाद दाखल केला आहे. त्याअर्थी ह्या वादासंबंधी तुम्हाला जे काही सांगायचे असेल ते सांगण्यासाठी दिनांक ३०/०७/२०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता तुम्ही स्वतः किंवा ज्यास योग्यरित्या सूचना दिलेल्या आहेत व जो वादासंबंधीच्या महत्वाच्या सर्व प्रश्नाची उत्तर देवू शकेल अशा वकिलामार्फत किंवा अशा सर्व प्रश्नांचे उत्तर देवू शकणारा एखादा इसम बरोबर असलेल्या वकिलामार्फत या न्यायालयात उपस्थित होण्यासाठी याद्वारे तुमच्यावर समन्स बजावण्यात येत आहे आणि याद्वारे तुम्हाला असा निर्देश देण्यात येत आहे कि, त्या दिवशी तुम्ही तुमच्या बचावाचे लेखी निवेदन दाखल करावे. व त्याच दिवशी तुमचा बचाव किंवा उलट वाद (सेट ऑफ) किंवा प्रतिवाद (काउंटर क्लेम) ज्या दस्त आधारलेला असेल असे तुमच्या ताब्यात किंवा नियंत्रणाखाली असलेले सर्व दस्त ऐवज सादर करावे आणि जर तुम्ही तुमच्या बचावाच्या किंवा उलट वादाच्या (सेट ऑफ) किंवा प्रतिवादाच्या (काउंटर क्लेम) पृष्ठ्यर्थ पुरावा म्हणून तुमच्या ताब्यात किंवा नियंत्रणाखाली असलेल्या किंवा नसलेल्या इतर कोणत्याही दस्ताऐवजावर विसंबून असाल तर अशा दस्ताऐवजाचे एक सुची करुन ती सुची तुमच्या बचावाच्या लेखी निवेदनास जोडावे.

तुम्हास नोटीस देण्यात येत आहे की, वर नमूद केलेल्या दिवशी उपस्थित राहण्यास कसूर केल्यास तुमच्या अनुपस्थितीत वादाची सुनावणी केली जावून त्याचा निर्णय केला जाईल. आणखी अशी नोटीस देण्यात येत आहे की, वर नमूद केलेल्या तारखेस किंवा तत्पूर्वी बजावणीकरिता तुमचा पत्ता दाखल करण्यात तुम्ही कसूर केल्यास तुमचा बचाव रद्द केला जाण्यास पात्र ठरेल. आज दि. ०७/०७/२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

**सही/-**
**सहाय्यक अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय, व.स्तर, उमरगा**

---

**जाहीर प्रसिध्दीकरण**

दि. कि. अर्ज नंबर ३७/२०२६
पुढील नेमलेली ता. २०/०८/२०२६ नि.नं. ५

## बार्शी येथील मे. सिव्हील जज्ज ज्युनिअर डिव्हीजन यांचे कोर्टात

**१. मनिषा युवराज गायकवाड,**
वय ३७ वर्षे, धंदा घरकाम,
रा. श्रीपत पिंपरी ता. बार्शी, जि. सोलापूर
**२. यश युवराज गायकवाड**
(अ.प.क - मनिषा युवराज गायकवाड)
वय - ११ वर्षे, धंदा - शिक्षण,
रा. श्रीपत पिंपरी ता. बार्शी, जि. सोलापूर
**३. विशाखा युवराज गायकवाड (लग्नापूर्वीचे नाव), विशाखा निखिल गोफण (लग्नानंतरचे नाव)**
वय २० वर्षे, धंदा - घरकाम,
रा. पिंपरी (आर) ता. बार्शी, जि. सोलापूर
— **अर्जदार**

विरुध्द

**कोणीही नाही** - **सामनेवाला**

**बॉम्बे रेग्युलेश ॲक्ट कलम २ प्रमाणे**

ज्याअर्थी यातील अर्जदार यांचे अनुक्रमे पति व वडील कै. युवराज भगवान गायकवाड याचा मृत्यू दि. ३०/०६/२०२५ रोजी बार्शी - श्रीपत पिंपरी रोडवर, श्रीपत पिंपरी, ता. बार्शी या ठिकाणी झालेला आहे. सदर प्रशासकीय व इतर शासकीय तसेच भविष्यकाली बाबींसाठी कायदेशीर वारस अर्जदार हे त्यांचे कायदेशीर वारस आहेत. त्यामुळे त्यांनी वारस प्रमाणपत्र मिळणेकरीता दिवाणी न्यायालय क. स्तर बार्शी येथे अर्ज केलेला आहे.

त्याअर्थी मयत कै. युवराज भगवान गायकवाड यांना अर्जदाराशिवाय इतर कोणी वारस असेल अथवा त्यांच्या विषयी काही म्हणणे असल्यास जाहीर प्रसिध्दी करणापासून ३० दिवसांच्या आत अथवा पुढील नेमलेली तारीख रोजी मे. कोर्टात हजर राहून आपले म्हणणे व हरकत लेखी स्वरुपात पुराव्यानिशी दाखल करावी. अन्यथा मुदतीत कोणाचेही हरकत वा म्हणणे आले नाही तर कुणाची काही म्हणणे नाही. असे समजुन यातील अर्जदारांना अर्जाप्रमाणे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल कळावे हे प्रसिध्दकरण मे. कोर्टाच्या सही शिक्क्यानिशी दिले असे. ता. ०८/०७/२०२६

**सही/-**
**कनिष्ठ लिपीक**
**बार्शी**

**सही/-**
**सहाय्यक अधिक्षक,**
**दिवाणी न्यायालय क. स्तर बार्शी,**
**ता. बार्शी, जि. सोलापूर**

---

## प्रिसिजन कॅमशाफ्टस् लिमिटेड

PRECISION

सी आय एन : L24231PN1992PLC067126
नोंदणीकृत कार्यालय : डी- ५, एम.आय.डी.सी., चिंचोळी, सोलापूर-४१३ २५५, महाराष्ट्र, भारत
फोन - +९१ ९१६८६४६५३६ / ३७, फॅक्स : ०२१७ - २३५७६४५
ई-मेल : cs@pclindia.in संकेतस्थळ : www.pclindia.in

### ३४ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना, ई-मतदान, बुक क्लोजर तारीख आणि लाभांशावरील कर

यानुसार सूचना देण्यात येते की, प्रिसिजन कॅमशाफ्टस् लिमिटेड (दि कंपनी) ची **३४ वी वार्षिक सर्वसाधारण सभा (एजीएम) गुरुवार, दिनांक ३० जुलै २०२६ रोजी (भारतीय प्रमाण वेळ) दुपारी ३.०० वाजता प्रत्यक्षात एका स्थळी उपस्थित न राहता व्हीडिओ कॉन्फरन्सिंग (व्हीसी)** किंवा अन्य दृकश्राव्य (ओएव्हीएम) सुविधेद्वारे कंपनी कायदा २०१३ (कायदा) मधील तरतुदी आणि त्याअंतर्गत करण्यात आलेल्या सुधारणा आणि आणि सिक्युरिटीज अँड एक्स्चेंज बोर्ड ऑफ इंडिया (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स आणि डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) रेग्युलेशन्स २०१५ च्या तरतुदींचे पालन करून आणि कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालय आणि सिक्युरिटीज आणि एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया (सेबी) द्वारे जारी केलेली विविध परिपत्रके आणि अधिसूचना नियमन (एकत्रितपणे 'MC-/ SEBI परिपत्रक' म्हणून संदर्भित) यातील तरतुदींचे पालन करून आयोजित करण्यात आली आहे. नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरी लिमिटेड (एनएसडीएल) द्वारे प्रदान केलेल्या व्हीसी / ओएव्हीएम सुविधेद्वारे सभासद वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये उपस्थित राहू शकतील.

पुढे ही सूचना देण्यात येत आहे की, कंपनी कायदा, २०१३ च्या कलम ९१, कंपनी (व्यवस्थापन आणि प्रशासन) नियम २०१४ च्या नियम १० आणि सेबी ( एलओडीआर ) २०१५ चे नियम ४२, सदस्यांची नोंदणी आणि कंपनीच्या समभाग रजिस्टर आणि हस्तांतरण पुस्तके शुक्रवार २४ जुलै २०२६ ते गुरुवार, ३० जुलै २०२६ (दोन्ही दिवस समाविष्ट) पर्यंत सभासदांना लाभांश मिळण्याचा हक्क निश्चित करण्यासाठी बंद राहतील. वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये लाभांश घोषित केला जाईल.

कंपनी कायदा २०१३ च्या कलम १०१ आणि १३६ आणि कंपनी (व्यवस्थापन आणि प्रशासन) नियम, २०१४ नुसार वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस आणि आर्थिक वर्ष २०२५-२६ च्या वार्षिक अहवालाच्या इलेक्ट्रॉनिक प्रती, ज्यांचे ई-मेल पत्ते ३ जुलै २०२६ रोजी कंपनी / डिपॉझिटरी पार्टिसिपंटकडे नोंदणीकृत आहेत, त्यांना पाठवल्या गेल्या आहेत.

कंपनी कायदा २०१३ च्या कलम १०८ नुसार,कंपनी (व्यवस्थापन आणि प्रशासन) नियम २०१४ चे नियम २० आणि सेबीचे (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अँड डिस्कोलजर रिक्वायरमेंट्स) रेग्यूलेशन्स २०१५च्या नियम ४४ अन्वये गुरुवार दिनांक २३ जुलै २०२६ या कट ऑफ तारिख असलेल्या दिवशीचे भागधारक एनएसडीएलच्या इलेक्ट्रॉनिक मतदान प्रणालीद्वारे वार्षिक सर्वसाधारण सभेच्या सूचनेमध्ये नमूद केलेल्या इलेक्ट्रॉनिक पद्धतीने मते देऊ शकतात. रिमोट ई-व्होटिंगचे तपशील खालीलप्रमाणे आहेत:

१. वार्षिक सर्वसाधारण सभेच्या सूचनेमध्ये नमूद केलेले व्यवसाय इलेक्ट्रॉनिक माध्यमातून मतदानाद्वारे व्यवहार केले जाऊ शकतात.

२. रिमोट ई-व्होटिंगचा कालावधी सोमवार, २७ जुलै २०२६ रोजी भारतीय प्रमाण वेळेनुसार सकाळी ९ वाजता सुरु होईल आणि बुधवार, २९ जुलै २०२६ रोजी भारतीय प्रमाण वेळेनुसार सायंकाळी ५ वाजता समाप्त होईल.

३. इलेक्ट्रॉनिक माध्यमातून मतदान करण्याची पात्रता आणि लाभांश (आगामी वार्षिक सर्वसाधारण सभेत घोषित केल्यास) निश्चित करण्यासाठी कट-ऑफ तारीख गुरुवार दिनांक २३ जुलै २०२६ आहे.

४. वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना पाठवल्यानंतर एखादी व्यक्ती कंपनीची सदस्य बनल्यास आणि गुरुवार दिनांक २३ जुलै २०२६ या कट-ऑफ तारखेला समभाग धारण करत असल्यास, ती व्यक्ती **evotingnsdl.co.in** या ईमेल पत्त्यावर विनंती पाठवून आयडी आणि पासवर्ड मिळवू शकते. तथापि, जर एखादी व्यक्ती आधीच छड्ड‌ मध्ये नोंदणीकृत असेल तर विद्यमान वापरकर्ता आयडी आणि पासवर्ड मत देण्यासाठी वापरला जाऊ शकतो किंवा तो/ती ई-वोटिंगसाठी सूचना अंतर्गत वार्षिक सर्वसाधारण सभेच्या सूचनेमध्ये नमूद केलेल्या चरणांचे पालन करू शकते.

५. रिमोट ई-व्होटिंगला बुधवार, २९ जुलै २०२६ संध्याकाळी ५:०० नंतर परवानगी दिली जाणार नाही.

६. ठरावांवर ई-व्होटिंगसाठी वापरकर्ता आयडी आणि पासवर्ड मिळवण्यासाठी आणि ईमेल पत्त्यांची नोंदणी करण्याची प्रक्रिया वार्षिक सर्वसाधारण सभेच्या सूचनेमध्ये अशा भागधारकांसाठी नमूद केली आहे ज्यांचे शेअर्स फिजिकल मोडमध्ये आहेत किंवा ज्यांचे ईमेल पत्ते त्यांच्याकडे डिपॉझिटरीजकडे नोंदणीकृत नाहीत.

७. सभासदांनी नोंद घ्यावी की, (अ) वार्षिक सर्वसाधारण सभेच्या दरम्यान एनएसडीएल मार्फत मतदान करण्याची सुविधा उपलब्ध करून दिली जाईल; (ब) ज्या सदस्यांनी रिमोट ई-व्होटिंगद्वारे मतदानाचा हक्क बाजवला आहे ते देखील वार्षिक सर्वसाधारण सभेला उपस्थित राहू शकतात परंतु त्यांना पुन्हा मत देण्याचा अधिकार असणार नाही; (क) ज्या व्यक्तीचे नाव सभासदांच्या रजिस्टरमध्ये किंवा डिपॉझिटरीज्द्वारे ठेवलेल्या लाभार्थी मालकांच्या नोंदणीमध्ये केवळ कट-ऑफ तारखेला नोंदवलेले असेल ती व्यक्ती वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये रिमोट ई-व्होटिंग / मतदानाची सुविधा घेण्यास पात्र असेल. (ड) कंपनीने २३ जून २०२१ च्या पत्राद्वारे शेअरहोल्डर्सना शेअरहोल्डर्सना पत्र सादर केले आहे, ज्यामध्ये कंपनीला ईमेलद्वारे वार्षिक अहवाल पाठविण्यास सक्षम करण्यासाठी ईमेल पत्ते अपडेट करण्याची विनंती केली आहे. कंपनीच्या वेबसाइटवर ते सादर केले आहे.

८. वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना कंपनीच्या **www.pclindia.in** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे, तसेच जिथे कंपनीचे समभाग सूचीबद्ध आहेत त्या स्टॉक एक्सचेंजच्या **www.bseindia.com** आणि **www.nseindia.com** संकेतस्थळावर तसेच NSDL च्या **www.evoting.nsdl.com** संकेतस्थळावर वर देखील उपलब्ध आहे.

९. कोणत्याही शंका असल्यास आपण वारंवार विचारले जाणारे प्रश्न (FAQ) पाहू शकता. ज्या सभासदांना वार्षिक सर्वसाधारण सभेच्या आधी किंवा दरम्यान सहाय्य आवश्यक आहे अशा सभासदांनी **www.evoting.nsdl.com** च्या डाउनलोड विभागात ई-वोटिंग वापरकर्ता पुस्तिका पाहावी किंवा ०२२-४८८६७००० या क्रमांकावर संपर्क साधावा किंवा **evotingnsdl.co.in** या ईमेल आयडीवर विनंती पाठवू शकता.

**लाभांशावरील कर:-** आपल्याला हे कळविण्यात येत आहे की, वित्त कायदा २०२० च्या तरतुदींनुसार, १ एप्रिल २०२० पासून कंपनीने घोषित केलेला आणि भागधारकांना दिलेला लाभांश करपात्र असतो आणि कंपनीने दिलेल्या लाभांशातून भागधारकांना लागू असलेल्या दराने स्त्रोतावरील कर (टीडीएस) कापून घेणे आवश्यक्य आहे. त्यानुसार शुक्रवार, २२ मे २०२६ रोजी झालेल्या बैठकीत संचालक मंडळाने शिफारस केलेल्या आर्थिक वर्ष २०२५-२६ साठी प्रती समभाग रू. १.०० इतक्या लाभांशाची शिफारस केली आहे. ३४ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत सभासदांनी मंजूर केल्यास, प्राप्तिकर कायदा, १९६१ च्या तरतुदींनुसार स्त्रोतावरील कर (टीडीएस) कपात केल्यानंतर लाभांश भागधारकांना अदा केले जाईल.

स्त्रोतावरील कराचा दर निर्धारित करण्यासाठी तुम्ही आवश्यक ती कागदपत्रे **MUFG Intime India Private Limited** येथे अपलोड करावीत किंवा २२ जुलै २०२६ पूर्वी **tds.dividendpclindia.in** या ईमेलवर पाठवावी. दिनांक २२ जुलै २०२६ नंतर कर निर्धारण / कपातीवरील कोणत्याही संप्रेषणाचा विचार केला जाणार नाही.

**स्थळ : पुणे**
**दिनांक : ०८ जुलै २०२६**

**प्रिसिजन कॅमशाफ्टस् लिमिटेड** करीता
सही/-
**हर्षल ज. खेर**
कंपनी सचिव






# स्वित्झर्लंडची उपांत्यपूर्व फेरीत धडक

### आता गाठ अर्जेंटिनाशी

**व्हँकुव्हर, ८ जुलै**

फिफा फुटबॉल विश्वचषक स्पर्धेत स्वित्झर्लंड आणि कोलंबिया यांच्यादरम्यानचा उप-उपांत्यपूर्व सामना निर्धारित वेळेत गोलशून्यने बरोबरीत सुटल्यानंतर पेनॉल्टी शूट-आऊटमध्ये कोलंबियावर ४-३ असा विजय मिळवत स्वित्झर्लंडने विश्वचषकाच्या उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला.

रुबेन वर्गासने स्वित्झर्लंडसाठी निर्णायक पेनॉल्टी गोलमध्ये रूपांतरित केले आणि आपल्या संघाला विश्वचषकाच्या उपांत्यपूर्व फेरीत पोहोचवले. आता स्वित्झर्लंडचा सामना गतविजेत्या अर्जेंटिनाशी होणार आहे.



व्हँकुव्हर येथे झालेल्या फुटबॉल विश्वचषकाच्या अंतिम-१६च्या सामन्यात, शूटआऊटमध्ये विजयाचा गोल केल्यानंतर स्वित्झर्लंडचा रुबेन वर्गास (डावीकडे) आपल्या सहकाऱ्यांसह आनंद व्यक्त करताना

सामन्यापूर्वी दुखापतीमुळे निर्माण झालेल्या शंकांवर मात करत रुबेन वर्गासने निर्णायक स्पॉट-किक मारली. १२० मिनिटांच्या गोलशून्य बाद फेरीच्या खेळात दोन्ही संघांना आपले वर्चस्व सिद्ध करता आले नाही आणि अखेरीस विजेता ठरवण्यासाठी शूट-आऊटच्या क्रूरतेची गरज लागली.

अतिरिक्त वेळेच्या कालावधीत किमान थोडी अधिक उत्कंठा वाढली, कारण जॉन लुकमने मारलेला हेडर क्रॉसबारवर आदळला आणि जॅमिंग्टन कॅम्पाझने सामन्यातील सर्वोत्तम संधी अनाकलनीयपणे गमावली, ज्या सामन्याचा निकाल कदाचित १२ यार्डांवरून मारलेल्या किक्सच्या लॉटरीनेच योग्यरित्या लागला. ◂(वृत्तसंस्था)

# उपांत्यपूर्व फेरीत अर्जेंटिना, स्पेन, फ्रान्स, इंग्लंडमध्ये चुरस

**न्यूयॉर्क, ८ जुलै**

फिफा फुटबॉल विश्वचषकात आठ संघ शिल्लक आहेत व उपांत्यपूर्व फेरीत फिफाच्या स्पर्धेपूर्वीच्या पुरुष जागतिक क्रमवारीत अव्वल चार देशांसह अव्वल १० मधील इतर दोन देशांचा समावेश आहे. फ्रान्स एक बलाढ्य संघ म्हणून दिसत आहे व सट्टेबाजीनुसार २-१ पेक्षा कमी दराने तो पसंतीचा संघ आहे, त्यानंतर स्पेन आणि गतविजेता अर्जेंटिना ७-२ दराने, तर इंग्लंड ९-२ दराने दुसऱ्या आणि तिसऱ्या क्रमांकावर आहेत. नॉर्वे १४-१ दराने, तर बेल्जियम, स्वित्झर्लंड आणि मोरोक्को २८-१ दराने आहेत.



लिओनेल मेस्सी | हॅरी केन (इंग्लंड) | किलियन एमबाप्पे | अर्लिंग हॉलंड

**फ्रान्स विरुद्ध मोरोक्को**

फ्रान्सने गट फेरीत वर्चस्व गाजवले, प्रतिस्पर्ध्यांवर १०-२ अशी मात केली. नॉर्वेने अर्लिंग हालंड व जवळपास सर्व प्रमुख खेळाडूंना विश्रांती दिली होती, हे लक्षात घेताही ही एक प्रभावी कामगिरी होती. तसेच, बाद फेरीच्या सुरुवातीला त्यांनी स्वीडनवर ३-० ने विजय मिळविला होता. पॅराग्वेविरुद्धच्या चुरशीच्या लढतीत १-० असा विजय मिळविताना किलियन एमबाप्पेने आपल्या कारकिर्दीतील १९वा विश्वचषक गोल केला. उपांत्य फेरी गाठल्यानंतर चार वर्षांनी, मोरोक्कोने आपल्या सलामीच्या सामन्यात ब्राझीलशी बरोबरी साधली, नेदरलँड्सला पेनॉल्टी किक्सवर बाहेर केले व वाईट सुरुवातीनंतर जोरदार मुसंडी मारत सह-यजमान कॅनडाला हरवून उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला. फ्रान्स पुढे जाण्यासाठी प्रबळ दावेदार आहे.

**स्पेन विरुद्ध बेल्जियम**

सुरुवातीला केप वर्देविरुद्ध अनपेक्षितपणे सामना बरोबरीत सुटल्याने स्पेनची चुरशीचे सामने हाताळण्यासाठी केवळ तयारी झाली होती असे दिसते. त्यांनी उरुग्वेला १-० ने बाहेर केले, आणि ३२ संघांच्या फेरीत ऑस्ट्रियाला ३-० ने सहज हरवल्यानंतर, मिकेल मेरिनोच्या स्टॉपेज टाइममधील गोलमुळे ख्रिस्तियानो रोनाल्डो व पोर्तुगालवर मात केली. बेल्जियमने नियमित वेळेत पाच मिनिटे शिल्लक असताना दोन गोलने पिछाडीवर असताना पुनरागमन करत सेनेगलला हरवले, त्यानंतर फिफाने फोलारिन बालोगुनला त्याच्या आपोआप मिळालेल्या रेड-कार्ड निलंबनानंतरही खेळू दिल्यावर सिएटलमध्ये अमेरिकेचा धुव्वा उडविला. स्पेन विजयासाठी प्रबळ दावेदार आहे.

**नॉर्वे विरुद्ध इंग्लंड**

या स्पर्धेतील अनपेक्षित विजय नॉर्वेचा आहे. नॉर्वे संघाचे नेतृत्व अर्लिंग हॉलंड करीत आहे आणि संपूर्ण अमेरिकेत चाहते व खेळाडू 'वायकिंग रो' करीत आहेत, तर मायदेशी प्रचंड गर्दी जल्लोष साजरा करीत आहे. हॉलंडने आपले सहावे आणि सातवे गोल करून पाच वेळच्या विश्वविजेत्या ब्राझीलला मोठा धक्का दिला आणि या स्कँडिनेव्हियन देशाला पहिल्यांदाच विश्वचषकाच्या उपांत्यपूर्व फेरीत पोहोचवले. एस्टाडिओ अझ्टेका येथील प्रचंड जल्लोषातही इंग्लंडने अंतिम-१६ संघांच्या फेरीतील थरारक सामन्यात मेक्सिकोला हरवले, पण सामन्यानंतरच्या जल्लोषात अनुभवी मिडफिल्डर जॉर्डन हेंडरसनला मनगटाची दुखापत झाली. इंग्लंडला विजयासाठी किंचित पसंती दिली जात आहे.

**अर्जेंटिना विरुद्ध स्वित्झर्लंड**

लिओनेल मेस्सीने यावर्षी आठ गोलांसह सर्व खेळाडूंमध्ये आघाडी घेतली आहे आणि आपल्या शानदार कारकिर्दीत २१ गोलांचा विश्वचषक विक्रम प्रस्थापित केला आहे , आणि ही संख्या वाढतच आहे. मंगळवारी इजिप्तविरुद्धच्या एका अविस्मरणीय सामन्यात २-० ने पिछाडीवर असताना गोल करून अर्जेंटिनाला ३-२ ने विजय मिळवून दिला, ही मेस्सीची ताजी कामगिरी होती. स्वित्झर्लंडने पाच सामन्यांमध्ये केवळ नऊ गोल केले असून, बचावाच्या शैलीवर अवलंबून ते पुढील फेरीत पोहोचले आहेत. अंतिम-१६ संघांच्या फेरीत कोलंबियाला हरवण्यासाठी त्यांना पेनॉल्टी किक्सचा सामना करावा लागला, कारण निर्धारित वेळेत किंवा अतिरिक्त वेळेत दोन्ही संघांनी एकही गोल केला नव्हता. स्वित्झर्लंड संघ १९५४ नंतर प्रथमच उपांत्यपूर्व फेरीत पोहोचला आहे. अर्जेंटिनाला विजयासाठी पसंती दिली जात आहे. ◂(वृत्तसंस्था)

### उपांत्यपूर्व फेरीचे सामने असे

**फ्रान्स वि. मोरोक्को**
**१० जुलै,** शुक्रवारी रात्री १.३० वाजतापासून
**स्थळ :** बॉस्टन स्टेडियम, बॉस्टन
00
**स्पेन वि. बेल्जियम**
**११ जुलै** शनिवारी रात्री १२.३० वाजतापासून
**स्थळ :** कॅन्सस स्टेडियम, कॅन्सस सिटी
00
**अर्जेंटिना वि. स्वित्झरर्लंड**
**१२ जुलै,** रविवारी सकाळी ६.३० वाजतापासून
**स्थळ :** कॅन्सस स्टेडियम, कॅन्सस सिटी
00
**नॉर्वे वि. इंग्लंड**
**१२ जुलै** रविवारी रात्री २.३० वाजतापासून
**स्थळ :** मियामी स्टेडियम, मियामी
**थेट प्रसारण :** युनाईट८ (झी५) वर

# भारतीय महिलांची ९ पदके निश्चित

### आशियाई १९ व २३ वर्षांखालील मुष्टियुद्ध

**जकार्ता, ८ जुलै**

जकार्ता येथे बुधवारी झालेल्या आशियाई १९ वर्षांखालील व २३ वर्षांखालील मुष्टियुद्ध स्पर्धेत भारताच्या २३ वर्षांखालील महिला खेळाडूंनी दमदार कामगिरी केली. उपांत्य-पूर्व फेरीच्या लढतींमध्ये उत्कृष्ट प्रदर्शन करत नऊ बॉक्सरनी उपांत्य फेरीत धडक मारली आणि आपली पदके निश्चित केली.

तनुने (५१ किलो) थायलंडच्या केवालिन नोरासिंगवर ५:० अशा एकमताने वर्चस्वपूर्ण विजय मिळवला, तर निशा (५४ किलो) हिने कझाकस्तानच्या आलियाक्सर सिम्बॅटविरुद्ध ५:० असाच प्रभावी विजय नोंदवला. ४८ किलो वजनी गटातील लढतीत निधीने कडवी झुंज दिली, परंतु कझाकस्तानच्या गुलनाझ बुरीबायेव्हाकडून तिला ३:२ अशा 'स्प्लिट डिसिजन'ने (विभाजित निर्णयाने) निसटता पराभव पत्करावा लागला.

भारताची विजयी घोडदौड सुरूच राहिली. प्राचीने (५७ किलो) कोरियाच्या येजिन ओहविरुद्ध पहिल्याच फेरीत 'आरएससी' द्वारे दमदार विजय मिळवला. त्यानंतर निकिता चंदने (६० किलो) चायनीज तैपेईच्या चेन-क्सुआन ये हिचा तिसऱ्या फेरीत 'आरएससी'द्वारे सहज पराभव केला, तर काजलने (६५ किलो) जपानच्या अरिंदा अकिमोटोवर ४:१ अशा 'स्प्लिट डिसिजन'ने चुरशीच्या लढतीत मात केली. या निकालांमुळे, भारताने २३ वर्षांखालील महिला स्पर्धेत एकूण नऊ पदके निश्चित केली आहेत. ◂(वृत्तसंस्था)

### इजिप्तचे प्रशिक्षक हसन यांना पिवळे कार्ड

**अटलांटा :** अर्जेंटिनाविरुद्धच्या विश्वचषक पराभवात वर्णद्वेषविरोधी कृती केल्याबद्दल इजिप्तचे प्रशिक्षक होसाम हसन यांना पिवळे कार्ड दाखवण्यात आले. मंगळवारी फिफा विश्वचषकाच्या अंतिम-१६ संघांच्या फेरीत अर्जेंटिनाकडून झालेल्या ३-२ च्या नाट्यमय पराभवावेळी, फिफाच्या वर्णद्वेषविरोधी कृतीबद्दल इजिप्तचे प्रशिक्षक होसाम हसन यांना पिवळे कार्ड दाखवण्यात आले. हसन यांची ही कृती अटलांटा स्टेडियमवरील सामन्याच्या शेवटच्या गोंधळलेल्या टप्प्यात घडली. ◂(वृत्तसंस्था)

# भारत 'अ' संघ न्यूझीलंड दौऱ्यावर

**नवी दिल्ली, ८ जुलै**

भारत आणि न्यूझीलंडचे वरिष्ठ संघ या वर्षाच्या अखेरीस एक मालिका खेळणार आहेत. या मालिकेच्या तयारीसाठी भारत 'अ' संघ न्यूझीलंडचा दौरा करणार आहे. या दौऱ्यात तीन लिस्ट 'अ' सामने व दोन प्रथम-श्रेणी सामन्यांचा समावेश असेल, यात राष्ट्रीय कसोटी संघातील काही खेळाडूही सहभागी होऊ शकतात.

वरिष्ठ संघात स्थान मिळवण्यासाठी प्रयत्न करणाऱ्या खेळाडूंसाठी हा भारत 'अ' दौरा एक महत्त्वाचा तयारीचा मंच ठरू शकतो.

या महत्त्वाच्या मालिकेपूर्वी न्यूझीलंडच्या परिस्थितीत आवश्यक सराव मिळावा यासाठी संघात काही वरिष्ठ खेळाडूंचाही समावेश केला जाऊ शकतो. भारत 'अ' संघ या दौऱ्यावर तीन ५०-षटकांचे सामने आणि त्यानंतर दोन प्रथम-श्रेणी कसोटी सामने खेळेल. यामुळे संघ व्यवस्थापनाला वरिष्ठ संघाच्या सामन्यांपूर्वी कसोटी आणि कसोटी दोन्ही पर्याय आजमावून पाहण्याची संधी मिळेल. तिथल्या वातावरणाशी जुळवून घेण्यासाठी संघ प्रथम श्रीलंकेत दाखल होईल.

१५ ऑगस्टपासून सुरू होणाऱ्या पहिल्या कसोटीपूर्वी वातावरणाशी जुळवून घेण्यासाठी, संघ ८ ऑगस्टपासून श्रीलंका बोर्ड प्रेसिडेंट्स इलेव्हनविरुद्ध एक सराव सामना खेळण्याची शक्यता आहे. दोन सामन्यांची कसोटी मालिका सुरू होण्यापूर्वी खेळाडूंना तेथील परिस्थितीशी जुळवून घेण्यास मदत करणे, हा या सराव सामन्याचा उद्देश आहे. यात राष्ट्रीय कसोटी संघातील काही खेळाडूही सहभागी होण्याची शक्यता आहे. ◂(वृत्तसंस्था)

# लिएंडर पेस 'एटीएफ'चा 'प्लेअर ॲम्बेसेडर'

**लंडन, ८ जुलै**

आशियाई टेनिस महासंघाने (एटीएफ) खेळाडूंची पुढील पिढी घडवण्यासाठी व संपूर्ण आशिया खंडात या खेळाचा विकास गतिमान करण्यासाठी दिग्गज टेनिसपटू लिएंडर पेस याची 'प्लेअर ॲम्बेसेडर' (खेळाडूंचा सदिच्छादूत) म्हणून नियुक्ती केली आहे.

विम्बल्डन स्पर्धेदरम्यान एटीएफचे अध्यक्ष युरी पोल्स्की, वरिष्ठ अधिकारी, खेळाडू व आंतरराष्ट्रीय टेनिस समुदायातील सदस्यांच्या उपस्थितीत ही घोषणा करण्यात आली. टेनिसच्या इतिहासातील सर्वात यशस्वी खेळाडूंपैकी एक असलेल्या पेसने तीन दशकांहून अधिक काळ व्यावसायिक कारकीर्द गाजविली.

१९९६ च्या अटलांटा ऑलिम्पिकमध्ये कांस्यपदक जिंकणाऱ्या लिएंडर पेसने १८ ग्रॅण्ड स्लॅम विजेतेपदे (पुरुष दुहेरीत ८ व मिश्र दुहेरीत १०) पटकावली आहेत; तसेच या दोन्ही प्रकारांत त्याने 'करिअर ग्रॅण्ड स्लॅम' पूर्ण करण्याचा पराक्रमही केला आहे.



**लिएंडर पेस**

दुहेरी प्रकारात एकेकाळी जागतिक क्रमवारीत अव्वल स्थान भूषविलेला व 'डेव्हिस चषक कमिटमेंट अवॉर्ड'चा मानकरी असलेला पेस हा आशियातील टेनिसचा महान राजदूत व भारतातील सर्वात लोकप्रिय क्रीडा व्यक्तिमत्त्वांपैकी एक आहेत.

'प्लेअर ॲम्बेसेडर' म्हणून, पेस एटीएफसोबत मिळून संपूर्ण खंडात टेनिसचा प्रसार करणे, युवा खेळाडूंना मार्गदर्शन करणे, तळागाळातील विकास कार्यक्रमांना पाठिंबा देणे आणि प्रमुख आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये फेडरेशनचे प्रतिनिधित्व करणे यांसारखी कामे करतील.

एटीएफकडून ज्युनियर, व्यावसायिक आणि व्हीलचेअर स्पर्धांचे भक्कम वेळापत्रक, प्रशिक्षक व अधिकाऱ्यांसाठी प्रशिक्षण कार्यक्रम, उच्च-स्तरीय कामगिरीसाठीचे उपक्रम आणि राष्ट्रीय संघटनांना बळकट व खेळातील सहभाग वाढवण्याच्या उद्देशाने विकास प्रकल्प राबवून आशियातील खेळाडूंसाठी संधींचा विस्तार केला जात असतानाच ही नियुक्ती करण्यात आली आहे.

या भागीदारीमुळे जागतिक दर्जाचे आशियाई खेळाडू घडविण्याचे एटीएफचे ध्येय अधिक बळकट होईल आणि त्याचबरोबर संपूर्ण खंडातील लाखो उदयोन्मुख खेळाडूंना प्रेरणा मिळेल, असा विश्वास एटीएफला वाटतो.

आशियाई टेनिस महासंघामध्ये 'प्लेअर ॲम्बेसेडर' म्हणून सहभागी होणे ही माझ्यासाठी अभिमानाची गोष्ट आहे. आशियामध्ये प्रचंड गुणवत्ता, जिद्द आणि क्षमता आहे. ज्या खेळाने मला इतके काही दिले आहे, त्या खेळासाठी काहीतरी योगदान देण्यास मी उत्सुक आहे, असे २०२४ मध्ये 'इंटरनॅशनल टेनिस हॉल ऑफ फेम'मध्ये खेळाडूंच्या श्रेणीत स्थान मिळालेल्या पेसने सांगितले.

एटीएफसोबत मिळून, मी युवा खेळाडूंना मोठी स्वप्ने पाहण्यासाठी, कठोर परिश्रम करण्यासाठी आणि जगातील सर्वोत्तम खेळाडूंशी स्पर्धा करण्याचा आत्मविश्वास बाळगण्यासाठी प्रेरित करेन, अशी मला आशा आहे, असेही तो म्हणाला. तळागाळात टेनिसचा विकास करणे आणि त्याच वेळी उत्कृष्टतेकडे वाटचाल करण्यासाठी संधी निर्माण करणे, हे आमचे सामायिक उद्दिष्ट असेल, असे एटीएफचे अध्यक्ष पोल्स्की यांनी सांगितले. ◂(वृत्तसंस्था)

# मालिका वाचवण्यासाठी भारतीय संघाची धडपड



हॅरी ब्रुक | श्रेयस अय्यर

**भारत-इंग्लंड चौथा टी-२० सामना**
**वेळ :** रात्री १०.०० वाजतापासून
**स्थळ :** ब्रिस्टल
**थेट प्रसारण :** सोनी स्पोर्टसवर

**ब्रिस्टल, ८ जुलै**

तिसरा टी-२० सामना गमावल्यानंतर आता श्रेयस अय्यरच्या नेतृत्वाखालील भारतीय संघ गुरुवारी इंग्लंडविरुद्ध होणाऱ्या मालिकेतील निर्णायक चौथ्या टी-२० सामन्यासाठी सज्ज होत आहे.निवडीबाबतचा सर्वात मोठा पेच संजू सॅमसनच्या बाबतीत निर्माण झाला आहे; त्याला दुसऱ्या व तिसऱ्या टी-२० सामन्यातून वगळून १५ वर्षीय आक्रमक फलंदाज वैभव सूर्यवंशीला संधी देण्यात आली होती. या किशोरवयीन खेळाडूची कामगिरी आतापर्यंत संघातील इतर खेळाडूंपेक्षा वाईट किंवा खूप चांगली अशी झालेली नाही. मात्र, संघ सध्या मालिकेत ०-२ ने पिछाडीवर असल्याने, भारताचे मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर यांनी सॅमसनच्या पुनरागमनाची शक्यता फेटाळून लावलेली नाही.

अवघ्या चार महिन्यांत सॅमसनच्या कारकिर्दीत प्रचंड चढ-उतार पाहायला मिळाले आहेत.

पुनरागमन मालिकेत अनपेक्षितपणे कर्णधारपद सोपवल्यानंतर पहिल्या विजयाच्या शोधात असलेल्या कर्णधार अय्यरला दोष देणे अन्यायकारक ठरेल; मात्र, गंभीर यांच्या नेतृत्वाखालील प्रशिक्षक मंडळ आणि अजित आगरकर यांची निवड समिती यांच्यावर मोठी जबाबदारी आहे. संघ व्यवस्थापनाने घेतलेले रणनीतिक निर्णय चाहत्यांनाही फारसे पसंत पडलेले नाहीत. तिसऱ्या टी-२० सामन्यात १२५ धावांनी दारुण पराभव पत्करल्यानंतर, गंभीर यांच्या नेतृत्वाखालील संघ जेव्हा बसकडे निघाला, तेव्हा ट्रेंट ब्रिज स्टेडियमबाहेर "आम्हाला संजू हवा आहे" अशा घोषणांचा आवाज घुमला. ◂(वृत्तसंस्था)

# नोस्कोव्हाची उपांत्य फेरीत धडक

### पुढील लढत कोस्त्युकशी




**लंडन, ८ जुलै**

झेक प्रजासत्ताकच्या लिंडा नोस्कोव्हाने आपल्या कारकिर्दीतील पहिल्या ग्रँड स्लॅम उपांत्य फेरीत धडक मारली आहे. लंडनमधील 'ऑल-इंग्लंड लॉन टेनिस क्लब'च्या 'कोर्ट क्रमांक १'वर बुधवारी झालेल्या सामन्यात तिने एलिस मर्टेन्सचा ६-३, ७-५ असा पराभव करून विम्बल्डन २०२६ च्या अंतिम चार खेळाडूंच्या फेरीत (उपांत्य फेरीत) आपले स्थान निश्चित केले.

नवव्या मानांकित चेक खेळाडूने प्रत्येक सेटमध्ये बेल्जियन खेळाडूची सर्व्हिस एकदा मोडली आणि आपल्या २१ वर्षांच्या वयाला साजेसा नसलेला, मोठ्या सामन्यांमधील परिपक्व खेळ दाखवून दिला. नोस्कोव्हा गेल्या वर्षी विम्बल्डनच्या चौथ्या फेरीपर्यंत पोहोचली होती आणि २०१८ मधील येलेना ओस्टापेंकोनंतर 'ऑल-इंग्लंड क्लब'मध्ये उपांत्य फेरी गाठणारी ती सर्वात तरुण खेळाडू ठरली आहे.

उपांत्य फेरीत नोस्कोव्हाचा सामना युक्रेनच्या मार्ता कोस्त्युकशी होईल; या लढतीमुळे ग्रँड स्लॅम स्पर्धेच्या अंतिम फेरीत पोहोचणारी एक नवीन खेळाडू निश्चित होईल.

कोस्त्युकने आपली शानदार कामगिरी कायम राखत बुधवारी 'सेंटर कोर्ट'वर इटलीच्या जास्मिन पाओलिनीचा ६-३, ६-२ असा सहज पराभव केला आणि आपल्या कारकिर्दीतील पहिली विम्बल्डन उपांत्य फेरी व सलग दुसरी ग्रँड स्लॅम उपांत्य फेरी गाठली.

१२ व्या मानांकित कोस्त्युकने गेल्या वर्षीच्या उपविजेत्या खेळाडूला हरवण्यासाठी केवळ एक तास नऊ मिनिटे घेतली. या विजयामुळे 'डब्ल्यूटीए (WTA) टूर'वरील तिच्या गेल्या २२ सामन्यांमधील विजयांची संख्या २१ वर पोहोचली आहे. तसेच, २०२६ च्या फ्रेंच ओपनमधील उपांत्य फेरीतील कामगिरीनंतरचा हा तिचा आणखी एक मोठा टप्पा असून, त्यावरून प्रमुख स्पर्धांमधील तिची सातत्यपूर्ण कामगिरी दिसून येते.

'सेंटर कोर्ट'वर पहिल्यांदाच खेळताना कोस्त्युकने आक्रमक शैलीचे प्रदर्शन केले. तिने १९ 'विनर्स' (थेट गुण मिळवणारे फटके) मारले, ज्यामध्ये अनेक नेत्रदीपक 'रिटर्न विनर्स'चा समावेश होता; यामुळे पाओलिनीवर सतत दडपण राहिले. ◂(वृत्तसंस्था)

# माझ्या वडिलांचे स्वप्न पूर्ण

### यश ठाकूर यांचे मत

**नवी दिल्ली, ८ जुलै**

माझ्या वडिलांनी मला भारतीय संघाकडून खेळताना पाहण्याचे स्वप्न पाहिले होते. आता, जेव्हा ते स्वप्न साकार होणार आहे, तेव्हा दुर्दैवाने त्याचे वडील ते पाहण्यासाठी हयात नाहीत, असे विदर्भाचा वेगवान गोलंदाज यश ठाकूर म्हणाला.

भारतीय संघात निवड झाल्यावर यश ठाकूर माध्यमांशी बोलत होता. विदर्भाचा वेगवान गोलंदाज यश ठाकूर झिम्बाब्वेच्या आगामी दौऱ्यात भारतीय संघाच्या ड्रेसिंग रूममध्ये पाऊल ठेवेल. यश ठाकूरने जवळपास एक दशकापासून देशांतर्गत क्रिकेटमध्ये अथक परिश्रम घेतले आहेत.



**यश ठाकूर**

२७ वर्षीय यश ठाकूरला नुकताच त्याच्या व्यावसायिक आयुष्यातील कदाचित सर्वात महत्त्वाचा फोन आला, जेव्हा तो श्रीलंकेच्या 'भारत अ' संघाच्या दौऱ्यावरून परतल्यानंतर नागपूर विमानतळावर आपले सामान घेण्यासाठी थांबला होता. हा फोन त्याला झिम्बाब्वे दौऱ्यासाठी भारतीय संघात पहिल्यांदाच झालेल्या निवडीबद्दल माहिती देण्यासाठी होता. भारतीय संघ या दौऱ्यात २३ ते २६ जुलै दरम्यान तीन टी-२० आंतरराष्ट्रीय सामने खेळणार आहे. खरं सांगायचं तर, मला याची अपेक्षा नव्हती कारण मी नुकताच श्रीलंका दौऱ्यावरून परतलो होतो. मला इतक्या लवकर भारतीय संघात स्थान मिळेल अशी मी कधी कल्पनाही केली नव्हती, असेही तो म्हणाला.

त्याने २०१७ मध्ये लिस्ट ए मध्ये पदार्पण केले आणि ५७ सामन्यांमध्ये १०० बळी घेण्याच्या जवळ पोहोचला आहे. त्याने दोन वेगवेगळ्या फ्रँचायझींसाठी २२ आयपीएल सामन्यांसह एकूण ७४ टी-२० सामने खेळले आहेत. इतकेच नाही तर, लखनौ सुपर जायंट्सकडून खेळताना आयपीएलमध्ये भारतीय गोलंदाजी प्रशिक्षक मॉर्न मॉर्केल यांच्याशी त्याचे चांगले संबंध निर्माण झाले. ठाकूरला अननुभवी म्हणणे अन्यायकारक ठरेल. रणजी ट्रॉफी, दुलीप ट्रॉफी, इराणी कप आणि विजय हजारे ट्रॉफीमध्ये खेळलेला तो भारतीय क्रिकेट प्रणालीचे खरोखरच एक उत्तम उदाहरण आहे, आणि नंतर भारतीय क्रिकेट नियामक मंडळाच्या (बीसीसीआय) संभाव्य वेगवान गोलंदाजांच्या यादीत त्याचा समावेश करण्यात आला. वरिष्ठ भारतीय संघाकडून खेळण्याचे त्याचे स्वप्न लवकरच पूर्ण होईल, असा त्याला विश्वास आहे. ◂(वृत्तसंस्था)

# ही एका अद्भुत प्रवासाची सुरुवात

### सूर्यकुमार यादवचा सूर्यवंशीला संदेश

**नवी दिल्ली, ८ जुलै**

१५ वर्षीय फलंदाज वैभव सूर्यवंशी याची ही रोमांचक क्रिकेट प्रवासाची सुरुवात आहे आणि तो देशाला गौरव मिळवून देत राहील, अशा शब्दात माजी कर्णधार सूर्यकुमार यादवने सूर्यवंशीचे कौतुक केले.

बिहारचा रहिवासी असलेल्या सूर्यवंशीने ओल्ड ट्रॅफर्ड येथे इंग्लंडविरुद्धच्या दुसऱ्या टी-२० सामन्यात पदार्पण केले आणि भारतासाठी आंतरराष्ट्रीय क्रिकेट खेळणारा सर्वात तरुण खेळाडू ठरला.

त्याने वयाच्या १६ व्या वर्षी पदार्पण करणाऱ्या महान फलंदाज सचिन तेंडुलकरचा विक्रम मोडला.

यावर्षी मायदेशात भारताला विश्वचषक जिंकून देणारे माजी कर्णधार सूर्यकुमार यादवने समाज माध्यमावर लिहिले की, मी संघासाठी खूप आनंदी आहे. मी खेळाडूंना नेहमीच शुभेच्छा देतो. मला माहित आहे की सर्व खेळाडू त्यांचे सर्वोत्तम देत आहेत आणि त्यांना माझा पूर्ण पाठिंबा असेल.

वैभव सूर्यवंशी, तुझ्यासाठी एक विशेष संदेश-ही तुझ्या एका अत्यंत रोमांचक प्रवासाची सुरुवात आहे. प्रत्येक क्षणाचा आनंद घे आणि देशाला गौरव मिळवून देत राहा, असे त्याने नमूद केले. ◂(वृत्तसंस्था)

## महत्वाचे...



### उद्योगविश्वातील संधींसाठी विद्यार्थ्यांना आधुनिक ऑटोमेशनचे प्रशिक्षण

**सोलापूर, दि. ८ जुलै-**

एन. बी. नवले सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालय, सोलापूर येथील विद्युत अभियांत्रिकी विभाग आणि प्रशिक्षण व रोजगार (टी अँड पी) सेल यांच्या संयुक्त विद्यमाने तृतीय वर्ष विद्युत अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांसाठी ६ ते ११ जुलै या कालावधीत 'पीएलसी अँड स्काडा ऑटोमेशन ट्रेनिंग प्रोग्राम' या उद्योगाभिमुख प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. प्रशिक्षणामध्ये विद्यार्थ्यांना Siemens व Allen-Bradley पीएलसी प्रोग्रामिंग, स्काडा डेव्हलपमेंट, इंडस्ट्रियल कम्युनिकेशन अँड नेटवर्किंग तसेच रिअल-टाईम इंडस्ट्रियल ऑटोमेशन ॲप्लिकेशन्सचे सैद्धांतिक आणि प्रात्यक्षिक प्रशिक्षण अनुभवी उद्योगतज्ज्ञांकडून दिले जात आहे. यासोबतच विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष औद्योगिक प्रणालींवर काम करण्याची संधी उपलब्ध करून देण्यात आल्याने त्यांच्या तांत्रिक कौशल्यांमध्ये लक्षणीय वाढ होणार आहे. कार्यक्रमासाठी कार्यक्रम समन्वयक प्रा. अनंतराव व्ही. पाटील, विभागप्रमुख डॉ. विजयकुमार एस. बिरादार, सहसमन्वयक म्हणून प्रा. एम. टी. शिंदे यांनी काम पाहिले. हा कॅम्पस डायरेक्टर संजय नवले यांच्या नेतृत्वाखाली प्राचार्य डॉ. एस. डी. नवले यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला.



### आ. विजयकुमार देशमुख यांच्या हस्ते महेश मेंगजी यांचा सत्कार

**सोलापूर, दि. ८ जुलै-**

श्री. सो. स. क्षत्रिय समाज सेवा मंडळ व विठ्ठल मंदिर, सोलापूर संचालक मंडळ पंचवार्षिक निवडणूक सन २०२६-३१ करिता चव्हाण उद्योग समूहाचे शिवप्रकाश अंबादास चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या सहस्त्रार्जुन विकास पॅनेलचा विजय झाल्याने आमदार विजयकुमार देशमुख यांच्या हस्ते महेश मेंगजी यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी नगरसेवक संजय कोळी, अमर पुदाले, किशोर बारड, श्रीगिरी उपस्थित होते.




### तडीपार आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या इसमावर पोलिसांची कारवाई

**बार्शी, दि. ८ जुलै-**

बार्शी तालुका पोलीस ठाण्याच्या हद्दीत तडीपार आदेशाचे उल्लंघन करुन फिरणाऱ्या एका इसमावर बार्शी तालुका पोलिसांनी कारवाई केली आहे. दि. ७ जुलै रोजी सपोनि सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस पथक पेट्रोलिंग करीत असताना गोपनीय बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, मौजे जामगाव येथील बाळराजे चौक परिसरात एक तडीपार इसम फिरत आहे. त्यानुसार पोलीस पथकाने तात्काळ घटनास्थळी जाऊन संशयित इसमास ताब्यात घेतले. चौकशीअंती त्याचे नाव तथागत मुकेश मस्के (वय २४ वर्षे, रा. भीमनगर, बार्शी) असे असल्याचे निष्पन्न झाले. संबंधित इसमास बार्शी तालुक्यात फिरण्याबाबत विचारणा केली असता त्याने समाधानकारक उत्तर दिले नाही. तपासात त्याच्याविरुद्ध उपविभागीय दंडाधिकारी, सोलापूर यांनी दिलेल्या सोलापूर व धाराशिव जिल्हा तडीपार आदेशाचे उल्लंघन केल्याचे स्पष्ट झाले. याप्रकरणी संबंधित इसमाविरुद्ध महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ चे कलम १४२ अन्वये बार्शी तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास बार्शी तालुका पोलीस करीत आहेत.

### बी.फार्मसीनंतर आयटी क्षेत्रात अनेक संधी : डॉ. संजय बैस

**सांगोला, दि. ८ जुलै-**



फार्मसी क्षेत्राबरोबरच हेल्थकेअर आयटीमधील कौशल्ये आत्मसात करून जागतिक स्तरावरील करिअरच्या संधींचा लाभ घ्यावा, असे आवाहन फॅबटेक कॉलेज ऑफ फार्मसी, सांगोलाचे प्राचार्य डॉ.संजय बैस यांनी केले. फॅबटेक कॉलेज ऑफ फार्मसी, सांगोला येथे विद्यार्थ्यांना उद्योगाभिमुख शिक्षणाबरोबरच हेल्थकेअर आयटी, एचआयपीएए, डिजिटल हेल्थकेअर प्रणाली, संवाद कौशल्ये आणि व्यक्तिमत्त्व विकास याबाबत मार्गदर्शन करण्यात येत आहे. यावेळी ते बोलत होते. पालकांनीही आपल्या मुलींना गुणवत्तापूर्ण फार्मसी शिक्षणासोबत आधुनिक हेल्थकेअर आयटी कौशल्ये मिळवून देण्यासाठी प्रोत्साहन द्यावे, असे आवाहनही डॉ. बैस यांनी केले आहे.

## निधन वृत्त...

### पद्मिनी वेदपाठक

**करमाळा, दि. ८ जुलै-**



उमरड (ता.करमाळा) येथील रहिवासी पद्मिनी छगन वेदपाठक यांचे अल्पशा आजाराने निधन झाले आहे. त्यांच्या पश्चात एक मुलगा, तीन मुली, सून, नातवंडे असा परिवार आहे. जेऊरचे स्वर्णकार संतोष वेदपठाक यांच्या त्या मातोश्री होत.

# सीना-माढा उपसा सिंचन योजनेंतर्गत १६९ तलाव भरावेत : आ. पाटील

## विधानभवनात जलसंपदा मंत्री आणि पालकमंत्र्यांची घेतली भेट; अधिकाऱ्यांना तातडीचे आदेश

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ८ जुलै-**

सीना माढा उपसा सिंचन योजना तात्काळ सुरू करावी यासाठी आमदार अभिजीत पाटील यांनी जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील व सोलापूरचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांना भेटून निवेदन दिले.

यावेळी सीना माढा उपसा योजनेअंतर्गत असलेल्या १६९ तलावांमध्ये तातडीने पाणी भरून माढा तालुक्यातील भीषण पाणीटंचाई दूर करावी, असे निवेदन त्यांनी मंत्र्यांना दिले.

यासोबतच माढा तालुक्यात निर्माण झालेली आवर्षणसदृश्य परिस्थिती लक्षात घेऊन उजनी धरणाच्या बोगद्यातून सीना नदीत तात्काळ पाणी सोडण्यात यावे, अशीही महत्त्वपूर्ण मागणी करण्यात आली. या दोन्ही मागण्यांची दखल घेत जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना तातडीने आवश्यक कार्यवाही करण्याचे आदेश दिले.

यानंतर आमदार अभिजीत पाटील यांनी सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांचीही भेट घेत माढा तालुक्यातील पाणीप्रश्नाबाबत सविस्तर चर्चा केली. सीना-माढा उपसा सिंचन योजना त्वरित



कार्यान्वित करून १६९ तलाव भरावेत तसेच उजनी धरणातून सीना नदीत पाणी सोडण्याबाबत तातडीने निर्णय घ्यावा, अशी मागणी त्यांनी पालकमंत्र्यांकडेही केली. या मागण्यांवर सकारात्मक भूमिका घेत पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना देऊन तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देश दिले. याचवेळी शेतकऱ्यांच्या आणखी एका जिव्हाळ्याच्या प्रश्नाकडे लक्ष वेधत आमदार अभिजित पाटील यांनी भीमा नदीकाठच्या गावांतील शेतीपंपांना दररोज किमान ८ तास अखंड वीजपुरवठा सुरू करण्यात यावा, अशी मागणी पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली. अपुऱ्या वीजपुरवठ्यामुळे शेतीचे मोठे नुकसान होत असल्याने तातडीने ८ तासांचा नियमित वीजपुरवठा उपलब्ध करून देण्याची आवश्यकता त्यांनी अधोरेखित केली.

> माढा तालुक्यातील पाणीटंचाई, सिंचन, शेती आणि वीजपुरवठा या चारही महत्त्वाच्या प्रश्नांवर आमदार अभिजित पाटील यांनी आवाज उठवल्याने शेतकरी आणि नागरिकांमध्ये आशेचे वातावरण निर्माण झाले आहे. संबंधित मंत्र्यांनी अधिकाऱ्यांना तातडीने आदेश व सूचना दिल्यामुळे या मागण्यांवर लवकरच सकारात्मक कार्यवाही होईल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

## सहकारमहर्षि साखर कारखान्यामध्ये मिल रोलर पूजन

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. ८ जुलै-**

सहकारमहर्षि शंकरराव मोहिते-पाटील सहकारी साखर कारखान्यामध्ये गळीत हंगाम २०२६-२७ चे मील रोलरचे पूजन बुधवार दि.०८८ जुल रोजी सकाळी ९:३० वाजता कारखान्याचे व्हाईस चेअरमन शंकर माने-देशमुख यांच हस्ते झाले.

कारखान्याचे मार्गदर्शक संचालक विजयसिंह मोहिते-पाटील, चेअरमन जयसिंह शंकरराव मोहिते-पाटील यांचे नेतृत्वाखाली कारखान्याची वाटचाल प्रगतीपथावर आहे.

कारखान्याने गत हंगाम २०२५-२६ मधील सर्व ऊस पुरवठादार शेतक-यांची ऊस बीले, तोडणी वाहतूक बीले अदा केली आहेत.

सदर कार्यक्रम प्रसंगी कारखान्याचे संचालक लक्ष्मण शिंदे, सतीश शेंडगे, नानासाहेब मुंडफणे, रावसाहेब मगर, अमरदिप काळकुटे, गोविंद पवार, जयदिप एकतपुरे, सुभाष कटके, रामचंद्र ठवरे, संचालिका सुजाता शिंदे, तज्ञ संचालक प्रकाशराव पाटील व शिवसृष्टी किल्ला व शिवछत्रपती मल्टिमेडीया लेजर शो कमिटीचे संचालक पांडूरंग एकतपुरे, श्रीकांत बोडके, दत्तात्रय मगर, अशोक पताळे तसेच कार्यलक्षी संचालक जयवंत माने-देशमुख, माजी संचालक भिमराव काळे, भारत फुले, शिवाजी सिद, विजय माने-देशमुख, राजेंद्र मोहिते, कार्यकारी संचालक सुहास यादव, सर्व खातेप्रमुख, कामगार व युनियन प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.






## अकलूज येथे शिवशंकर व सोलापूर जिल्हा विद्युत कामगार पतसंस्थेची सभा

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज दि. ८ जुलै-**

अकलूज येथील श्री शिवशंकर वीज कामगार सहकारी पतसंस्था ४२ वी आणि सोलापूर जिल्हा विद्युत कामगार ग्राहक सहकारी पतसंस्था ४१ वी यांची वार्षिक सर्वसाधारण सभा नुकतीच पार पडली. संयुक्त सभेच्या अध्यक्षस्थानी इंटकचे जिल्हाध्यक्ष डॉ.धवलसिंह मोहिते-पाटील होते.

यावेळी व्यासपीठावर शिवशंकर पतसंस्थेचे चेअरमन राजाराम घुगे, विद्युत कामगार ग्राहक पतसंस्थेचे चेअरमन युवराज ओहोळ,आनंदराव पाखरे, किशोर जाधव, नागनाथ पांढरे, संतोष चव्हाण, सत्यशील गायकवाड, प्रदीप सुरवसे, सिद्धाराम चव्हाण, डॉ.माधव लवटे उपस्थित होते.

डॉ.धवलसिंह मोहिते- पाटील यांनी पतसंस्थांच्या प्रगतीचा गौरव केला. ते म्हणाले, पतसंस्थेची उत्तरोत्तर होणारी आर्थिक प्रगती, वाढती सभासद संख्या, सभासदांना दिला जाणारा आकर्षक लाभांश, संस्थेचा शिस्तबद्ध व पारदर्शक कारभार कौतुकास्पद आहे. चेअरमन राजाराम घुगे यांनी संस्थेच्या प्रगतीचा आलेख मांडताना सांगितले की, संस्थेची वार्षिक उलाढाल सध्या १३ कोटी रुपयांच्या आसपास असून एकूण सभासद संख्या ३९९ आहे. सभेचे औचित्य साधून संस्थेतील सभासदांच्या गुणवंत पाल्यांचा सन्मान करण्यात आला. तसेच निवृत्त कर्मचाऱ्यांचाही सत्कार केला.

### ११ व १२ जुलैला थेट बाजार पेठचे आयोजन

**सोलापूर, दि. ८ जुलै-**

महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत) यांच्या वतीने स्थानिक उद्योजक, महिला बचतगट, कारागीर आणि लघुउद्योजकांना थेट ग्राहकांपर्यंत पोहोचण्याची संधी उपलब्ध करून देण्यासाठी अमृत पेठ-थेट बाजार पेठ हा प्रदर्शन व विक्री मेळावा ११ व १२ जुलै रोजी होईल. हा मेळावा मंगल्य मंगल कार्यालय, येथे सकाळी १० ते रात्री ८ या वेळेत सर्वांसाठी खुला राहणार आहे. या प्रदर्शनामध्ये भारतीय वस्त्रे व हस्तकला, हस्तनिर्मित उत्पादने, लोणची, पापड, घरगुती खाद्यपदार्थ, सेंद्रिय व नैसर्गिक उत्पादने, आयुर्वेदिक उत्पादने, महिला उद्योजिका व बचतगटांची उत्पादने, तसेच गुणवत्तापूर्ण व ब्रँडेड वस्तू एकाच छताखाली उपलब्ध होणार आहेत. या उपक्रमाचे आयोजन जिल्हा व्यवस्थापक श्रेयस कुलकर्णी, बिरुदेव वाघमोडे आणि आर्या कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले आहे.

## उजनीच्या पाणी पातळीत वाढ; विद्युत पंप काढण्यासाठी शेतकऱ्यांची धावपळ

**तभा वृत्तसेवा,**
**जेऊर, दि. ८ जुलै-**

पुणे जिल्ह्यात पडलेल्या मुसळधार पावसाने उजनी जलाशयात झपाटणे वाढ होत आहे.त्यामुळे धरण क्षेत्रातील शेतकऱ्यांनी उन्हाळ्यात पाणी उचलण्यासाठी खाली नेलेल्या मोटारी वर घेण्यासाठी धावपळ सुरू झाली आहे.

मागील काही दिवसात वजा २६ टक्के वर गेलेले धरण पुणे जिल्ह्यात पडलेल्या मुसळधार पावसामुळे झपाट्याने भरत आहे. दौंड वरून येणारा विसर्ग तब्बल दीड लाखांच्या आसपास आहे. त्यामुळे धरण क्षेत्रातील शेतकऱ्यांना आपले विद्युत पंप, स्टार्टर, पाईप, केबल इत्यादी साहित्य सुरक्षित स्थळी नेण्यासाठी धांदल उडाली आहे. अचानक आलेल्या पाण्यामुळे उजनी धरण क्षेत्रातील फुगवट्यावर असणाऱ्या उमरड, सोगाव, मांजरगाव, वाशिंबे अशा धरण काठावरील गावातील शेतकऱ्यांना पाणी वाढताक्षणी धावपळ करून पाणीपुरवठा योजनेचे सर्व साहित्य लगबगिने वर काढावे लागत आहे. अचानक वाढत असलेल्या पाण्यामुळे शेतकऱ्यांना पाण्यातून विद्युत पंप व इतर साहित्य वर काढण्याची वेळ आली आहे. बहुतांश शेतकऱ्यांनी उजनी धरण वजा मध्ये जात असल्याने मोठमोठ्या चाऱ्या खोदून पाणी आपल्या पाईपलाईन पर्यंत आणण्याची व्यवस्था एकत्रितपणे केली आहे.

गतवर्षी पाण्याचे योग्य नियोजन न झाल्याने धरण १००% भरून सुद्धा उन्हाळ्यात पाणी पातळी झपाट्याने कमी झाली होती यंदा तरी शेतकऱ्यांवर ती वेळ येऊ नये असे बोलले जात आहे.

## जिल्ह्यातील फळबागायतदारांनी पिकविमा काढावा : भोसले

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ जुलै-**

प्रधानमंत्री पीक विमा योजनेअंतर्गत पुनर्रचित हवामान आधारित फळपीक विमा योजना खरीप हंगाम २०२६ साठी केंद्र शासन व राज्य शासनाच्या सहकार्याने सुरू करण्यात आली असून, सोलापूर जिल्ह्यासाठी डाळिंब, पेरू, लिंबू, चिकू, सीताफळ व द्राक्ष ही फळपिके अधिसूचित करण्यात आली आहेत. पात्र फळबाग धारक शेतकऱ्यांनी विहित मुदतीत विमा संरक्षणाचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शुक्राचार्य भोसले यांनी केले आहे.

या योजनेनुसार डाळिंब (उत्पादनक्षम वय २ वर्षे), पेरू (३ वर्षे), लिंबू (४ वर्षे), चिकू (५ वर्षे), सीताफळ (३ वर्षे) आणि द्राक्ष (२ वर्षे) या फळपिकांचा समावेश करण्यात आला आहे. डाळिंब, पेरू, लिंबू व द्राक्ष या पिकांसाठी विमा भरण्याची अंतिम मुदत १४ जुलै २०२६, चिकूसाठी ३० जुलै २०२६, तर सीताफळासाठी ३१ जुलै २०२६ निश्चित करण्यात आली आहे. जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी आपल्या नजीकच्या कॉमन सर्व्हिस सेंटर , बँक किंवा आपले सरकार सेवा केंद्र येथे भेट देऊन विहित मुदतीपूर्वी फळबागेचा विमा उतरवून घ्यावा.

## एमआयटी स्कूलमध्ये पालक-शिक्षक संघ कार्यकारी समितीची निवड

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ जुलै-**

एमआय.टी. विश्वशांती गुरुकुल स्कूलमध्ये शैक्षणिक वर्ष २०२६-२७साठी पालक-शिक्षक कार्यकारी समितीची निवडणूक लोकशाही वातावरणात संपन्न झाली.

प्राचार्या रूपाली हजारे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच निवडणूक समितीच्या देखरेखीखाली ही निवड प्रक्रिया महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क नियमन) कायदा व नियमांनुसार यशस्वीरीत्या पार पडली.

कार्यक्रमाच्या प्रारंभी उपस्थित पालकांचे स्वागत करण्यात आले.




यावेळी प्राचार्या रूपाली हजारे यांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी पालकांचा सक्रिय सहभाग अत्यंत महत्त्वाचा असल्याचे सांगत पालक-शिक्षक संघाची उद्दिष्टे, भूमिका आणि जबाबदाऱ्या याविषयी मार्गदर्शन केले. शाळेच्या प्रगतीसाठी पालकांनी सहकार्याची भूमिका निभावावी, असे आवाहन त्यांनी केले. कार्यकारी पालक-शिक्षक संघाच्या उपाध्यक्ष (पालक), सहसचिव (पालक) तसेच इयत्तानिहाय पालक सदस्यांची निवड विहित नियमांनुसार करण्यात आली. पात्र उमेदवारांच्या अर्जांची छाननी करून अंतिम यादी जाहीर करण्यात आली. ज्या पदांसाठी उपलब्ध जागांपेक्षा अधिक नामांकने प्राप्त झाली होती, त्या ठिकाणी सर्व उपस्थित पालकांच्या साक्षीने पूर्ण पारदर्शकतेने चिठ्ठीद्वारे निवड प्रक्रिया राबविण्यात आली. विद्यार्थ्यांच्या हस्ते पालकांच्या उपस्थितीत हस्ते चिठ्ठ्या काढण्यात आल्या आणि प्रत्येक टप्प्यानंतर निवड झालेल्या प्रतिनिधींची नावे अधिकृतपणे जाहीर करण्यात आली. सूत्रसंचालन श्वेता चव्हाण यांनी केले आणि अर्चना बिचल यांनी आभार मानले.

# प्राथमिक शिक्षण विभागातर्फे मोफत पाठ्यपुस्तके, गणवेश वितरणाला वेग

## ४ लाख विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तके; दोन लाख विद्यार्थ्यांच्या गणवेशासाठी निधी वितरित; उर्वरित विद्यार्थ्यांना गणवेश ४-५ दिवसांत मिळणार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ जुलै-**

सोलापूर जिल्ह्यातील प्राथमिक शिक्षण व्यवस्थेत नव्या शैक्षणिक वर्षाची तयारी अंतिम टप्प्यात असून समग्र शिक्षा अभियानांतर्गत मोफत पाठ्यपुस्तक व गणवेश वितरणाला वेग आला आहे. जिल्ह्यातील इयत्ता पहिली ते आठवी पर्यंतच्या लाखो विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी आवश्यक सुविधा वेळेत उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने प्राथमिक शिक्षण विभागाने वितरणाची व्यापक मोहीम राबविली आहे. प्राथमिक शिक्षण विभागाने उर्वरित पाठ्यपुस्तके आणि गणवेशांचे वितरण लवकर पूर्ण करून प्रत्येक विद्यार्थ्याला शैक्षणिक साहित्य वेळेत उपलब्ध करून देण्याचे नियोजन केले आहे.

मोफत पाठ्यपुस्तक योजनेअंतर्गत जिल्ह्यातील ३,८४५ शाळांमधील ४ लाख ३१ हजार विद्यार्थ्यांसाठी २१ लाख ९९ हजार ५२२ पाठ्यपुस्तकांची मागणी नोंदविण्यात आली होती. त्यापैकी १९ लाख ३२ हजार ४०८ (८७.८६ टक्के) पाठ्यपुस्तके तालुका स्तरावर प्राप्त होऊन शाळांमध्ये वितरित करण्यात आली आहेत.

उर्वरित २ लाख ६७ हजार ११४ (१२.१४ टक्के) पाठ्यपुस्तके अद्याप प्राप्त झालेली नाहीत. विशेषतः कन्नड व उर्दू माध्यमातील काही पुस्तके तसेच बदललेल्या अभ्यासक्रमातील काही विषयांची पुस्तके छपाईनंतर उपलब्ध होताच तातडीने शाळांपर्यंत पोहोचविण्यात येणार असल्याचे शिक्षण विभागाने स्पष्ट केले आहे. दरम्यान, मोफत गणवेश योजनेअंतर्गत जिल्ह्यातील २,८४१ शाळांमधील १ लाख ८० हजार ५२७ विद्यार्थ्यांसाठी ४ कोटी ३३ लाख २६ हजार ४८० रुपयांचा निधी वितरित करण्यात आला आहे. शासनाकडून पहिल्या टप्प्यात प्रति विद्यार्थी २४० रुपये (८० टक्के) अनुदान उपलब्ध करून देण्यात आले असून त्यानुसार शाळा व्यवस्थापन समित्यांमार्फत गणवेश शिवण्याची प्रक्रिया सुरू आहे. आतापर्यंत १ लाख २४ हजार ५६४ विद्यार्थ्यांना (६९ टक्के) गणवेश मिळाले असून ५५ हजार ९६३ विद्यार्थ्यांना (३१ टक्के) पुढील चार ते पाच दिवसांत गणवेश उपलब्ध करून देण्याची कार्यवाही सुरू आहे.

> समग्र शिक्षाअंतर्गत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांतील सर्व मुली, अनुसूचित जाती-जमाती, दारिद्र्यरेषेखालील व इतर मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना दोन गणवेशांसाठी ६०० रुपये, तर बूट व मोज्यांसाठी १२० रुपये इतके अनुदान दिले जाते. तसेच जिल्ह्यातील ३९ पीएम श्री शाळांनाही प्रति विद्यार्थी दोन गणवेशांसाठी स्वतंत्र निधी वितरित करण्यात आला आहे.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# मोडनिंब येथे वीज खंडितमुळे महावितरणविरोधात संताप

**मोडनिंबकर त्रस्त; दिला आंदोलनाचा इशारा**

**तभा वृत्तसेवा,**
**मोडनिंब, दि. ८ जुलै-**

मोडनिंब(ता. माढा) शहरात गेल्या काही दिवसांपासून वारंवार वीजपुरवठा खंडित होत असल्याने नागरिक, विद्यार्थी तसेच लहान मोठे व्यावसायिक मोठ्या अडचणीत सापडले आहेत. ऐन पावसाळ्यात सलग अनेक तास वीजपुरवठा खंडित होत असल्याने महावितरणच्या कारभाराबाबत नागरिकांमधून तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे.

मागील काही दिवस अनेक भागांत वारंवार वीज खंडित झाली. काही ठिकाणी तब्बल आठ ते दहा तास वीज नसल्याने नागरिकांचे दैनंदिन जीवन विस्कळीत झाले. विशेषतः सायंकाळ व रात्रीच्या वेळेत वीजपुरवठा खंडित होत असल्याने नागरिकांना अंधारात राहावे लागत आहे. उकाड्यामुळे लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि रुग्णांचे मोठे हाल होत आहेत.सततच्या वीज खंडितीमुळे घरगुती कामे, व्यापारी, व्यवहार, छोटे उद्योग तसेच विद्यार्थ्यांच्या अभ्यासावर विपरीत परिणाम होत आहे. वारंवार होणाऱ्या वीज ये-जा मुळे घरगुती इलेक्ट्रॉनिक उपकरणे खराब होण्याची भीतीही नागरिकांनी व्यक्त केली आहे. दरम्यान, महावितरणचे कार्यालय शहरात स्थलांतरित करावे, तक्रारींना तत्काळ प्रतिसाद द्यावा तसेच वीजपुरवठा सुरळीत करण्यासाठी कायम स्वरूपी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे. वारंवार होणाऱ्या वीज खंडितीमुळे नागरिकांचा संयम सुटत असून, लवकरात लवकर ठोस उपाययोजना न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही दिला आहे.

मोडनिंब या गावात गावठाण फिडर हा शेटफळ उपकेंद्रातून आहे. त्यावर लोड जास्त असल्यामुळे ते गावठाण फिडरला लोड शेडिंग करत होते. लोड कमी करण्यासाठी गावातील काही ट्रान्सफॉर्मर सोलंकरवाडी उपकेंद्रावर जोडले आहेत. मंगळवारी सदर ३३ केवी टेंभुर्णीहून येणारी लाईन फॉल्टी झाल्यामुळे काही काळ तो फिडर बंद होता. आज बुधवार असल्यामुळे लाईन मेंटेनन्स करण्यासाठी टेंभुर्णीतून बंद केला होता. सदर लाईनचा मेंटेनन्स पूर्ण केलेला आहे. सदर लाईन व्यवस्थित चालू राहील आणि विद्युत पुरवठा खंडित होणार नाही याची काळजी घेतली जाईल.

**-संतोष सूळ,** सहायक अभियंता, शाखा मोडनिंब.

अनेक दिवसांपासून मोडनिंब शहराचा वीजपुरवठा सतत खंडित होत आहे. याचा परिणाम व्यावसायिक, शेतकरी व अन्य गोष्टींवर होत आहे. याच्यावर योग्य तो मार्ग काढावा. महावितरणचे कार्यालय म ोडनिंब येथे स्थलांतरित करा अन्यथा तीव्र अंदोलन छेडण्यात येईल.

**- ॲड. विजयसिंह गिड्डे,** मोडनिंब

कोट वारंवार वीज खंडित होत असल्याने डेअरी उत्पादने आणि इतर थंड पदार्थ वितळण्याचा होण्याचा धोका निर्माण होतो. त्यामुळे आर्थिक नुकसान सहन करावे लागत आहे. महावितरणने अखंड वीजपुरवठा करण्यासाठी तातडीने उपाययोजना कराव्यात.

**- संभाजी काळे,** व्यावसायिक.

# भीमा खोऱ्यात पावसाची संततधार कायम

## उजनी पाणीसाठा ७२.३९ टीएमसीवर; दौंडच्या विसर्गात चढ-उतार सुरु

**तभा वृत्तसेवा,**
**टेंभुर्णी, दि. ८ जुलै-**



भीमा खोऱ्यासह पुणे परिसरात गेल्या चार दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे उजनी धरणाच्या पाणीसाठ्यात सातत्याने वाढ होत आहे. बुधवार, ८ जुलै २०२६ रोजी , सायंकाळी ६ वा . पर्यंत उपलब्ध आकडेवारीनुसार उजनी धरणातील एकूण पाणीसाठा ७२.३९ टीएमसी इतका झाला आहे. धरणातील उपयुक्त पाणीसाठा ८.७४ टीएमसी असून धरण १६.३१ टक्के भरले आहे.

महिनाभर दडी मारलेल्या वरुणराजाने १ जुलैपासून दमदार पुनरागमन केल्याने धरण साखळीतील बहुतांश धरणांमध्ये मोठ्या प्रम ाणावर पाण्याची आवक सुरू झाली आहे. त्यामुळे वरच्या धरणांतून टप्प्याटप्प्याने पाण्याचा विसर्ग वाढविण्यात येत असून दौंड येथील विसर्गातही चढ-उतार पाहायला मिळत आहे. भीमा नदीपात्रातून येणाऱ्या वाढत्या पाण्यामुळे धरणातील साठ्यात आणखी वाढ होण्याची शक्यता जलसंपदा विभागाने व्यक्त केली आहे. दौंड येथे भीमा नदीतील विसर्ग ९२,८९२ क्युसेक इतका पुणे जिल्ह्यातून येत आहे. पावसाच्या तीव्रतेनुसार हा विसर्ग कमी-जास्त होत असल्याने नदीकाठच्या गावांनी सतर्क राहण्याचे आवाहन प्रशासनाकडून केले आहे. तसेच धरण साखळीतील पाण्याची आवक आणि हवामानाचा अंदाज लक्षात घेऊन विसर्गात आवश्यकतेनुसार बदल करण्यात येत आहेत. सध्या भीमा खोऱ्यात पावसाची संततधार कायम असल्याने उजनी धरणाच्या पाणीसाठ्यात येत्या काही दिवसांत आणखी लक्षणीय वाढ होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

उजनीत पाणी वाढत असल्याने सोलापूर जिल्ह्यातील शेतकरी व नागरिकांमध्ये सम ाधानाचे वातावरण आहे. आगामी खरीप हंगामासाठी ही पावसाची साथ दिलासादायक ठरत आहे. उजनी जलाशयात पाण्याची वाढ होत असल्याने आमदार अभिजित पाटील यांनी भीमा सीना बोगदा व सीना माढा उपसासिंचन याद्वारे पाणी सोडण्याची मागणी पालकमंत्री गोरे यांच्याकडे केली आहे. पुणे जिल्ह्यात भरपूर पाऊस पडत असला तरी अद्यापही सोलापूर जिल्ह्याबरोबर माढा तालुक्यात पावसाने दडी मारल्याने शेतीसाठी व जनावरांसाठी पाणी सोडवण्यासाठी आ. अभिजीत पाटील यांनी पालकमंत्र्याकडे मागणी केली आहे

# आषाढीसाठी करमाळा नगरपालिका सज्ज : नगराध्यक्षा सावंत; १० जुलै रोजी बैठक

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि. ८ जुलै-**

आषाढी एकादशीच्या पार्श्वभूमीवर पंढरपूरकडे जाणाऱ्या वारकऱ्यांच्या सुविधांसाठी करमाळा नगरपरिषद प्रशासन सज्ज झाले आहे. शुक्रवार, १० जुलै रोजी याबाबत विशेष नियोजन बैठकीचे आयोजन केल्याची माहिती नगराध्यक्षा मोहिनी सावंत यांनी दिली.

नगराध्यक्षा मोहिनी सावंत यांच्या अध्यक्षतेखाली आणि उपनगराध्यक्ष अतुल फंड यांच्या प्रमुख उपस्थितीत ही बैठक करमाळा नगरपरिषद कार्यालयात पार पडणार आहे. आषाढी वारीच्या काळात करमाळा शहरातून अनेक छोट्या-मोठ्या दिंड्या पंढरपूरकडे मार्गस्थ होत असतात. या पार्श्वभूमीवर वारकऱ्यांना निवास, पिण्याचे पाणी, स्वच्छता, शौचालय सुविधा आणि इतर मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी नगरपरिषदेकडून युद्धपातळीवर तयारी सुरू आहे. बैठकीला सर्व नगरसेवक, मुख्याधिकारी, विविध विभागांचे प्रमुख आणि कर्मचारी उपस्थित राहणार आहेत. शहरातील समाज मंदिरे, धार्मिक स्थळे आणि सार्वजनिक सभागृहे वारकऱ्यांच्या निवासासाठी सज्ज ठेवण्याबाबत निर्देश देणार आहेत. तसेच सार्वजनिक शौचालयांची तातडीने दुरुस्ती करून तेथे मुबलक पाणी उपलब्ध करून देण्यावर विशेष भर देणार आहे. याशिवाय प्रत्येक प्रभागातील समस्या, वारकऱ्यांच्या गरजा आणि आवश्यक उपाययोजना याबाबत नगरसेवकांकडून सूचना घेऊन त्याची तातडीने अंमलबजावणी करण्याचा निर्णय बैठकीत घेणार आहे.

# कॉरिडॉर, डीपी प्लॅन संदर्भात आज महत्त्वपूर्ण बैठक

**सुरुवातीला केवळ नगरसेवकांना देणार माहिती**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.८ जुलै-**

राज्य शासनाने कॉरिडॉरच्या आराखड्यास मंजुरी दिली आहे. मात्र, हा आराखडा नगराध्यक्ष, नगरसेवक व नागरिकांना दाखवला नव्हता. आता गुरुवारी दि. ९ जुलै रोजी पंढरपूर नगरपरिषदेम धील छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात उपजिल्हाधिकारी संतोष देशमुख कॉरिडॉरचा आराखडा सादर करणार आहेत. कॉरिडॉर कोणत्या पद्धतीने करण्यात येणार आहे, याची माहिती केवळ नगरसेवकांना देणार आहेत.

कॉरिडॉरसाठी सुमारे ४ हजार कोटी रुपयांचा निधी राज्य शासनाने मंजूर केला आहे. प्रशासनाने कॉरिडॉरचा आराखडा तयार केला आहे. त्यास शिखर समिती व शासनाने मंजुरी दिली आहे. त्यामुळे आषाढी यात्रेनंतर कॉरिडॉरच्या कामाला सुरुवात होणार आहे. कॉरिडॉरचा आराखडा नगराध्यक्ष, नगरसेवकांना व मालम त्ताधारकांना दाखवण्याची मागणी अनेक दिवसांपासून होत होती. याची दखल घेऊन गेल्या आठवड्यात हा आराखडा केवळ नगरसेवकांना दाखविण्यात येणार होता. मात्र, जिल्हाधिकारी एस.कार्तिकेयन व उपजिल्हाधिकारी संतोष देशमुख बैठकीसाठी मुंबई येथे गेल्यामुळे ही बैठक रद्द केली होती. त्यानंतर आता ही बैठक गुरुवारी ९ जुलै होत आहे.

चौकट : पुण्या,मुंबईचे दर पंढरपूरात

कॉरिडॉर होणार ही काळ्या दगडावरील पांढरी रेघ आहे. परिणामी शहरातील मालमत्ता तसेच उपनगरातील फ्लॅट्स आणि ओपन प्लॉट्सच्या किंमती गगनाला भिडल्या आहेत. पुण्या-मुंबईचा दर सध्या पंढरपुरात सुरू आहे.

# शाळा बंद आंदोलनात सहभागी होणाऱ्या शिक्षकांवर कारवाई करणार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ जुलै-**

राज्य सरकारच्या दृष्टीने महत्त्वाच्या असणाऱ्या एसआयआर (स्पेशल इंटेन्सिव्ह रिव्हिजन) या राष्ट्रीय मोहिमेच्या कामात कोणतीही दिरंगाई अथवा कुचराई सहन केली जाणार नसून, नियुक्त बीएलओ म्हणून काम करणाऱ्या शिक्षकांनी ३१ जुलैपर्यंत सर्व माहिती संकलनाचे काम पूर्ण करावे, यासाठी शाळा सकाळच्या सत्रात भरवण्याचे स्पष्ट निर्देश माध्यमिक शिक्षणाधिकारी सचिन जगताप यांनी दिले आहेत.

या राष्ट्रीय कामकाजात जाणीवपूर्वक हलगर्जीपणा किंवा कामचुकारपणा करणाऱ्या शिक्षकांविरुद्ध फौजदारी गुन्हा दाखल करण्याची कारवाई केली जाईल, असा निर्वाणीचा इशाराही त्यांनी दिला. जिल्हाधिकारी यांच्या आदेशानुसार सोलापूर जिल्ह्यातील माध्यमिक शिक्षण विभागातील अनेक शिक्षकांची बीएलओ म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. या मोहिमेच्या पार्श्वभूमीवर शैक्षणिक कामकाजावर परिणाम होऊ नये, यासाठी माध्यमिक शिक्षण विभागाने विशेष नियोजन केले आहे.

यानुसार सर्व शाळांनी सकाळी ७ ते ११ या वेळेत नियमित अध्यापन व शैक्षणिक उपक्रम पूर्ण करावेत. त्यानंतर नियुक्त शिक्षकांनी दिवसभर बीएलओ म्हणून एसआयआर मोहिमेचे काम युद्धपातळीवर पार पाडावे, अशा सूचना देण्यात आल्या आहेत. यामुळे विद्यार्थ्यांच्या शिक्षणात अडथळा येणार नाही, तसेच राष्ट्रीय मोहिमेचे उद्दिष्ठी वेळेत पूर्ण होईल, असा विश्वास प्रशासनाने व्यक्त केला आहे. यापूर्वी मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन यांनी बीएलओ म्हणून नियुक्त शिक्षकांना इतर शैक्षणिक कामे देऊ नयेत, असे निर्देश दिले होते. मात्र काही शाळांमध्ये अध्यापनावर परिणाम होत असल्याचे निदर्शनास आल्यानंतर शिक्षण विभागाने सकाळी अध्यापन आणि त्यानंतर बीएलओ कामकाज असा समन्वयाचा मार्ग स्वीकारला आहे.

**अन्यथा शासन नियमानुसार कारवाई करणार : जगताप**

३१ जुलैपर्यंत सर्व माहिती संकलित करून त्याचा अहवाल जिल्हाधिकारी कार्यालयाकडे सादर करणे बंधनकारक आहे. शैक्षणिक गुणवत्तेत राज्यात आघाडीवर असलेल्या सोलापूर जिल्ह्याने एसआयआर राष्ट्रीय मोहिमेतही उत्कृष्ट कामगिरी करावी, यासाठी सर्व शिक्षकांनी जबाबदारीने आणि समन्वयाने काम करावे टीईटी परीक्षेच्या विरोधात समन्वय समितीच्या शाळा बंद आंदोलनात सहभागी होणाऱ्या शिक्षकांवर शासनाच्या नियमानुसार कारवाई करण्यात येणार आहे. परंतु शिक्षकांनी या आंदोलनात सहभागी न होता, अध्यापनाचे तसेच सर मोहिमेचे कामकाज पूर्ण करावे असे आवाहन जगताप यांनी केले आहे.

**अन्यथा वेतनकपात : कादर शेख**

राज्यातील काही शिक्षक संघटनांनी पुकारलेल्या 'शाळा बंद' आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षण विभागाने कठोर भूमिका घेतली आहे. आंदोलनात सहभागी होऊन शाळा बंद ठेवणाऱ्या किंवा शैक्षणिक कामकाजात अडथळा निर्माण करणाऱ्या शिक्षकांवर नियमानुसार कारवाई करण्यात येणार असून, संबंधित शिक्षकांचे 'काम नाही तर वेतन नाही' या तत्त्वानुसार वेतन कपात करण्यात येईल, असा स्पष्ट इशारा प्राथमिक शिक्षणाधिकारी कादर शेख यांनी दिला आहे.

# देशी बनावटीचे पिस्तूल प्रकरण; एकाला अटक

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. ८ जुलै-**

सांगोला तालुक्यातील हातीद गावाच्या ब्रिजखाली केलेल्या कारवाईतील आरोपींना न्यायालयाने एक दिवसाची पोलिस कोठडी मंजुर केली आहे.

तपासादरम्यान दिलीप शिवाजी अलदर (वय-४६, रा.म दने वस्ती, कोळे, ता.सांगोला) यास ताब्यात घेवुन त्याच्याकडून १ देशी बनावटीचे पिस्तुल व २ जिवंत काडतुस, १ मोबाईल असे एकुण ६० हजार ४०० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे. गुन्ह्यात ४ आरोपींकडून एकुण ३ देशी बनावटी पिस्तुल, ६ जिवंत काडतुस, ४ मोबाईल असा २ लाख ४६ हजार २०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

ही कामगिरी पोलीस अध-ीक्षक अतुल कुलकर्णी, अपर पोलीस अधीक्षक विजय कबाडे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखा, सोलापूर ग्रामीणचे पोलीस निरीक्षक संजय जगताप यांच्या नेतृत्वाखाली सपोनि.अमित बाबर, सपोनि.विजय शिंदे, पोहेकॉ.सलीम बागवान, दशरथ गोरे, अतुल घाडगे, रवि माने, विरेश कलशेट्टी, व्यंकटेश मोरे, मपोहवा.दिपाली जाधव, पल्लवी इंगळे, अश्विनी गोटे, सुनंदा झळके, पोना.जगदिश राठोड, पोकों.अन्वर अत्तार, सुरज रामगुडे, मनोज राठोड, शिवलिंग स्वामी, पोकों.सुनिल पवार, आशुतोष जाधव तसेच सांगोला पोलीस ठाणेकडील पोउपनि. सागर पाटील, पोहवा.कोष्टी यांनी केली.

# रोड क्रॉस करताना पादचाऱ्याचा मृत्यू

**सोलापूर, दि. ८ जुलै-**

रस्ता क्रॉस करताना अज्ञात वाहनाच्या धडकेत जखमी झालेल्या एका पादचाऱ्याचा उपचारादरम्यान येथील शासकीय रुग्णालयात आज मंगळवारी पहाटे दोन वाजता मृत्यू झाला. लक्ष्मण विठ्ठल लोखंडे (वय ७० वर्ष, राहणार गणेश नगर, मडके वस्ती सोलापूर ) असे त्या मयत पादचारी वृद्ध इसमाचे नाव आहे . ते पाच जुलै रोजी सायंकाळी घराजवळून पायी रस्ता ओलांडीत असताना अज्ञात वाहनाने त्यांना धडक दिली होती . यात मार लागून जखमी झाल्याने त्यांना बेशुद्ध अवस्थेत येथील शासकीय रुग्णालयात मुलगा नितीन याने दाखल केले असता त्यांचा उपचारादरम्यान आज पहाटे मृत्यू झाला .

# 'गाव तिथे स्मशानभूमी' संकल्पनेला गती देणार

**ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे; प्रत्येक गावात अंत्यसंस्काराची सुविधा देण्याची ग्वाही**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ जुलै-**



राज्यातील एकूण ४०,७६० महसुली गावांपैकी ३२,७९१ गावांमध्ये स्मशानभूमीची सुविधा उपलब्ध असली, तरी ७,४४४ गावांमध्ये अद्यापही स्मशानभूमी उपलब्ध नाही. दरम्यान, गाव तिथे स्मशानभूमी' संकल्पनेला गती देवून प्रत्येक गावात सन्म ानपूर्वक अंत्यसंस्काराची सुविधा उपलब्ध करून देण्याची ग्वाही ग्रामविकासमंत्री जयकुमार गोरे यांनी आज (दि. ८) दिली.

२० फेब्रुवारी २०२६ रोजी ग्रामविकास विभागाने महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. यापुढे कोणत्याही गावासाठी विकासकाम ांचा निधी मंजूर करण्यापूर्वी त्या गावात स्मशानभूमी उपलब्ध असल्याचा दाखला अनिवार्य केले आहे. स्मशानभूमी नसलेल्या गावात स्मशानभूमी उभारणीला प्रथम प्राधान्य दिले जाईल.

आज विधान भवनात यासंदर्भात माहिती देताना ग्राम विकास मंत्री जयकुमार गोरे यांनी सांगितले की, उपस्थित केलेल्या १३ गावांपैकी ज्या गावांमध्ये स्मशानभूमीसाठी जागा उपलब्ध आहे, त्यांच्यासाठी जिल्हा नियोजन समितीमार्फत निधी उपलब्ध करून देण्याबाबत पालकमंत्र्यांकडे विनंती करण्यात येईल.

उर्वरित गावांतील स्मशानभूम ींसाठी आवश्यक निधी जिल्हा परिषदेच्या शेष निधीतून उपलब्ध करून देण्यात येईल. तसेच, संबंधित गावांतील स्मशानभूम ींच्या शेडची कामेही पूर्ण करण्यात येतील.प्रत्येक गावात सन्म ानपूर्वक अंत्यसंस्काराची सुविधा उपलब्ध करून देणे ही शासनाची प्राथमिकता आहे.

# कुंभारी टोल नाक्याजवळ अज्ञात वाहनाच्या धडकेत एक ठार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ जुलै-**

अज्ञात वाहनाच्या धडकेत एक ५५ वर्षीय इसम जागीच ठार झालेल्या अवस्थेत सोलापूर अक्कलकोट मार्गावर कुंभारी टोल नाक्याजवळ सोमवारी रात्री नऊ वाजता मिळून आला. पुंडलिग शिवलिंगप्पा बबलाद ( वय ५५ वर्ष , रा.प्लॉट नं. १५० , कोंडा नगर , अक्कलकोट रोड सोलापूर ) असे त्या मयत व्यक्तीचे नाव आहे .सोमवारी रात्री कुंभारी टोल नाक्याजवळ एका वाहन अपघातात सदर इसम हा गंभीर जखमी होऊन बेशुद्ध पडलेल्या अवस्थेत आढळून आला . ही खबर वळसंग पोलिसांना समजली असता पोलीस हवालदार एस व्ही कुंवर यांनी घटनास्थळी पोहोचून सदरचा मृतदेह येथील शासकीय रुग्णालयात रात्री सव्वा नऊ वाजता दाखल केला असता डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले.

# दुचाकी घसरून जखमी झालेल्या इसमाचा अखेर मृत्यू

**सोलापूर, दि. ८ जुलै-**

दुचाकी घसरून जखमी झालेल्या येणेगुर गावच्या इसमाचा उपचारादरम्यान येथील शासकीय रुग्णालयात सोमवारी सायंकाळी मृत्यू झाला . रमेश सुदर्शन इगवे ( वय ४८ वर्ष ,रा . येणेगुर , ता उमरगा ) असे त्या मयत दुचाकी स्वराचे नाव असून ते २३ जून रोजी संध्याकाळी दुचाकी वरून जात असताना येणेगुर जवळ दुचाकी घसरून जखमी झाले होते . त्यामुळे त्यांना भाचा ऋतिक याने उपचारासाठी येथील शासकीय रुग्णालयात दाखल केले असता त्यांचा उपचारादरम्यान सोम वारी सायंकाळी मृत्यू झाला.

# एसआयआरचे २४ लाख ६७ हजार मतदारांना एपिक फॉर्म वाटप

## जिल्हाधिकारी एस. कार्तीकेयन; राज्यात सोलापूर जिल्हा टॉप टेनमध्ये; 'बीएलओं'ना दिल्या आवश्यक त्या सूचना

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ जुलै-**



भारत निवडणूक आयोगाच्या निर्दे शाप्रमाणे सोलापूर जिल्ह्यासह संपूर्ण राज्यात मतदार याद्यांचा विशेष सखोल पुनर्रिक्षण कार्यक्रम राबविण्यात येत आहे. जिल्ह्यातील दि. ३० जून ते २९ जुलै २०२६ या कालावधीत ३९ लाख ४१ हजार ५५ मतदारांसाठी ३ हजार ७२३ बीएलओ मार्फत हा कार्यक्रम सुरू करण्यात आलेला आहे. यातील २४ लाख ६६ हजार ८९१ मतदारांना एपिक फॉर्म वाटप केले आहेत. आजतागायत जिल्ह्यात ८ टक्के काम पूर्ण झाले असून, राज्यात सोलापूर जिल्हा टॉप टेनमध्ये असल्याची माहिती जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी आज (दि.८) माध्यम ांशी बोलताना दिली. दरम्यान, सर्व बीएलओंनी हे काम एक राष्ट्रीय कर्तव्य समजून अत्यंत काटेकोरपणे दिलेली जबाबदारी पार पाडावी, असे आवाहन केल्याचेही त्यांनी सांगितले.

ावेळी जिल्हाधिकारी एस. कार्तीकेयन म्हणाले की, ३० जून पासून आपल्या जिल्ह्यात विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रम ास सुरुवात झालेली आहे. एपिक फॉर्म मतदारांना वितरित करावेत, अशा सूचना देऊन जे बीएलओ हे काम करणार नाहीत किंवा बीएलओंनी हे काम करताना त्यांचे वरिष्ठ अडचण निर्माण करत असतील तर अशा संबंधात त्यावर निवडणूक आयोगाच्या निर्देशाप्रमाणे कारवाई करण्यात येईल, असेही त्यांनी निर्देशित केले होते. यामुळे जवळपास २४ लाख ६७ हजार फॉर्मही या बीएलओंनी वितरित केले आहेत.

सोलापूर जिल्हा हा राज्यात सर्वात जास्त मतदारसंख्या असलेल्या जिल्ह्यात पाचवा जिल्हा आहे. एकूण ११ विधानसभा मतदारसंघांम ध्ये ३९ लाख ३८ हजार ६३१ मतदार आहेत. त्यामुळे सर्व संबंधित बी एल ओ यांनी या कार्यक्रमांतर्गत त्यांच्यावर सोपवलेली जबाबदारी एक राष्ट्रीय कर्तव्य समजून पार पाडावी. या कामात कोणत्याही प्रकारचा हलगर्जीपणा खपवून घेतला जाणार नाही, अशाही कडक सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी बीएलओंना दिल्या आहेत. शिक्षण विभागानेही बी एल ओ म्हणून नियुक्त केलेल्या अडीच हजार पेक्षा अधिक शिक्षकांना विशेष सखोल पुरीक्षण कार्यक्रमातिरिक्त कोणत्याही प्रकारची जबाबदारी देऊ नये. पुढील एक महिना याच कामाला अधिक प्राधान्य दिले गेले पाहिजे. तसेच आरोग्य विभाग, महिला व बालविकास विभागाने त्यांच्या अधिनस्त कर्मचाऱ्यांना (आशा वर्कर, अंगणवाडी सेविका) यांनाही इतर अधिकचे जबाबदारी देऊ नयेत, असे निर्देश जिल्हाधिकारी एस. कार्तीकेयन यांनी दिले आहेत.

दरम्यान, या कामात हलगर्जी केलेल्या २ बीएलओंवर एफआयआरही दाखल केल्याचे यावेळी जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले. यामुळे सध्या या कामात कोणीही हयगय करीत नसून, दिवसातून २ वेळा मी एसआयआरचा आढावा घेत असल्याचे त्यांनी सांगितले. यापूर्वी सर्वपक्षीय लोकप्रतिनिधींना पाचारण करून या एसआयआर कामासाठी सहकार्य करण्याचे आवाहन जिल्हाधिकाऱ्यांनी केले होते; यामुळे जिल्ह्यातील विविध पक्षीय पदाधिकारीही या कामात जिल्हा प्रशासनाला सहकार्य करीत आहेत. दरम्यान, आता ऑनलाईन पध्दतीने एसआयआरचे कामकाज चालू होणार असल्याने आता पुन्हा ऑफलाईन फॉर्म भरावे लागणार नसल्याचेही जिल्हाधिकाऱ्यांनी यावेळी नमूद केले. ऑनलाईन प्रक्रियेमुळे मतदारांना आता घरी बसून आपला फॉर्म भरता येणार आहे. यामुळे आता या कामाला वेग येईल, असेही जिल्हाधिकाऱ्यांनी शेवटी नमूद केले.




**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तरुण भारत कार्यालय, स्वेतसागर निवास, राजमाता जिजामाता महाविद्यालयजवळ, पत्रकार रोड, शिवनगर, जि. लातूर - ४१३५१२. कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. दूरध्वनी : ८८८८८४७२३९ ● मुख्य समुह संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक : **प्रशांत वसंतराव माने** (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत. **RNI No. MAHMAR/2023/86477. E-mail starunbharatgmail.com.** ● **Websate:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

**Owned by, SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LTD. Printed by, Published by** DILIP SHIVMURTI DULANGE **Printed at** SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LT. 19,20 INDUSTRIAL ESTATE, HOTGI ROAD, SOLAPUR, Dist. SOLAPUR, 413003. **Publised at** TARUN BHARAT OFFICE, SwetSagar Niwas, Near Rajmata Jijamata College, Patrakar Road, Shivnagar, Dist. Latur Pin 413512, **RNI No. MAHMAR/2023/86477**
● **CHIEF GROUP EDITOR :** DILIP YASHWANT PETHE ● **CHIEF EDITOR :** PRASHANT VASANTRAO MANE

CMYK

लातूर
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## लातूर जिल्ह्यात खरीप हंगामासाठी सुधारीत पीक विमा योजना लागू

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. ८ जुलै : सन २०२६-२७ या वर्षापासून शासनाने खरीप हंगामासाठी सुधारीत प्रधानमंत्री पीक विमा योजना लागू केली आहे. लातूर जिल्ह्यामध्ये ही योजना एस.बी.आय जनरल इन्शुरन्स कंपनी लि. पुणे यांच्यामार्फत राबविण्यात येत आहे. या योजनेत सहभागी होण्यासाठी अंतिम मुदत ३१ जुलै २०२६ अशी निश्चित करण्यात आली असून, शेतकऱ्यांना योजनेचा लाभ घेण्यासाठी 'ई-पीक' नोंदणी करणे आणि 'फार्मर आयडी' असणे अनिवार्य करण्यात आले आहे. ही योजना अधिसूचित मंडळात अधिसूचित पिकांसाठी लागू असून कर्जदार व बिगर कर्जदार अशा दोन्ही प्रकारच्या शेतकऱ्यांसाठी ती पूर्णपणे ऐच्छिक आहे.

योजनेंतर्गत ७० टक्के जोखीमस्तरावर विविध प्रमुख पिकांसाठी प्रति हेक्टर विमा संरक्षित रक्कम आणि शेतकऱ्याने भरावयाचा विमा हप्ता निश्र्चित करण्यात आला आहे. यामध्ये सोयाबीनसाठी ६२ हजार ५०० रुपये विमा संरक्षित रक्कमेवर १ हजार २५० रुपये हप्ता, कापसासाठी ६२ हजार रुपये संरक्षित रक्कमेवर १ हजार ५४३.८० रुपये हप्ता, खरीप ज्वारीसाठी ३३ हजार रुपये संरक्षित रक्कमेवर ६६० रुपये हप्ता, तर बाजरीसाठी ३२ हजार रुपये संरक्षित रक्कमेवर ६४० रुपये हप्ता शेतकऱ्यांना भरावा लागेल. तसेच तूर पिकासाठी ४७ हजार रुपये रक्कमेवर ९४० रुपये, मूग पिकासाठी ३० हजार रुपये रक्कमेवर ४५० रुपये आणि उडीद पिकासाठी २७ हजार रुपये विमा संरक्षित रक्कमेवर ४०५ रुपये प्रति हेक्टर विमा हप्ता निश्चित करण्यात आला आहे.



## विविध वृत्त...

## दिव्यांग उमेदवारांसाठी विशेष रोजगार मेळावा यशस्वी

तभा वृत्तसेवा

लातूर दि. ८ जुलै : जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, लातूर मॉडेल करिअर सेंटर आणि संवेदना दिव्यांग औद्योगिक प्रशिक्षण संस्था, हरंगुळ (बु.) यांच्या संयुक्त विद्यमाने ४ जुलै रोजी पंडित दीनदयाळ उपाध्याय दिव्यांगासाठी विशेष रोजगार मेळाव्याचे यशस्वी आयोजन करण्यात आले होते.

या विशेष रोजगार मेळाव्याचे ऑनलाईन पद्धतीने उद्घाटन करताना कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाचे मंत्री मंगल प्रभात लोढा यांनी उपस्थित दिव्यांगांना मार्गदर्शन करून भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या. या मेळाव्यात एकूण १२ नामांकित कंपन्यांच्या उद्योजकांनी उपस्थित राहून प्रत्यक्ष मुलाखतींद्वारे उमेदवारांची निवड केली. या मेळाव्यास एकूण १६५ नोकरी इच्छुक दिव्यांग उमेदवारांनी हजेरी लावून प्रत्यक्ष मुलाखती दिल्या, ज्यामधून ३८ उमेदवारांची प्राथमिक निवड करण्यात आली असून १९ उमेदवारांची अंतिम निवड झाली आहे.

प्रास्ताविक कौशल्य विकासचे सहायक आयुक्त निशांत सूर्यवंशी यांनी केले. या मेळाव्याला कौशल्य विकास उपआयुक्त श्रीमती विद्या शितोळे, व्यवसाय शिक्षण सहसंचालक प्रदीप दुर्गे, संवेदना प्रकल्पाचे समन्वयक सुरेश पाटील, जिल्हा व्यवसाय शिक्षण प्रशिक्षण अधिकारी प्रवीण औताडे आणि लातूर आयटीआयचे प्राचार्य संजय माळकुंजे आदी उपस्थित होते.

# लातूरला शयनयान वंदे भारत एक्स्प्रेस सुरु करावी : खा. डॉ. काळगे

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. ८ जुलै : मराठवाड्यातील वेगाने विकसित होत जाणाऱ्या लातूरमार्गे सिकंदराबादहून मुंबई - पुणे जाणारी शयनयान वंदे भारत एक्स्प्रेस सुरु करावी अशी आग्रही मागणी खा. डॉ. शिवाजीराव काळगे यांनी लावून धरली आहे.



दक्षिण मध्य रेल्वेची विभागीय बैठक नुकतीच नांदेड येथे पार पडली. या बैठकीस खा. डॉ. शिवाजीराव काळगे यांसह या बैठकीस राज्यसभेचे खा. अशोक चव्हाण, खा. अजित गोपछडे,खा. रामराव वडकुते, नांदेड लोकसभा खा.रविंद्र चव्हाण, हिंगोलीचे खा. नागेश पाटील अष्टीकर, जालन्याचे खा.कल्याण काळे, छत्रपती संभाजीनगरचे खा. संदीपान भुमरे, अमरावतीचे खा. बळवंत वानखेडे, परभणीचे खा. संजय जाधव, अकोल्याचे खा.अनुप धोत्रे, खांडव्याचे खा. ज्ञानेश्र्वर पाटील यांच्यासह दक्षिण मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक, विभागीय रेल्वे व्यवस्थापक व अन्य वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

तसेच सध्या आठवड्यातून तीन दिवस धावणाऱ्या काझीपेठ-हडपसर-काझीपेठ आणि यशवंतपूर-लातूर-यशवंतपूर रेल्वे सेवा दररोज सुरू करण्याची मागणीही त्यांनी केली. याशिवाय लातूर रोड-बोधन व लातूर रोड-नांदेड या नवीन रेल्वेमार्गांचे काम लवकरात लवकर सुरू करण्याबरोबरच विकाराबाद-परळी वैजनाथ रेल्वेमार्गाचे दुहेरीकरण करण्याची आवश्यकता त्यांनी अधोरेखित केली.

प्रवाशांच्या सुरक्षेच्या दृष्टीने उदगीर व लातूर रोड येथे रेल्वे सुरक्षा दलाची (RPF) नियमित चौकी सुरू करण्याची मागणी करण्यात आली. तसेच मचीलीपट्टणम-बिदर एक्सप्रेस लातूरपर्यंत वाढविण्याची मागणीही त्यांनी केली. शेतकऱ्यांच्या हिताचा विचार करून खासदार डॉ. काळगे यांनी चाकूर-वडवळ परिसरात रेल्वे ॲग्रो गुड्स शेड उभारण्याचा प्रस्ताव मांडला. हा परिसर टोमॅटोसह विविध भाजीपाला तसेच ऊसजन्य उत्पादनासाठी महत्त्वाचा असून येथे रेल्वेची पुरेशी जागा उपलब्ध आहे. या ठिकाणी ॲग्रो गुड्स शेड उभारल्यास कृषी उत्पादनांची देशभर जलद, किफायतशीर व सुरक्षित वाहतूक होऊन शेतकऱ्यांना मोठा लाभ होईल, असे त्यांनी नमूद केले. याशिवाय लातूर लोकसभा मतदारसंघातील इतर प्रलंबित रेल्वे विकासकामांबाबतही बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली.

## ढोल-ताशांच्या गजरात अकरावीच्या विद्यार्थ्यांचे स्वागत




तभा वृत्तसेवा

लातूर दि. ८ जुलै : महाविद्यालयाचा पहिला दिवस हा प्रत्येक विद्यार्थ्याच्या शैक्षणिक प्रवासातील एक अत्यंत महत्त्वाचा आणि संस्मरणीय टप्पा असतो. हा क्षण विद्यार्थ्यांसाठी आनंददायी व अविस्मरणीय ठरावा, यासाठी महाविद्यालय व रोटरी क्लब लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयाच्या सभागृहात अकरावीच्या नवप्रवेशित विद्यार्थ्यांचा 'स्वागत सोहळ्याचे आयोजन केले होते.

या स्वागत सोहळ्यात विद्यार्थ्यांचे ढोल ताशाच्या गजरात उत्स्फूर्तपणे स्वागत करण्यात आले. स्वागत सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड होते. तर प्रमुख अतिथी म्हणून विभागीय शिक्षण उपसंचालक डॉ. दीपक चवणे, सहाय्यक शिक्षण संचालक संजय पंचगल्ले, रोटरी क्लब लातूरचे अध्यक्ष विश्र्वनाथ निगुडगे, रोटरी क्लब लातूरचे असिस्टंट गव्हर्नर नरेश कोरे, 'सेवालय' संस्थेचे प्रमुख रवी बापटले, उपप्राचार्य डॉ. अंजली जोशी, पर्यवेक्षक डॉ. प्रशांत दीक्षित प्रामुख्याने व्यासपीठावर उपस्थित होते. यावेळी डॉ. चवणे यांनी दयानंद कला महाविद्यालयाच्या गुणवत्तेचे, शिस्तीचे, कार्यालयीन विभागाकडून मिळणाऱ्या सहकार्याचे प्राचार्य व उपप्राचार्यांचे विशेष कौतुक करत महाविद्यालयाचा पहिला दिवस विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील एक अत्यंत महत्त्वाचा आणि संस्मरणीय क्षण असतो. या दिवशी विद्यार्थ्यांचे स्वागत अशा आनंददायी वातावरणात दयानंद कला महाविद्यालय, लातूर रोटरी क्लब ऑफ लातूर इयत्ता ११ वी विद्यार्थ्यांचा स्वागत संहिता केल्यास त्यांचा उत्साह द्विगुणित होतो आणि शैक्षणिक वर्षाची सुरूवात सकारात्मक होते. विद्यार्थ्यांनी या समृद्ध वातावरणाचा फायदा घेऊन आपल्या उज्ज्वल भविष्याकडे वाटचाल करावी, असे आवाहन त्यांनी केले.

अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ. गायकवाड म्हणाले, महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी आज देश आणि परदेशात उच्च पदांवर कार्यरत असून त्यांनी संस्थेचे नाव उज्ज्वल केले आहे. इथे असणाऱ्या गुणवत्ताधारक शिक्षकांकडून मिळणाऱ्या उत्तम संस्कारांचे बीज घेऊन विद्यार्थ्यांनी आपल्या जीवनाची यशस्वी वाटचाल करावी. सर्व शाखांची जननी ही 'कला' शाखा असून, येथे ३९ टक्क्यांपासून ते ९६ टक्क्यांपर्यंतच्या विद्यार्थ्यांना राष्ट्रपती पदकापर्यंत मजल मारण्यासाठी सर्व आवश्यक सुविधा उपलब्ध केल्या जातात. समाज परिवर्तन घडवण्यासाठी सुसंस्कृत विद्यार्थी ही आजच्या समाजाची गरज बनली असून, विद्यार्थ्यांच्या जीवनाचे खरे परिवर्तन या महाविद्यालयात घडवून आणले जाते, असे म्हणाले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविकात उपप्राचार्य डॉ. दिलीप सागरगोजे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. दिनेश जोशी यांनी केले, तर उपस्थितांचे आभार प्रा. विलास कोमटवाड यांनी मानले. या कार्यक्रमासाठी पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### लातूर महापालिका स्थायी समितीची सभा । इतिवृत्तासह ६ विषयांना मंजुरी

# ९ कोटी ६२ लाखांच्या विकास कामांना मंजुरी

तभा वृत्तसेवा

लातूर दि. ८ जुलै : लातूर शहर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा दि. ७ जुलै रोजी सकाळी ११ वाजता दालन क्रमांक ५५ च्या कॉन्फरन्स हॉलमध्ये सभापती सचिन बंडापल्ले यांच्या अध्यक्षतेखाली झाली. या सभेत शहरातील विविध प्रभागांमधील विकास कामांबाबत चर्चा करुन ९ कोटी ६२ लाख रुपयांच्या विकास कामांना मंजूरी देण्यात आली.



या स्थायी समितीच्या सभेस स्थायी समितीचे सदस्य ॲड. दीपक सुळ, अहेमदखा पठाण, पप्पू देशमुख, ॲड. गिरीष व्याळे, पवन सोलंकर, इसरार सगरे, ॲड. आतिष चिकटे, विकास कांबळे, मनोज थोरात, अनंत गायकवाड, स्वाती घोरपडे, आदिती पाटील कव्हेकर, निकिता सोमवंशी, ज्योती आवसकर, आयुक्त राहूल कुलकर्णी, अतिरिक्त आयुक्त देविदास जाधव, उपायुक्त पंजाब खानसोळे, उपायुक्त वसुधा फड यांच्यासह सर्व विभाग प्रमुखांची उपस्थिती होती. दि. ९ एप्रिल २०२६ च्या सभेचे इतिवृत्त कायम करणे, जिल्हा वार्षिक योजना २०२५-२६ अंतर्गत प्राप्त प्रशासकीय मान्यतेमधील जीईएम पोर्टलवरुन मागविण्यात आलेल्या निविदांवर निर्णय घेणे,

लातूर शहर महानगरपालिकेच्या विविध अधिकारी, पदाधिकारी यांना टुरिस्ट परमिटची वाहने पुरवठा करणे, सामान्य प्रशासन विभागांतर्गत कुशल, अर्धकुशल, अकुशल मनुष्यबळ पुरवठा करणे, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क येथे ७५ फुटी पुतळा उभारणी व विविध विकास कामांसंदर्भात हैदराबाद येथे सदस्यांचा अभ्यास दौरा काढणे, शहरातील विविध प्रभागांतील विकास कामांबाबत चर्चा करणे आदी विषय विषयपत्रिकेवर होते. या सर्व वषयांवर चर्चा, विचार, विनिमय करुन या सर्व विषयांस मंजूरी देण्यात आली.

सभेची सुरुवातच वादळी झाली. आरोग्य विभागाची एक संचिका गहाळ झाली. या संदभनि ॲड. आतिष चिकटे यांनी प्रश्र्न उपस्थित केला. संचिका आणि त्यासंदभनि दिलेला आदेश सभागृहात सादर करावा, अशी मागणी केली. ॲड. दीपक सुळ यांच्यासह इतर सदस्यांनही ॲड. चिकटे यांच्या मागणीला पाठींबा दिला. त्यावरुन सभेत गोंधळ उडाला.

आयुक्त राहूल कुलकर्णी यांनी हस्तक्षेप करीत गहाळ संचिकेची चौकशी केली जाईल व दोषींवर करवाई करण्यात येईल, असे सांगीतले. त

यानंतर विषय पत्रिकेवरी विषयांचे वाचन करुन सर्वच विषय मंजूर करण्यात आले. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क येथे ७५ फुटी पुतळा उभारणी व विविध विकास कामांसंदर्भात हैदराबाद येथे सदस्यांचा अभ्यास दौरा काढावा या विषयावर सर्वच सदस्यांनी सहमती दर्शवली. सभापती सचिन बंडापल्ले यांनी सभेचा समारोप करताना भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याच्या संदभनि लवकरच सदस्यांचा हैदराबाद अभ्यास दौरा काढला जाईल, शहरातील विविध प्रभागांतील विकास कामांसाठी ९ कोटी ६२ लाख रुपयांचा निधी मंजूर केल्याचे जाहीर केले.

## कृषी पायाभूत सुविधा निधी योजनेबाबत उद्या एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. ८ जुलै : भारत सरकारच्या कृषी व शेतकरी कल्याण मंत्रालयामार्फत देशभरात १९ जून २०२६ ते २० जुलै २०२६ या कालावधीत 'कृषी पायाभूत सुविधा निधी' योजनेची विशेष अंमलबजावणी मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेअंतर्गत लातूर जिल्ह्यातील पात्र शेतकरी, शेतकरी उत्पादक कंपन्या आणि कृषी उद्योजकांनी कृषी क्षेत्रात पायाभूत सुविधा उभारण्यासाठी पुढे यावे, असे आवाहन 'आत्मा'चे प्रकल्प संचालक यांनी केले आहे. या मोहिमेचा एक भाग म्हणून १० जुलै २०२६ रोजी सकाळी १० वाजता लातूर येथील कृषी विज्ञान केंद्र येथे एका दिवसीय विशेष कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यशाळेला उपस्थित राहण्याचे आवाहनही त्यांनी केले आहे.

ऑगस्ट २०२० मध्ये 'आत्मनिर्भर भारत' अभियानांतर्गत सुरू झालेल्या या योजनेचा मुख्य उद्देश पीक काढणीनंतरच्या पायाभूत सुविधा आणि सामुदायिक शेतीसाठी आवश्यक सुविधांची निर्मिती करणे हा आहे. यामुळे शेतमालाचे मूल्यवर्धन, साठवणूक, प्रक्रिया आणि वाहतूक यांना मोठी चालना मिळून शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढण्यास मदत होत आहे.

या योजनेअंतर्गत बँकांमार्फत मंजूर होणाऱ्या रु. २ कोटींपर्यंतच्या कर्जावर ३ टक्के व्याज सवलत तसेच शासनामार्फत क्रेडिट गॅरंटीची सुविधा उपलब्ध करून दिली जाते.

## प्लास्टिक बंदीची प्रभावी अंमलबजावणी करा जिल्हाधिकारी यांना संजय राजुळे यांचे निवेदन

तभा वृत्तसेवा

लातूर दि. ८ जुलै : महाराष्ट्रात प्लास्टिक कॅरीबॅगवर बंदी असतानाही लातूर जिल्ह्यात अनेक ठिकाणी त्याचा सर्रास वापर होत असल्याच्या पार्श्र्वभूमीवर आपले आरोग्य, आपलीच जबाबदारी अभियानाचे अध्यक्ष तथा सामाजिक कार्यकर्ते संजय राजुळे यांनी जिल्हाधिकारी श्री. भारत बास्टेवाड यांची भेट घेऊन प्लास्टिक बंदीची प्रभावी अंमलबजावणी करण्याबाबत निवेदन सादर केले.




निवेदनामध्ये जिल्हाभर विशेष तपासणी मोहीम राबवून प्लास्टिक कॅरीबॅगची निर्मिती, विक्री, साठा, वितरण व वापर करणाऱ्यांवर कठोर दंडात्मक कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली. तसेच शासकीय कार्यालये, शाळा, महाविद्यालये, बाजारपेठा व सार्वजनिक ठिकाणी प्लास्टिकमुक्त अभियान प्रभावीपणे राबविणे, नागरिकांमध्ये जनजागृती करणे आणि कापडी पिशव्यांच्या वापराला प्रोत्साहन देण्याची विनंती करण्यात आली.

याशिवाय महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, महानगरपालिका, नगरपालिका, ग्रामपंचायती व संबंधित विभागांच्या संयुक्त विद्यमाने नियमित तपासणी मोहीम राबवून प्लास्टिक वापरावर प्रभावी नियंत्रण आणावे, अशीही मागणी करण्यात आली.

यावेळी संजय राजुळे म्हणाले, पर्यावरण संरक्षण, नागरिकांचे आरोग्य आणि स्वच्छ भविष्यासाठी प्लास्टिकमुक्त लातूर ही काळाची गरज आहे. प्रत्येक नागरिकाने प्लास्टिक पिशव्यांना कायमचा निरोप देऊन कापडी पिशवीचा स्वीकार करावा. जिल्हाधिकारी श्री. भारत बास्टेवाड यांनी निवेदन स्वीकारून संबंधित विभागामार्फत आवश्यक कार्यवाही करण्याचे आश्र्वासन दिले. यावेळी संपादक दत्तात्रय परळकर व वीरभद्र तरगुडे उपस्थित होते.

## डॉक्टर्स डे निमित्त अष्टविनायक प्रतिष्ठानच्या बुद्ध गार्डनमध्ये महिलांसाठी मोफत आरोग्य मार्गदर्शन




तभा वृत्तसेवा

लातूर दि. ८ जुलै : डॉक्टर्स डे निमित्त अष्टविनायक प्रतिष्ठान संचलित बुद्ध गार्डन येथे परिसरातील महिलांसाठी मोफत आरोग्य विषयक मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात डायटिशियन डॉ. दत्ता आंबेकर यांनी दैनंदिन जीवनातील आहार, योग आणि निरोगी जीवनशैली यावर सखोल मार्गदर्शन केले.

यावेळी बोलताना डॉ. दत्ता आंबेकर म्हणाले की, आपल्या दैनंदिन आहारावरच आपल्या आरोग्याचा पाया अवलंबून असतो. योग्य आहार, नियमित व्यायाम आणि योगाच्या माध्यमातून आपण सुदृढ व निरोगी आयुष्य जगू शकतो. त्यामुळे आहाराच्या सवयींवर नियंत्रण ठेवणे आणि आरोग्यदायी जीवनशैली स्वीकारणे गरजेचे आहे.

भारतीय जीवनपद्धतीमध्ये ऋतुमानानुसार आहार-विहाराचे महत्त्व सांगण्यात आले आहे. निसर्गचक्राशी समतोल साधत जीवन जगणे आवश्यक असून, पारंपरिक पद्धतींमधील आरोग्यदायी गोष्टींचे पालन केले पाहिजे, असे मतही त्यांनी व्यक्त केले. तथागत गौतम बुद्धांनी देखील मनः शांती, आहार-विहार आणि संतुलित जीवनाचा संदेश दिल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमादरम्यान उपस्थित महिलांनी आरोग्य, आहार आणि जीवनशैलीविषयक विविध प्रश्र्न विचारले. डॉ. आंबेकर यांनी या प्रश्र्नांना समर्पक उत्तरे देत मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाची सुरुवात बुद्ध वंदनेने झाली. प्रारंभी संचालिका मोहिनी निलंगेकर यांनी प्रास्ताविक करून कार्यक्रमाची भूमिका मांडली. बुद्धगया महिला मंडळाच्या वतीने उपस्थित पाहुण्यांचे स्वागत करण्यात आले. महिला मंडळाच्या अध्यक्षा सुशीला मुगळे यांनी पाहुण्यांचा सत्कार केला.

डॉक्टर्स डे निमित्त आयोजित या उपक्रमातून महिलांमध्ये आरोग्य जागृती निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला. निरोगी समाज निर्मितीसाठी अशा आरोग्य मार्गदर्शन कार्यक्रमांची गरज असल्याचे उपस्थितांनी व्यक्त केले.

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## संक्षिप्त...

### शहीद कॅप्टन कृष्णकांत बलिदान दिन साजरा



तभा वृत्तसेवा

उदगीर दि. ८ जुलै : कॅप्टन कृष्णकांत चौकात उदगीर सेक्टर एनसीसी विभागा अंतर्गत हा कार्यक्रम घेण्यात आला. याप्रसंगी कॅप्टन कृष्णकांत यांच्या आई श्रीमती ललिताबाई कुलकर्णी व त्यांचे बंधू संतोष कुलकर्णी त्यांचे परिवारातील सर्व सदस्य उपस्थित होते.उदगीर सेक्टरचे जेसीओ- दरबान सिंह, हवालदार संदीप कुमार, हवालदार सुनील जाधव, उदयगिरी महाविद्यालयाचे कॅप्टन राम साबदे, सैनिकी विद्यालयाचे ए एन ओ बालाजी मुस्कावाड, शिवाजी कॉलेज सी टी ओ सूर्यवंशी, हावगीस्वामी कॉलेज सी टी ओ शिवकुमार, विद्यावर्धनी हायस्कूल सी टी ओ काकडे ,श्यामलाल हायस्कूल ए नो ओ बालाजी सोनाळे, लाल बहादूर शास्त्री हायस्कूल उदगीर चे उपमुख्याध्यापक श्री. वसंत वाघमारे व एनसीसी प्रमुख श्री वि.र. तेलंग व उदगीर शहरातील सर्व शाळा महाविद्यालयातील एनसीसी कॅडेट याप्रसंगी उपस्थित होते.

## औसा तालुक्यातील खरीप हंगाम पावसाअभावी धोक्यात पेरणी वाया जाण्याची भिंती

तभा वृत्तसेवा /सुधीर गंगणे




औसा दि.९ जुलै : यावर्षीच्या खरिप हंगामात पावसाने दुसऱ्या नक्षत्रातील दुसऱ्या चरणात रिमझिम हजेरी लावली. अपुऱ्या ओलीत पुढील पावसाच्या आशेवर शेतकऱ्यांनी दोन लाख ४२ हजार ११५ एकरापैकी साठ हजार ५२९एकरावर पेरणी केली आहे. पंधरा दिवसांच्या रिमझिमीनंतर पुन्हा पाऊस गायब झाला असून बुधवार दि.८रोजीपासून कुंभारी वारे वाहत आहे.त्यामुळे पावसाअभावी खरिप हंगाम धोक्यात येऊन पेरणी वाया जाण्याची भिंती औसा तालुक्यातील शेतकऱ्यांना वाटत आहे.

गेल्या वर्षीच्या खरिप हंगामात पावसाने तब्बल एक महिना अगोदरच जोरदार सुरुवात केली होती.यामुळे या हंगामात शेतकऱ्यांनी उन्हाळ्यातच पेरणी पुर्व तयारी केली होती. परंतू पावसाने या वर्षीच्या दुसऱ्या नक्षत्रातील दुसऱ्या चरणात रिमझिम आगमन केले. पेरणीस होत असलेला विलंब पाहून शेतकऱ्यांनी पुरेश्या ओलीची वाट न पाहता पेरणीस सुरूवात केली.मृग नक्षत्र कोरडे गेल्यानंतर आर्द्रा नक्षत्रातील दुसऱ्या चरणापासून पुनर्वसू नक्षत्रातील पहिल्या चरणापर्यंत पावसाने रिमझिम हजेरी लावली.पाऊस पडतोय म्हणून शेतकऱ्यांनी पेरणीयोग्य ९६हजार ८४५.७६ हेक्टरापैकी ज्वारी ७४हेक्टर, तूर १९९६ हेक्टर, मुग १८२ हेक्टर, उडीद १९० हेक्टर,सोयाबीन २२हजार ४७८ हेक्टरावर अशी २४हजार ९२१ हेक्टरावर एकच लगबग करीत पेरणी केली आहे.

या खरिप हंगामात पेरणी केलेल्या बियाणांच्या ऊगवणीसाठी लागणाऱ्या ओलींच्या अर्ध्या ओलीवरच पुढील पावसाच्या आशेवर शेतकऱ्यांनी पेरणी केली.थोरल्या पुकातील पहिल्या चरणात पावसाने पुन्हा पाठ फिरवल्याने शेतकऱ्यांच्या चिंतेत भर पडली आहे. पेरणी केलेल्या कांही भागातील कांही पिके उगवली आहेत.तर कांहीं पिके पावसाची वाट पाहत मातीतच लपली आहेत.अशा पिकांना जमिनी बाहेर येण्यासाठी आणखी पावसाची गरज आहे.

औसा तालुक्यातील पेरणी योग्य दोन लाख ४२ हजार ११५ एकरापैकी साठ हजार ५२९ एकरांवर ज्वारी,तूर,मुग, उडीद, सोयाबीन पिकांची पेरणी केली असून एकुण क्षेत्राच्या तुलनेत २५.७३टक्के आहे.तर पेरणीयोग्य ९० मिली मीटरच्या तुलनेत या वर्षीच्या हंगामातील तीन नक्षत्रात ५५ मिलीमीटर पावसाची नोंद झाली असून प्रत्येक मंडळात कमी अधिक आहे. तालुक्यातील बेलकुंड, किल्लारी,भादा मंडळात कांहीं प्रमाणात पेरण्या झाल्या असून अर्ध्या हून अधिक भागात पावसाची आजही प्रतीक्षाच आहे.तर पेरणी केलेल्या शेतकऱ्यांनाही आज पावसाची प्रतीक्षाच आहे.मात्र पावसाअभावी या वर्षीचा खरिप हंगाम धोक्यात असल्याची चर्चा तसा तालुक्यात होत आहे.

## चाकूरचे नगराध्यक्ष करीम गुळवे यांचा राजीनामा नवीन नगराध्यक्ष कोण राजकीय वर्तुळात चर्चा



तभा.वृत्तसेवा

चाकूर दि. ८ जुलै : चाकूर नगरपंचायतीचे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नगराध्यक्ष करीम गुळवे यांनी आपल्या पदाचा राजीनामा मंगळवार दि.०७ रोजी जिल्हाधिकारी यांच्याकडे सादर केला आहे.करीम गुळवे यांनी अचानक राजीनामा दिल्यामुळे चाकूर तालुक्यासह राजकीय वर्तुळात वेगवेगळ्या चर्चांना उधाण आले असून नगरपंचायतीचा होणारा नगराध्यक्ष कोण याची उत्सुकता निर्माण झाली आहे. प्रहार जनशक्ती पक्षाचे तत्कालीन नगराध्यक्ष कपील माकणे यांच्यावर एक वर्षापुर्वी अविश्र्वास ठराव दाखल करून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने नगरपंचायतीवर सत्ता स्थापन केली होती. सहकारमंत्री बाबासाहेब पाटील यांच्या नेतृत्वाखाली नगराध्यक्ष करीम गुळवे यांनी एक वर्षाचा कार्यकाळ पुर्ण केला मात्र अचानक नगराध्यक्ष पदाचा राजीनामा दिल्याने चर्चेला उधाण आले आहे.त्यांनी आपला राजीनामा जिल्हाधिकाऱ्यांकडे सादर केला आहे.

जिल्हाधिकारी कार्यालयाकडून राजीनाम्यावर नियमानुसार निर्णय घेतल्यानंतर पुढील प्रशासकीय प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. दरम्यान, गुळवे यांच्या राजीनाम्यामुळे नगरपंचायतीतील राजकीय घडामोडींना वेग आला असून नगरसेवकांमध्ये हालचाली सुरू झाल्या आहेत.

माझी तब्बीयत ठिक नसल्यामुळे वैयक्तीक कारणावरून मी राजीनामा दिला आहे, एक वर्षाचा कालावधी पुर्ण झाल्यानंतर राजीनामा देण्याचे पुर्वीच ठरले होते, दुसऱ्यांना संधी देण्याच्या कारणावरून मी आज राजीनामा जिल्हाधिकाऱ्यांकडे दिला असल्याचे करीम गुळवे यांनी सांगितले.

## भरदिवसा वाहन अडवून मारहाण; चौघांवर गुन्हा दाखल

तभा वृत्तसेवा

वलांडी दि. ८ जुलै : प्रतिनिधी देवणी तालुक्यातील जवळगा परिसरात भरदिवसा वाहन अडवून एका तरुणास शिवीगाळ, मारहाण करुन जिवे मारण्याची धमकी दिल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी देवणी पोलिस ठाण्यात चौघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. एजाज अब्दुलअजीज मुल्ला (वय ३६, रा. साकोळ, ता. शिरूर अनंतपाळ, जि. लातूर) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, दि. ६ जुलै २०२६ रोजी सायंकाळी सुमारे ५.१५ वाजता ते आपल्या बोलेरो पिकअप (एमएच १३ सीयू-९४९१) वाहनाने साकोळकडे जात असताना जवळगा येथील पुलाजवळ काही जणांनी त्यांचे वाहन अडवले आणि आरोपींनी वाहनाची चावी काढून घेत शिवीगाळ केली. तू जनावरांची वाहतूक करतोस म्हणत लाथाबुक्क्यांनी मारहाण केली तसेच पुन्हा या रस्त्याने आल्यास जिवे मारण्याची धमकी दिली. या घटनेत अन्य काही व्यक्तींचाही सहभाग असल्याचा आरोप फिर्यादीने केला आहे. या प्रकरणी देवणी पोलिस ठाण्यात अनिकेत ऊर्फ बाळू राजकुमार पाटील, शुभम सुरेश बिरादार व अन्य दोन अज्ञातांविरुद्ध संबंधित भांदवि २०२३ कलमान्वये ११५(२),१२६ (२),३५१,३५२ गुन्हा दाखल करण्यात आला असून, अधिक तपास पोलिस हवालदार नामदेव धुळशेट्टे करीत आहेत.

### 'पोलीस आपल्या सोसायटीमध्ये'

तभा वृत्तसेवा

लातूर दि .८ जुलै : गुन्हा घडल्यानंतर कारवाई करण्यापेक्षा गुन्हे घडूच नयेत, यासाठी प्रतिबंधात्मक पोलीसिंगवर भर देत लातूर जिल्हा पोलिसांनी 'पोलीस आपल्या सोसायटीमध्ये' हा अभिनव उपक्रम सुरू केला आहे. पोलिस अधीक्षक अमोल तांबे यांच्या संकल्पनेतून १५ जूनपासून सुरू झालेल्या या उपक्रमांतर्गत आतापर्यंत शहरातील १०० हून अधिक गृहनिर्माण सोसायट्या आणि निवासी भागांना प्रत्यक्ष भेटी देण्यात आल्या असून, नागरिकांकडून याला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

## हरितक्रांतीमुळे देश अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण आता विषमुक्त अन्ननिर्मितीला प्राधान्य द्या : डॉ. अनिल भिकाणे

तभा वृत्तसेवा

उदगीर दि. ८ जुलै : हरितक्रांतीमुळे भारत अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण झाला असून आता सुरक्षित व विषमुक्त अन्ननिर्मितीला सर्वोच्च प्राधान्य देण्याची गरज असल्याचे प्रतिपादन प्रसिद्ध पशुवैद्यकीय तज्ज्ञ, शास्त्रज्ञ तथा महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूरचे माजी विस्तार शिक्षण संचालक डॉ. अनिल भिकाणे यांनी केले. ते श्री छत्रपती शाहू महाराज सैनिकी विद्यालयात महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री तथा हरितक्रांतीचे शिल्पकार वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त आयोजित कृषी दिन कार्यक्रमात प्रमुख व्याख्याते म्हणून बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य वसंत कुलकर्णी होते. व्यासपीठावर विभागप्रमुख संतोष चामले, विलास शिंदे, प्रा. प्रदीप कोठारे तसेच एनसीसी प्रमुख डॉ. बालाजी मुस्कावाड उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात रोजगार हमी योजना व पंचायत राज व्यवस्थेचे जनक, माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली.

मार्गदर्शन करताना डॉ. भिकाणे म्हणाले की, सुधारित बियाण्यांचा वापर, रासायनिक खतांचा समतोल वापर, जलसंधारणाच्या सुविधांची निर्मिती तसेच विज्ञान व आधुनिक तंत्रज्ञानाचा स्वीकार यामुळे देशात हरितक्रांती घडून आली. परिणामी कृषी उत्पादनात मोठी वाढ होऊन भारत अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण बनला आणि देशाला अन्नसुरक्षा प्राप्त झाली.

ते पुढे म्हणाले की, वाढत्या रासायनिक खतांच्या वापरामुळे जमिनीचा पोत व सुपीकता टिकवून ठेवण्यासाठी शेणखतासह सेंद्रिय खतांचा वापर वाढविणे आवश्यक आहे. त्यासाठी शेतीबरोबर पशुसंगोपन हा अविभाज्य घटक असून शेती व पशुपालन यांचा समन्वय साधणे ही काळाची गरज आहे. भविष्यात सुरक्षित व विषमुक्त अन्ननिर्मितीसाठी सेंद्रिय शेतीला अधिक प्राधान्य द्यावे लागेल, असेही त्यांनी सांगितले.

कमी मनुष्यबळ, कमी श्रम आणि कमी खर्चात अधिक उत्पादन मिळविण्यासाठी शेती व पशुसंगोपन क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञान, यांत्रिकीकरण, अचूक कृषी पद्धती तसेच डिजिटल तंत्रज्ञानाचा व्यापक वापर करणे आवश्यक असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

कृषी दिनानिमित्त विद्यालय परिसरात मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. या उपक्रमाची तयारी मैनोद्दीन सय्यद यांनी केली.

अध्यक्षीय समारोपात प्राचार्य वसंत कुलकर्णी यांनी वसंतराव नाईक यांच्या कृषी विकासातील दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वाचा गौरव करताना शेतीबरोबरच दुग्ध व्यवसायाला चालना देऊन ग्रामीण अर्थव्यवस्था सक्षम करण्यासाठी त्यांनी मोलाचे योगदान दिल्याचे सांगितले.

प्रमुख पाहुण्यांचा परिचय व सूत्रसंचालन डॉ. मुस्कावाड यांनी केले, तर आभार प्रल्हाद येवरीकर यांनी मानले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सुधीर गायकवाड, डिगोळे,चामले, सुनील महिंद्रकर,धनराज काटू, संजय निरणे, मारोती मारकवाड, बालाजी कांबळे, करेवाड आणि नागेश पंगू यांनी सहकार्य केले. कार्यक्रमास विद्यालयातील शिक्षक, कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## ग्रामपंचायत अधिकारी अभावी ग्रा.पं.ची जन्म, मत्यू प्रमाणपत्रासह इतर कामे खोळंबली !

तभा वृत्तसेवा

जळकोट दि. ८ जुलै : तालुक्यात सर्वात मोठी ग्रामपंचायत असलेल्या अतनूर व चिंचोली चा कारभार सध्या रामभरोसे झाला आहे. येथील अतनूर ग्रामपंचायत अधिकारी फिरोज शेख बोरगाव ग्रामपंचायतीच्या आर्थिक गैरव्यवहारात निलंबित झाले आहेत. तात्पुरता कारभार ग्रामपंचायत अधिकारी जिलानी ग्रामसेवकाला दिला आहे. पण त्यांनी आजपावेतो रुजुवात झाले नाहीत. या त्यांना पंचायत समितीचे गटविकास अधिकारी ऐश्र्वर्या चित्तारी यांनी किंवा पंचायत समितीचे विस्तार अधिकाऱ्यांनी गेली अनेक दिवसांपासून निलंबित फिरोज शेख यांचा अतनूर गावाचा चार्ज दिला नाही. असे नूतन ग्रामपंचायत अधिकारी जिलानी नी प्रस्तुत प्रतिनिधीशी भ्रमणध्वनी वरून बोलताना सांगितले. यामुळे हजारो जन्म व मृत्यूचे प्रमाणपत्र ढीगभर पडून आहेत. तसेच अतनूर व चिंचोली गावाचा विकास खुंटला आहे. त्यामुळे लवकरात लवकर कायमस्वरूपी ग्रामपंचायत अधिकारी देण्याची मागणी माजी सरपंच संतोष बट्टेवाड, माजी सैनिक इस्माईल मुंजेवार सह ग्रामस्थांनी केली आहे.

याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद लातूर व जळकोट पंचायत समितीचे गटविकास अधिकारी ऐश्र्वर्या चित्तारी कमालीचे उदासीन असल्याचे दिसते. जळकोट तालुक्यात सर्वात मोठी ग्रामपंचायत म्हणून अतनूर या ग्रामपंचायतची ओळख आहे. तसेच अतनूर व चिंचोली या गावात ग्रामपंचायत अधिकारी अभावी कर वसुली करणे, वसुलीतून गावविकासाची कामे करणे, पाणीपुरवठा व्यवस्थापन, साफ सफाई व्यवस्थापन, शिक्षण व आरोग्य व्यवस्थापन, दिवाबत्ती, इत्यादी कामे करणे, जन्म-मृत्यू नोंदणी करणे, विवाह नोंदणी करणे, यासह ग्रामपंचायत अधिकारी ग्राम पंचायतीत व ग्रामसभेत सचिवांची भुमिका बजावतात, लोकांच्या समस्या शासनापर्यंत पोहचवणे, ग्रामपंचायतीचे दैनंदिन कामे पार पाडतात, ग्रामपंचायतीची महत्त्वाची कागदपत्रे व हिशोब सांभाळणे. अशी जवळपास २९ खात्यांची कामे असतात तसेच विविध योजना राबविणे. उदा. मनरेगा, स्वच्छ भारत मिशन, १५ वा वित्त आयोग, प्रधान मंत्री आवास योजना, स्मार्ट गाव, ग्रामसभा सचिव परंतु पंचायत समितीच्या उदासीन कारभारामुळे गावाला पूर्ण वेळ ग्रामसेवक न भेटणे हे एक दुर्देव असल्याचे ग्रामस्थांमधून तसेच माजी सरपंच संतोष बट्टेवाड, माजी सैनिक इस्माईल मुंजेवार म्हणाले.

तर तंटामुक्त गाव समितीचे अध्यक्ष व उपाध्यक्ष तथा माजी सैनिक अरविंद सासट्टे म्हणाले की, सध्या पावसाचे दिवस सुरू आहेत. अनेक ठिकाणी घाणीचे साम्राज्य निर्माण झाले आहे. गावालगतच रस्त्यावर लोकांनी शेणाचे ढिगारे ठेवले असल्याने आरोग्यास धोका निर्माण झाला आहे. पिण्याच्या पाण्यात वेळेवर ब्लिचिंग पावडर टाकल्या जाते की नाही याकडे सुद्धा लक्ष देण्याची गरज आहे. सध्या अतनूर व चिंचोली ग्रामपंचायतवर प्रशासक राज आहे.

गावात नियमित ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामसचिव नसल्याने मोठ्या प्रमाणात समस्या वाढत आहे. या समस्येमुळे नागरिकही त्रस्त आहेत. गावात कोणता शासकीय फंड येतो याची कल्पना सुद्धा गावकऱ्यांना राहत नाही. गावकऱ्यांची खोळंबलेली कामे लक्षात घेत जळकोट च्या गटविकास अधिकाऱ्यांनी गावकऱ्यांची ही मागणी लक्षात घेता कायमस्वरूपी ग्रामपंचायत अधिकारी देण्याची मागणी चिंचोलीचे माजी सरपंच संतोष बट्टेवाड सह गावकऱ्यांनी केली आहे.

## सांडोळ - महांडोळ जवळ स्कूल बस पलटी, २५ विद्यार्थी जखमी, बसचालक पोलिसांच्या ताब्यात



तभा वृत्तसेवा

चाकूर दि. ८ जुलै : चाकूर तालुक्यातील राचन्नावाडी येथील पुण्यश्र्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यालयाची स्कूल बस सांडोळ-महांडोळ चौकात पलटी झाली. ही धक्कादायक घटना बुधवारी सकाळी ९ वाजता घडली असून या बसमध्ये सुमारे ३० विद्यार्थी प्रवास करीत होते, त्यामधील २५ विद्यार्थी जखमी झाले आहेत. सुदैवाने मोठी जीवितहानी टळली असून सर्व विद्यार्थी थोडक्यात बचावले आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार,पुण्यश्र्लोक अहिल्यादेवी होळकर शाळेचा नियमित चालक आळंदी वारीसाठी गेल्याने त्याच्या जागी दुसऱ्या चालकाला त्याने बदलीवर पाठविले होते. त्याची माहिती शाळा प्रशासनाला दिली नव्हती असे शाळेतील शिक्षकांनी सांगितले. बुधवारी सकाळी स्कुल बस क्रमांक एम. एच.१२ पी.क्यू. ५१२० विद्यार्थ्यांना आणण्यासाठी गेली असताना तो चालक बस चालवत असताना मोबाईलवर बोलत असल्याने त्याचे वाहनावरील नियंत्रण सुटले आणि बस रस्त्याच्या कडेला असलेल्या खड्ड्यात पलटी झाली.तो चालक नसेत असल्याचा अरोप गावकरी व पालकांनी केला आहे.या अपघातात १९ विद्यार्थ्यांना दुखापत झाली असून इतर विद्यार्थ्यांना किरकोळ मार लागला आहे.हे विद्यार्थी मोठ्या धक्क्यातून बचावले.या घटनेची माहिती मिळताच पोलिस निरीक्षक बालाजी भंडे व इतर पोलिस कर्मचारी यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी करून चालकाला ताब्यात घेतले आहे.त्या विद्यार्थ्यांना तात्काळ ॲम्ब्युलन्सने चाकूर येथील ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दखल करण्यात आले आहे.

## लाल बहादुर शास्त्री प्राथमिक शाळेत कॅप्टन कृष्णकांत कुलकर्णी शहीद दिन श्रद्धापूर्वक साजरा



तभा वृत्तसेवा

उदगीर दि. ८ जुलै : येथील भारतीय शिक्षण प्रसारक संस्था, अंबाजोगाई द्वारा संचलित लाल बहादुर शास्त्री प्राथमिक शाळेत शूरवीर कॅप्टन कृष्णकांत कुलकर्णी यांच्या शहीद दिनानिमित्त भावपूर्ण अभिवादन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक अंकुश मिरगुडे होते. विभाग प्रमुख सुधाकर पोलावार व श्रीमती सुरेखाबाई कुलकर्णी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी कॅप्टन कृष्णकांत कुलकर्णी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून उपस्थितांनी दोन मिनिटे मौन पाळत त्यांना श्रद्धांजली वाहिली. प्रमुख पाहुण्यांनी आपल्या मनोगतात कॅप्टन कुलकर्णी यांच्या अद्वितीय शौर्य, राष्ट्रनिष्ठा आणि सर्वोच्च बलिदानाचा गौरवपूर्ण आढावा घेतला. विद्यार्थ्यांनी त्यांच्या जीवनातून देशप्रेम, शिस्त, कर्तव्यपरायणता आणि राष्ट्रसेवेची प्रेरणा घ्यावी,असे आवाहन त्यांनी केले.

अध्यक्षीय समारोपात मुख्याध्यापक अंकुश मिरगुडे यांनी शहीदांचे बलिदान हे प्रत्येक भारतीयासाठी प्रेरणादायी असून त्यांच्या त्यागाचे स्मरण ठेवणे हीच त्यांना खरी आदरांजली असल्याचे सांगितले.

कार्यक्रमास शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांची उत्स्फूर्त उपस्थिती लाभली. कार्यक्रमाचे

### जळकोट मार्गे उदगीरसाठी बस सुरू करण्याची मागणी

तभा वृत्तसेवा

जळकोट दि.८ जुलै : नांदेड आगारातून रातून जळकोट मार्गे उदगीरसाठी बस सुरु करण्यात यावी अशी मागणी प्रवाशांतून केली जात आहे. नांदेड आगारप्रमुखांनी जळकोट मार्गे उदगीरसाठी बस सोडण्यात यावी अशी मागणी अनेक वेळा केली तरीही या मागणीकडे दुर्लक्ष करण्यात आले.

ही बस सुरू झाल्यानंतर नांदेड जिल्ह्यातील भाग असलेल्या जांब बुद्रुक परिसरासही याचा लाभहोणार आहे. सध्या उदगीर आगाराच्या तीन बस उदगीर, नांदेड, जळकोट मार्गे धावत आहेत. याच बसवर सर्व प्रवाशांची मदार आहे जर नांदेड आगार प्रमुखांनी जळकोट मार्गे बिदर तसेच गुलबर्गा या दोन बसेस सुरू केल्या तर बसच्या संख्येत वाढ होणार नाही व याचा फायदा प्रवाशांना होणार आहे.

## महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयाचे एमएचटी-सीईटी परीक्षेत घवघवीत यश







तभा वृत्तसेवा

उदगीर दि. ८ जुलै : राज्य सामायिक प्रवेश परीक्षा (एमएचटी-सीईटी) २०२६ मध्ये महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन केले आहे. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट गुणवत्तेची कामगिरी करत महाविद्यालयाच्या शैक्षणिक परंपरेत आणखी भर घातली आहे. या परीक्षेत वायचळे संस्कृती हिने ९८.४५ पर्सेंटाइल मिळवून महाविद्यालयात प्रथम क्रमांक पटकावला. शिवपूजा कोरे हिने ९८.२९ पर्सेंटाइल मिळवून द्वितीय क्रमांक मिळविला, तर वट्टमवार प्रांजली हिने ९७.३७ पर्सेंटाइल मिळवून तृतीय क्रमांक प्राप्त केला. महाविद्यालयातील १५ विद्यार्थ्यांनी ९० पर्सेंटाइलपेक्षा अधिक गुण मिळविले असून १८ विद्यार्थ्यांनी ८० पर्सेंटाइलपेक्षा अधिक गुण संपादन केले आहेत. या यशामुळे महाविद्यालयाच्या शैक्षणिक गुणवत्तेची पुन्हा एकदा प्रचिती आली आहे. या यशाबद्दल महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष बसवराज पाटील नागराळकर, उपाध्यक्ष ॲड. प्रकाश तोंडारे, उपाध्यक्ष बसवराज पाटील मलकापूरकर, सचिव डॉ. रामप्रसाद लखोटिया, सहसचिव मल्लिकार्जुन चिल्लरगे, सहसचिव प्रशांत पेन्सलवार, कोषाध्यक्ष महादेव नौबदे तसेच सर्व संस्था सदस्य, प्राचार्य डॉ. आर. के. मस्के, उपप्राचार्य डॉ. एस. एन. हल्लाळे, समन्वयक प्रा. एस. जी. कोडचे, पर्यवेक्षक प्रा. एस. व्ही. मुडपे आणि प्रा. टी. एन. सगर यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

सोलापूर तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

# निवृत्तीवेतनधारकांसाठी ‘महा-उपलब्धी’ ॲप कार्यान्वित

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ८ जुलै -**

महाराष्ट्र शासनाच्या सेवेतून निवृत्त झालेल्या निवृत्तीवेतनधारक तसेच कुटुंब निवृत्तीवेतनधारकांना निवृत्तीवेतनासंबंधित विविध माहिती व सेवा एकाच डिजिटल व्यासपीठावर उपलब्ध करून देण्यासाठी ‘महा-उपलब्धी (MH UPLBDHI)’ हे मोबाईल ॲप उपलब्ध करून देण्यात आले असून, १ जुलै २०२६ पासून ते कार्यान्वित करण्यात आले आहे. या ॲपचा सर्व निवृत्तीवेतनधारकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा कोषागार अधिकारी शोभा मुंढे यांनी केले आहे.

महाराष्ट्र शासनाच्या वित्त विभागाच्या १६ जून २०१६ रोजीच्या शासन निर्णयानुसार विकसित करण्यात आलेल्या या ॲपच्या माध्यमातून निवृत्तीवेतनधारक व कुटुंब निवृत्तीवेतनधारकांना निवृत्तीवेतनाशी संबंधित विविध डिजिटल सेवा सुलभ, जलद आणि पारदर्शक पद्धतीने उपलब्ध करून देण्यात येत आहेत. या ॲपमध्ये मासिक निवृत्तीवेतनाचा तपशील, महागाई भत्त्याचा फरक, आयकर कपात दाखला (फॉर्म क्र. १६), उत्पन्नाचा दाखला (Income Certificate), तसेच निवृत्तीवेतन विषयक शासन निर्णय यांसारख्या महत्त्वाच्या सेवा उपलब्ध आहेत. त्यामुळे संबंधितांना कोषागार कार्यालयात वारंवार प्रत्यक्ष भेट देण्याची आवश्यकता मोठ्या प्रमाणात कमी होणार आहे.

प्रथम टप्प्यातील सुविधांमध्ये Pension Payment History हा महत्त्वाचा पर्याय उपलब्ध करून देण्यात आला आहे. या सुविधेद्वारे वित्तीय वर्ष २०२४-२५ पासून अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई अथवा कोषागार कार्यालयामार्फत अदा करण्यात आलेल्या मासिक व वार्षिक निवृत्तीवेतनाचा सविस्तर तपशील पाहता येणार असून तो PDF स्वरूपात डाउनलोड व जतन करण्याची सुविधाही उपलब्ध आहे.

या ॲपचे प्रमुख उद्दिष्ट म्हणजे निवृत्तीवेतनधारकांना Single Digital Platform वर सर्व सेवा उपलब्ध करून देणे, कोषागार व अधिदान कार्यालयातील प्रत्यक्ष भेटी कमी करणे, सुरक्षित व वापरण्यास सुलभ डिजिटल सेवा प्रदान करणे आणि निवृत्तीवेतनासंदर्भातील महत्त्वाच्या सूचना वेळेवर उपलब्ध करून देणे हे आहे.

‘महा-उपलब्धी’ ॲपचा User Manual आणि FQ हे निवृत्तीवेतन वाहिनी प्रणालीवर तसेच ॲपच्या लॉगिन पृष्ठावर उपलब्ध करून देण्यात आले आहेत. पच्या वापराबाबतची सविस्तर माहिती तेथे पाहता येणार आहे.

सर्व निवृत्तीवेतनधारक व कुटुंब निवृत्तीवेतनधारकांनी या डिजिटल सुविधेचा लाभ घेऊन ‘महा-उपलब्धी’ ॲपचा नियमित वापर करावा, असे आवाहन जिल्हा कोषागार अधिकारी श्रीमती शोभा मुंढे तसेच अप्पर कोषागार अधिकारी (निवृत्तीवेतन) नामदेव राठोड यांनी केले आहे.

## स्वारातीम विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे ‘वन महोत्सव’ व ‘एक पेड माँ के नाम’ उपक्रम

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ८ जुलै -**

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे शासनाच्या निर्देशानुसार १ ते ७ जुलै ‘वन महोत्सव सप्ताह’ तसेच ‘एक पेड माँ के नाम’ या उपक्रमांतर्गत विद्यापीठ परिसरात उत्साहपूर्ण वातावरणात वृक्षारोपण कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

या कार्यक्रमाचा शुभारंभ विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांच्या शुभहस्ते करण्यात आला. यावेळी वड, पिंपळ, चिंच, कडूनिंब आणि करंजी यांसारख्या पर्यावरणपूरक व दीर्घायुषी वृक्षांच्या १०० रोपांचे लागवड करण्यात आली.

कार्यक्रमाच्या माध्यमातून राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांनी झाडे लावा, झाडे जगवा हा पर्यावरण संवर्धनाचा महत्त्वपूर्ण संदेश दिला. वृक्ष हे केवळ पर्यावरणाचे संतुलन राखणारे घटक नसून, ती राष्ट्रीय संपत्ती असून त्यांचे जतन व संवर्धन करणे ही प्रत्येक नागरिकाची सामूहिक जबाबदारी आहे, असा संदेश यावेळी देण्यात आला.



या वृक्षारोपण कार्यक्रमास प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. एम. के. पाटील, वित्त व लेखाधिकारी डॉ. राजेश शिंदे, नवोपक्रम व नवसंशोधन साहचर्य मंडळाचे संचालक डॉ. शैलेश वाढेर, ज्ञान स्रोत केंद्राचे संचालक डॉ. जगदीश कुलकर्णी, विद्यार्थी कल्याण संचालक डॉ. राजपालसिंह चिखलीकर, आयक्यूएसी समन्वयक डॉ. सुरेंद्रनाथ रेड्डी, डॉ. नंदकुमार बोधगिरे, डॉ. लीना गोगटे, डॉ. योगिनी सातारकर, डॉ. उषा सांगळे, सहाय्यक कुलसचिव रामदास पेद्देवाड यांच्यासह राष्ट्रीय सेवा योजना विभाग आणि उद्यान विभागाचे कर्मचारी तसेच राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या उपक्रमामुळे विद्यापीठ परिसर अधिक हिरवागार होण्यास हातभार लागणार असून पर्यावरण संवर्धनासाठी समाजात जनजागृती निर्माण करण्याच्या दृष्टीने हा उपक्रम प्रेरणादायी ठरला.

## शिष्यवृत्ती परिक्षेत मॉडर्नचे घवघवीत यश

**उमरी -** महाराष्ट्र राज्य परिक्षा परिषद पुणे यांचे तर्फे सन २०२६ - २७ मध्ये घेण्यात आलेल्या शिष्यवृत्ती स्पर्धा परिक्षेत मॉडर्न इंग्लिश स्कूल व कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन करून शाळेच्या नावलौकिकात भर टाकली आहे. सदरील स्पर्धा परिक्षेमध्ये इयत्ता ५ वीतून ९ विद्यार्थी पात्र झाले असून इयत्ता ८ वीतील बारा विद्यार्थी पात्र झाले आहेत. इयत्ता पाचवी तील मुक्कावार अमेय संतोष हा विद्यार्थी शिष्यवृत्ती पात्र ठरला आहे. इयत्ता पहिली पासून हा विद्यार्थी मॉडर्न इंग्लिश स्कूलमध्ये शिक्षण घेतो आहे.इयत्ता आठवी वीतील विद्यार्थी राजविर लक्ष्मण पुरोहित हा देखिल शिष्यवृत्ती पात्र ठरला असून तो इयत्ता पाच वी पासून ह्या शाळेत शिक्षण घेत आहे. मॉडर्नच्या विद्यार्थ्यांनी यशाची परंपरा कायम ठेवली त्याबध्दल संस्थेच्या वतिने अमेय संतोष मुक्कावार आणि राजविर लक्ष्मण पुरोहित यांचा संपुर्ण विद्यार्थ्यांचे समक्ष उमरीचे माजी नगराध्यक्ष संजय कुलकर्णी आणि शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. अनुराधा कुलकर्णी यांचे हस्ते सत्कार करण्यात आला. सदरील विद्यार्थ्यांनी ह्यासाठी घेतलेले परिश्रम, त्यांचे आई, वडिलांनी ह्यासाठी केलेले सहकार्यआणि मॉडर्न इंग्लिश स्कूलच्या सर्व शिक्षकांनी वेळोवेळी ह्या संपूर्ण विद्यार्थ्यांना केलेले मार्गदर्शन ह्याचाच परिपाक म्हणजे हे यश असल्याची भावना शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. अनुराधा कुलकर्णी यांनी संबधित विद्यार्थ्यांचे सत्कार प्रसंगी व्यक्त केले यावेळी शाळेतील संपूर्ण शिक्षक स्टाफ आणि विद्यार्थी उपस्थित होते.

## अर्धापूरात भटक्या कुत्र्यांचा विद्यार्थ्यांना चावा

**तभा वृतसेवा**
**अर्धापूर, दि. ८ जुलै -**

अर्धापूर नगरपंचायत प्रशासनाचा गलथान आणि हलगर्जी कारभार पुन्हा एकदा चव्हाट्यावर आला आहे. शहरातील भटक्या कुत्र्यांचा बंदोबस्त करण्यात नगरपंचायत अपयशी ठरल्यामुळे, आज डॉक्टर इक्बाल उर्दू हायस्कूलच्या दोन निष्पाप विद्यार्थ्यांना भटक्या कुत्र्यांनी निर्घृणपणे चावा घेतल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या घटनेमुळे परिसरात तीव्र संताप व्यक्त होत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, डॉक्टर इक्बाल उर्दू हायस्कूलचे दोन विद्यार्थी नेहमीप्रमाणे शाळेत जात असताना, रस्त्यावरील हिंस्त्र भटक्या कुत्र्यांच्या टोळीने त्यांच्यावर अचानक हल्ला चढवला. कुत्र्यांनी या दोन्ही विद्यार्थ्यांना गंभीररीत्या चावून जखमी केले. घटनेनंतर परिसरात एकच खळबळ उडाली असून जखमी विद्यार्थ्यांना तातडीने उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

नागरिकांचा आणि पालकांचा संताप

शहरात भटक्या कुत्र्यांचा सुळसुळाट वाढला असून, लहान मुले, महिला आणि शाळकरी विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. नगरपंचायतीला वारंवार सूचना देऊनही भटक्या कुत्र्यांचा बंदोबस्त का केला जात नाही? प्रशासनाला एखाद्या निष्पाप विद्यार्थ्याचा जीव जाण्याची प्रतीक्षा आहे का? असा संतप्त सवाल पालक आणि स्थानिक नागरिकांमधून विचारला जात आहे.



**कंधार -विमुक्त जाती सेवा समिती वसंत नगर (कोटग्याळ) या संस्थेच्या संचालक मंडळाच्या आदेशानुसार प्रा. डॉ देविदास केंद्रे यांची ग्रामीण कला वाणिज्य विज्ञान महाविद्यालय वसंतनगर (कोटग्याळ ) ता मुखेड जि नांदेड येथे प्रभारी प्राचार्य पदी नेमणूक केली आहे. या निवडीबद्दल आमदार डॉ. तुषार राठोड संस्थेचे सचिव गंगाधरराव राठोड, माजी प्राचार्य प्रो. डॉ. हरिदास राठोड उपस्थित होते.**


## रामतीर्थ पोलीस ठाण्यात शिवराज नरवाडे यांना निरोप



**नरसी** -रामतीर्थ पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक शिवराज नरवाडे यांची परभणी जिल्ह्यातील पाथरी पोलीस ठाण्यात बदली झाल्याने सोमवारी (दि. ७) रामतीर्थ पोलीस ठाण्यात त्यांचा निरोप व सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला. यावेळी त्यांच्या तीन वर्षांच्या सेवाकाळातील कार्याचा गौरव करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सहाय्यक पोलीस निरीक्षक विक्रम हराळे होते. त्यांनी नरवाडे यांच्या कार्याचा गौरव करताना सांगितले की, सेवाकाळात त्यांनी कायदा व सुव्यवस्था राखणे, गुन्हे नियंत्रण, नागरिकांशी सुसंवाद प्रस्थापित करणे तसेच पोलीस दलातील शिस्त व कार्यक्षमतेला प्राधान्य देत उल्लेखनीय कामगिरी केली. त्यांच्या नेतृत्वाखाली अनेक महत्त्वपूर्ण जबाबदाऱ्या यशस्वीरीत्या पार पडल्या असून, त्यांच्या कार्याची नोंद रामतीर्थ पोलीस ठाण्याच्या सेवाऐतिहासात कायम राहील, असे त्यांनी नमूद केले. सत्काराला उत्तर देताना शिवराज नरवाडे यांनी सहकारी अधिकारी, कर्मचारी आणि परिसरातील नागरिकांनी दिलेल्या सहकार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. रामतीर्थ येथे मिळालेला अनुभव आणि लोकांचा विश्वास हीच पुढील सेवेसाठी प्रेरणा असल्याचे सांगत, पाथरी येथेही तितक्याच प्रामाणिकपणे व निष्ठेने कर्तव्य बजावण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला.या कार्यक्रमास रामतीर्थ पोलीस ठाण्यातील अधिकारी, कर्मचारी तसेच जेष्ठ पत्रकार गोविंद नरसीकर व गंगाधर गंगासागरे उपस्थित होते. उपस्थितांनी नरवाडे यांना पुढील सेवाप्रवासासाठी शुभेच्छा देत त्यांच्या उज्ज्वल कारकिर्दीसाठी सदिच्छा व्यक्त केल्या.

## शाहूनगर-बाबानगर परिसरात रात्री चोरट्यांचा वावर वाढला; नागरिक सतर्क

**नांदेड** -शहरातील शाहूनगर व बाबानगर परिसरात रात्रीच्या वेळी संशयित चोरट्यांचा वावर वाढल्याची चर्चा नागरिकांमध्ये सुरू आहे. त्यामुळे परिसरातील रहिवाशांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून



नागरिकांनी अधिक सतर्क राहण्यास सुरुवात केली आहे. स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, रात्री उशिरा काही संशयास्पद व्यक्ती गल्लीबोळांत फिरताना दिसत आहेत. त्यामुळे घरांच्या सुरक्षेसाठी आवश्यक खबरदारी घ्यावी आणि कोणतीही संशयास्पद हालचाल आढळल्यास तात्काळ पोलिसांना माहिती द्यावी, असे आवाहन करण्यात येत आहे. दरम्यान, परिसरात रात्रीच्या गस्तीमध्ये वाढ करून नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी प्रभावी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी स्थानिक नागरिकांनी पोलीस प्रशासनाकडे केली आहे.

## कर्जमाफीच्या पात्र शेतकऱ्यांच्या याद्या तात्काळ पोर्टलवर अपलोड कराव्यात

**नांदेड** -राज्यातील कर्जमाफीच्या प्रतिक्षेत असलेल्या पात्र शेतकर्यांच्या याद्या तात्काळ शासकीय पोर्टलवर अपलोड कराव्यात, अशी मागणी राज्याचे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांच्याकडे भारतीय जनता पार्टीचे हदगाव तालुकाध्यक्ष भागवत देवसरकर केली आहे. भागवत देवसरकर यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, अनेक शेतकरी कर्जमाफीच्या नावाखाली बँक व सहकारी संस्थांच्या चकरा मारत आहेत. परंतु पात्र लाभार्थ्यांची अधिकृत यादीच उपलब्ध नसल्याने गोंधळाचे वातावरण आहे. यामुळे शेतकर्यांमध्ये संभ्रम आणि नैराश्य आहे, तालुकानिहाय पात्र शेतकर्यांची यादी पारदर्शकपणे पोर्टलवर प्रसिद्ध करावी, जेणेकरून कोणताही पात्र शेतकरी लाभापासून वंचित राहणार नाही. तसेच अपात्र लोकांची नावे बाद करून खर्या गरजू शेतकर्यांनाच न्याय मिळावा. कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी लवकरात लवकर कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले असल्याची माहिती भागवत देवसरकर यांनी दिली आहे.

## विशेष सखोल पुनरिक्षण मोहिमेस ग्रामस्थांनी सहकार्य करावे: महेश पाटील

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ८ जुलै -**

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक महेश पाटील यांनी मंगळवार दिनांक ७ जुलै रोजी लोहा तालुक्यातील धानोरा व पिंपळगाव ढगे या गावांना भेट देऊन विशेष सखोल पुनरिक्षण (ड्खठ) मोहिमेंतर्गत सुरू असलेल्या गणना पत्रके भरण्याच्या कामाची पाहणी केली. यावेळी त्यांनी बूथस्तरीय अधिकाऱ्यांकडून सुरू असलेल्या गृहभेटींचा आढावा घेत संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना दिल्या.

ग्रामस्थांशी संवाद साधताना मुख्य कार्यकारी अधिकारी महेश पाटील म्हणाले की, मतदार यादी अचूक, अद्ययावत आणि सर्वसमावेशक करण्यासाठी विशेष सखोल पुनरिक्षण प्रक्रिया अत्यंत महत्त्वाची आहे. त्यामुळे गणना पत्रके भरण्यासाठी गृहभेटी देणाऱ्या बूथस्तरीय अधिकाऱ्यांना नागरिकांनी संपूर्ण सहकार्य करून आवश्यक ती अचूक माहिती उपलब्ध करून द्यावी. प्रत्येक पात्र नागरिकाने जबाबदारीची जाणीव ठेवून या मोहिमेत सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन त्यांनी केले.

गावातील युवकांनीही या मोहिमेत पुढाकार घेऊन बूथस्तरीय अधिकाऱ्यांना सहकार्य करावे. विशेषतः एकाच समाजाची किंवा समान आडनावांची कुटुंबे मोठ्या प्रमाणात असलेल्या गावांमध्ये २० ते २५ युवकांचे स्वयंसेवक गट तयार करून त्यांना आवश्यक प्रशिक्षण द्यावे. या गटामार्फत गृहभेटी घेऊन नागरिकांना मोहिमेची माहिती देणे, भरलेली गणना पत्रके विहित मुदतीत संकलित करणे तसेच त्यांची ऑनलाइन नोंदणी वेळेत पूर्ण करणे अत्यंत महत्त्वाचे असल्याचे त्यांनी सांगितले.

दौऱ्यादरम्यान मुख्य कार्यकारी अधिकारी महेश पाटील यांनी प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) अंतर्गत सुरू असलेल्या घरकुल बांधकामांचीही पाहणी केली. लाभार्थ्यांशी संवाद साधून कामाच्या प्रगतीची माहिती घेत संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना दिल्या. यावेळी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप माळोदे, गट विकास अधिकारी कुलकर्णी, नायब तहसीलदार संदीप हडगे तसेच संबंधित विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## किनवट-माहूर आगारांना 'जिजाऊ' बसेसचा दिलासा मिळणार?

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि. ८ जुलै -**

दुर्गम व आदिवासी भागातील बससेवा सक्षम करण्यासाठी किनवट विधानसभा मतदारसंघाचे आमदार भीमराव रामजी केराम यांनी राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्याकडे किनवट व माहूर बस आगारांना प्रत्येकी १० 'जिजाऊ' बसेस उपलब्ध करून देण्याची मागणी केली आहे. या मागणीमुळे दोन्ही तालुक्यांतील हजारो प्रवाशांना नियमित, सुरक्षित व आरामदायी प्रवासाची सुविधा उपलब्ध होण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

नांदेड जिल्ह्यातील किनवट व माहूर हे दोन्ही तालुके भौगोलिकदृष्ट्या दुर्गम व आदिवासीबहुल आहेत. माहूर येथील श्री रेणुकामाता शक्तीपीठामुळे राज्यभरातून दररोज मोठ्या संख्येने भाविक येत असतात. तसेच ग्रामीण भागातील विद्यार्थी, शेतकरी, महिला, नोकरदार, व्यापारी व कामगार यांचा दैनंदिन प्रवास मुख्यत्वे एसटी बससेवेवरच अवलंबून आहे.




मात्र, बसांची संख्या अपुरी असल्याने अनेक मार्गांवर बसफेऱ्या कमी आहेत. त्यामुळे प्रवाशांना तासन्तास बसची प्रतीक्षा करावी लागते. अनेक दुर्गम गावांमध्ये नियमित बससेवा नसल्याने नागरिकांना खासगी वाहनांचा आधार घ्यावा लागत असून आर्थिक भुर्दंडही सहन करावा लागत आहे. विशेषतः विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक आणि महिलांची मोठी गैरसोय होत आहे.

या पार्श्वभूमीवर किनवट व माहूर बस आगारांना प्रत्येकी १० 'जिजाऊ' बसेस उपलब्ध करून दिल्यास दुर्गम भागातील वाहतूक व्यवस्था मजबूत होईल. बसफेऱ्यांची संख्या वाढेल, प्रवाशांचा प्रवास अधिक सुरक्षित व वेळेवर होईल. त्याचबरोबर माहूर येथील धार्मिक पर्यटनालाही चालना मिळून स्थानिक अर्थव्यवस्थेला बळ मिळेल, असे आमदार भीमराव केराम यांनी परिवहन मंत्र्यांना दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे.

या मागणीवर राज्य परिवहन विभागाने सकारात्मक निर्णय घेऊन दोन्ही आगारांना तातडीने 'जिजाऊ' बसेस उपलब्ध करून द्याव्यात, अशी अपेक्षा किनवट-माहूर तालुक्यातील नागरिकांनी व्यक्त केली आहे.



**नांदेड - विकसित महाराष्ट्र २०४७ कार्यक्रमाअंतर्गत शेतकऱ्याचे उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विभाग मार्फत बोधडी खुर्द तालुका किनवट येथे मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजना अंतर्गत दूध उत्पादक पशुपालकांच प्रशिक्षण घेण्यात आले सदर कार्यक्रमास ३० पशुपालक उपस्थित होते. जिल्हा उपायुक्त डॉ. खुणे यांनी सर्व पशुपालकाना दूरध्वनीवर मार्गदर्शन केले. नांदेड जिल्ह्यातील उत्पादन वाढविण्यासाठी व पशुपालकांचे उत्पन्न वाढविण्यासाठी पशुसंवर्धन विभाग सदैव तत्पर आहे, पशुपालकास काहीही समस्या असल्यास नजिकच्या पशुवैद्यकीय चिकित्सालयात जाऊन सदर योजनेची माहिती मिळवावी असे आवाहन डॉ. खुणे यांनी केले आहे. यावेळी सहायक आयुक्त डॉ. संजीव पाटील, पशुधन विकास अधिकारी विस्तार डॉ. निरंजन बागल, पशुधन पर्यवेक्षक डॉ. मेनकुदळे व तांबारे उपस्थित होते.**

## संपादक बालासाहेब कडबाने यांच्यावरील गुन्हा मागे घेण्याची पत्रकारांची मागणी

**तभा वृतसेवा**
**भोकर, दि. ८ जुलै -**

दैनिक जगमित्रचे संपादक बालासाहेब कडबाने यांच्याविरुद्ध दाखल करण्यात आलेला गुन्हा तात्काळ मागे घ्यावा अशी मागणी भोकर तालुक्यातील पत्रकारांनी पोलीस महानिरीक्षक, छत्रपती संभाजीनगर यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

निवेदनात पत्रकारांनी म्हटले आहे की, दैनिक जगमित्रने जनहिताचे प्रश्न आणि कथित गैरव्यवहार लोकांसमोर मांडण्याचे काम केले.राज्य वक्फ बोर्डाचे अध्यक्ष समीर काझी यांच्या कथित कारभारासंदर्भात वृत्त प्रसिद्ध झाल्यानंतर, त्याचाच राग मनात धरून त्यांच्या सहाय्यका मार्फत संपादक बालासाहेब कडबाने यांच्या विरुद्ध छत्रपती संभाजीनगर येथील बेगमपुरा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे.पत्रकारांनी या प्रकरणाला लोकशाही मूल्यांवर आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर आघात करणारी घटना संबोधत तीव्र निषेध व्यक्त केला आहे. सत्य आणि जनहितासाठी काम करणाऱ्या पत्रकारांवर दबाव आणण्यासाठी खोटे गुन्हे दाखल केले जात असतील, तर ते पत्रकारितेच्या स्वातंत्र्यासाठी धोक्याचे असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे निवेदनावर एल. ए. हिरे,बी आर पांचाळ, राजेश वाघमारे,जयभीम पाटील,शेख लतीफ, सिध्दार्थ जाधव,शंकर कदम,शेख एजाज, शिवाजी गायकवाड,सुभाष तेले,कैलास कानिंदे,मनोज शिंदे आदिंच्या सह्या आहेत या प्रकरणी निष्पक्ष चौकशी करून संपादक बालासाहेब कडबाने यांच्यावरील गुन्हा तात्काळ मागे घ्यावा,अशी मागणी पत्रकारांनी केली आहे.

# शाळांच्या शुल्क फलकाबाबत अंमलबजावणी अपूर्ण

**तभा वृतसेवा**
**हिमायतनगर, दि. ८ जुलै -**

जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी जिल्ह्यातील सर्व स्वयंअर्थसाहाय्यित इंग्रजी, मराठी व इतर माध्यमांच्या शाळांना शैक्षणिक शुल्काची व सविस्तर माहिती दर्शनी भागात फलकाद्वारे प्रदर्शित करण्याचे स्पष्ट आदेश दिले आहेत. या निर्णयाचा उद्देश पालकांना शुल्काबाबत पारदर्शक माहिती उपलब्ध करून देणे हा आहे.

मात्र, हिमायतनगर तालुक्यातील अनेक शाळांमध्ये या आदेशाची प्रभावी अंमलबजावणी झालेली दिसून येत नसल्याची स्थिती समोर येत आहे. काही शाळांच्या प्रवेशद्वारावर वर्गनिहाय वार्षिक शुल्क, शाळेचे नाव, पत्ता, मान्यता, संलग्न मंडळ तसेच गणवेश, पुस्तके व शालेय साहित्य खरेदीबाबत आवश्यक सूचना असलेले फलक लावलेले नसल्याचे पालकांचे म्हणणे आहे. याशिवाय, शाळांकडून विशिष्ट दुकानातूनच गणवेश, पुस्तके किंवा इतर साहित्य खरेदी करण्याची सक्ती करू नये, असेही आदेशात स्पष्ट करण्यात आले आहे. मात्र, प्रत्यक्षात या सूचनांचे पालन होत नसल्याची चर्चा पालकांमध्ये सुरू आहे.

दरम्यान, या आदेशाच्या अंमलबजावणीबाबत गटशिक्षणाधिकारी कार्यालयालाही स्पष्ट माहिती नसल्याचा दावा काही स्तरांतून करण्यात येत असल्याने शिक्षण क्षत्रावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. विभागाच्या कार्यपद्धतीवर

शुल्कवाढीत पारदर्शकता राहावी, पालकांची फसवणूक टाळावी आणि शाळांच्या मनमानी कारभाराला आळा बसावा, यासाठी शासनाने ही व्यवस्था बंधनकारक केली आहे. मात्र, हिमायतनगर तालुक्यातील परिस्थिती पाहता आदेश केवळ कागदावरच राहिल्याची भावना व्यक्त केली जात आहे. या पार्श्वभूमीवर सर्व शाळांची तातडीने तपासणी करून नियमांचे पालन न करणाऱ्या संस्थांवर कारवाई करावी, अशी मागणी पालक वर्गातून होत आहे

CMYK

# धाराशिव दिनांक


सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## कै. भगवान आबा गिरी महाराज यांना श्रद्धांजली

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.८ जुलै -**

डॉ. आंबेडकर बाल विकास शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष तथा रुईभर मठाचे मठाधिपती परमपूज्य कै. भगवान आबा गिरी महाराज यांना जयप्रकाश माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, रुईभर येथे भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

शिक्षण क्षेत्राविषयी विशेष आस्था असलेल्या महाराजांनी १९७९ मध्ये संस्थेला एक एकर जमीन दान देऊन परिसरातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी मोलाचे योगदान दिल्याचे यावेळी वक्त्यांनी सांगितले.



यावेळी त्यांच्या समाजसेवा, त्याग आणि शिक्षणप्रेमाचा गौरव करत त्यांच्या कार्यातून भावी पिढ्यांना प्रेरणा मिळत राहील, अशा भावना व्यक्त करण्यात आल्या.

कार्यक्रमास संस्थेचे अध्यक्ष शिक्षणमहर्षी सुभाषदादा कोळगे, रामदास आण्णा कोळगे, राजनारायण कोळगे, प्राचार्य जयप्रकाश कोळगे, प्रशासकीय अधिकारी शिवकन्या साळुंके, प्राचार्य संतोष कपाळे, मुख्याध्यापक नानासाहेब शेलार, पर्यवेक्षक काकासाहेब डोंगरे, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## ▶▶ संक्षिप्त वृत्त...



### मोफत मका बियाणांचे वाटप

**भूम, दि.८ जुलै -**

भूम तालुक्यातील ईट येथे जिल्हा परिषदेच्या जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत वैरण विकास कार्यक्रमातून पशुपालक व दुग्धउत्पादक शेतकऱ्यांना १०० टक्के अनुदानावर मोफत मका बियाणांचे वाटप करण्यात आले. ईटसह पांढरेवाडी, झेंडेवाडी, नागेवाडी, ज्योतिबाचीवाडी, पखरुड, आंद्रुड, निपाणी, माळेवाडी व लांजेश्वर येथील शेतकऱ्यांनी या योजनेचा लाभ घेतला. यावेळी राष्ट्रवादीचे युवा नेते सुनील देशमुख, गटनेते सयाजीराजे हुंबे, पशुधन विकास अधिकारी डॉ. सुरजकुमार गुळमीरे, डॉ. माझर पटेल यांच्यासह विविध मान्यवर, कर्मचारी व महिला शेतकरी उपस्थित होते.

### 'झुडूप खुरटे' कवितेचा विद्यापीठाच्या पदवी अभ्यासक्रमात समावेश

**धाराशिव, दि.८ जुलै -**

ज्येष्ठ कवी राजेंद्र अत्रे यांची गाजलेली 'झुडूप खुरटे' ही कविता डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा



विद्यापीठच्या बी.ए., बी.एस्सी. व बी.कॉम.च्या तृतीय वर्षाच्या मराठी विषयाच्या अभ्यासक्रमात जून २०२६ पासून समाविष्ट करण्यात आली आहे. या निवडीबद्दल साहित्य, शिक्षण व सामाजिक क्षेत्रातील विविध मान्यवरांकडून त्यांचे अभिनंदन होत आहे. याशिवाय नवीन शैक्षणिक धोरणानुसार इयत्ता तिसरी व चौथीच्या पाठ्यपुस्तकांत तसेच गोवा राज्याच्या इयत्ता सातवीच्या अभ्यासक्रमातही त्यांच्या कवितांचा समावेश करण्यात आला आहे. यापूर्वी त्यांच्या कविता इयत्ता पाचवी, सातवी आणि स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठच्या एम.ए. (मराठी) अभ्यासक्रमातही समाविष्ट झाल्या असून, राज्यातील विविध शालेय व विद्यापीठीय अभ्यासक्रमांत एवढ्या मोठ्या प्रमाणात कविता समाविष्ट होणारे कवी राजेंद्र अत्रे हे मोजक्या मराठी कवींमध्ये गणले जात आहेत.



### 'मास्टर शेफ' उपक्रम उत्साहात

**उमरगा, दि.८ जुलै -**

विद्यार्थ्यांमध्ये सर्जनशीलता, स्वावलंबन, आत्मविश्वास आणि आरोग्यदायी आहाराबाबत जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने पोदार जम्बो किड्स, उमरगा येथे 'मास्टर शेफ' कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. प्रमुख पाहुणे समीर शेख यांच्या उपस्थितीत झालेल्या कार्यक्रमात संस्थेच्या संचालिका संजीवनी आरगडे, सुषमा कोकरे, प्राचार्य बी.पी. सिंह, उपप्राचार्य अतुल फावडे, मुख्याध्यापिका विभावरी थिटे तसेच पालक, शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल शाळा प्रशासन, शिक्षक, पालक आणि विद्यार्थ्यांचे अभिनंदन करण्यात आले.



### येळीत महिला उद्योजकता कार्यक्रम

**उमरगा, दि.८ जुलै -**

टाटा कम्युनिकेशनच्या सहकार्याने राबविण्यात येणाऱ्या नैसर्गिक संसाधनांच्या विकासाद्वारे ग्रामीण समुदाय सक्षमीकरण प्रकल्पांतर्गत येळी येथे महिला उद्योजकता प्रशिक्षण कार्यक्रम उत्साहात पार पडला. गावातील १७ बचतगटांतील ८५ महिलांनी या प्रशिक्षणात सहभाग घेतला. कार्यक्रमात सास्तूर कार्यालयाचे खंडू पांढरे यांनी प्रकल्पाची माहिती दिली, तर धाराशिव जिल्हा आरोग्य विभागाच्या प्रमुख अधिकारी तथा संपदा ट्रस्टच्या सौ. उज्वला कवठेकर यांनी उद्योजकतेचे महत्त्व, व्यवसाय सुरू करण्यासाठी आवश्यक बाबी, उद्योगातील अडचणी व उपाययोजना याबाबत मार्गदर्शन केले. यानंतर श्री. चंदा टेकाळे यांनी महिलांना गटचर्चेद्वारे गावातील विद्यमान व संभाव्य व्यवसायांची माहिती घेण्यास प्रवृत्त केले. प्रशिक्षणामुळे महिलांमध्ये स्वयंरोजगार, उद्योग-व्यवसाय आणि आर्थिक स्वावलंबनाबाबत जागरूकता निर्माण झाली. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी गिरिजानंद बिराजदार व आशा धनुरे यांनी परिश्रम घेतले.

### तोहीद खान हत्याची चौकशी करा

**कळंब, दि.८ जुलै -**

परळी येथील तोहीद खान यांच्या हत्या प्रकरणाची विशेष तपास पथक मार्फत निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, या मागणीसाठी सकल मुस्लिम युवकच्या वतीने मुख्यमंत्र्यांच्या नावे उपविभागीय अधिकारी, कळंब यांना निवेदन देण्यात आले. निवेदनात सर्व आरोपींना तातडीने अटक करावी तसेच विशेष सरकारी वकिलाची नियुक्ती करण्याची मागणी करण्यात आली.

# भूममध्ये व्हे पावडर साठ्याचा पर्दाफाश

## सहा ब्रँडच्या ६१ गोण्या व्हे पावडर जप्त; अन्न सुरक्षा अधिनियमांतर्गत कारवाई

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.८ जुलै -**

अन्न सुरक्षा व मानके अधिनियमाचे उल्लंघन केल्याप्रकरणी भूम शहरातील मधुबन ट्रेडिंग कंपनीसह दूध संकलन केंद्र चालकांविरुद्ध भूम पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ५ जुलै २०२६ रोजी दुपारी ३.२० वाजण्याच्या सुमारास इंदिरानगर, भूम येथील मधुबन ट्रेडिंग कंपनी येथे अन्न व औषध प्रशासनाच्या पथकाने तपासणी केली. यावेळी वेगवेगळ्या




सहा ब्रँडच्या एकूण ६१ गोण्या व्हे पावडर व व्हे परमीएट पावडर (प्रत्येकी २५ किलो वजनाच्या) आढळून आल्या.

या प्रकरणी अन्न सुरक्षा अधिकारी रोहित दिनेश फंदी (वय २६) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून ७ जुलै २०२६ रोजी भूम पोलीस ठाण्यात मधुबन ट्रेडिंग कंपनीचे प्रोप्रायटर बाळासाहेब मधुकर गोडगे, हेमंत कॉर्पोरेशन (टेकेवाडा, अकलूज) येथील हेमंत टेके, धर्मराज शिंदे, गजानन कांबळे, काकासाहेब डोम्बळे, मेम्बीआई दूध संकलन केंद्राच्या प्रोप्रायटर पल्लवी गजानन कांबळे, ईश्वरी दूध संकलन केंद्राचे प्रोप्रायटर काशिनाथ आंबादास डोम्बळे तसेच इतर संबंधितांविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला आहे.


या प्रकरणी संबंधीता विरूद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास भूम पोलीस करीत आहेत.

## लग्नाचे आमिष दाखवून अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.८ जुलै -**

लग्नाचे आमिष दाखवून १७ वर्षीय अल्पवयीन मुलीवर वारंवार लैंगिक अत्याचार केल्याप्रकरणी बेंबळी पोलीस ठाण्यात आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहिता व पोक्सो कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, एका गावातील १७ वर्षे ८ महिने वयाच्या अल्पवयीन मुलीने (नाव व गाव गोपनीय) दिलेल्या फिर्यादीत, मागील सुमारे एक वर्षापासून गावातील एका तरुणाने लग्नाचे आमिष दाखवून



तिला आपल्या घरी नेले आणि तिच्यावर लैंगिक अत्याचार केल्याचा आरोप केला आहे.

पीडितेने ७ जुलै २०२६ रोजी दिलेल्या फिर्यादीवरून बेंबळी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला असून पुढील तपास पोलीस करीत आहेत.

## पोदार प्रेप धाराशिव येथे झुम्बा वर्कशॉप उत्साहात

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.८ जुलै -**

पोदार प्रेप धाराशिव येथे विद्यार्थ्यांसह पालक आणि शिक्षकांच्या सहभागातून उत्साही झुम्बा वर्कशॉपचे आयोजन करण्यात आले. प्रशिक्षकांनी झुम्बा डान्सच्या विविध शैलींचे मार्गदर्शन केले. सर्वांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेत शरीरसंचालनाचे महत्त्व अनुभवले.

यावेळी प्राचार्य वाल्मिक सोमासे यांनी अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये शारीरिक तंदुरुस्तीची आवड निर्माण होते, तसेच पालक-शिक्षकांचा सहभाग शाळेतील समुदाय अधिक दृढ करण्यास मदत करतो, असे सांगितले. मुख्याध्यापिका रेश्मा संकपाळ यांनी पालक व शिक्षकांचे आभार मानले. कार्यक्रमास उपप्राचार्य निलेश जाधव, कार्यकारी अधिकारी जीवन कुलकर्णी यांच्यासह शिक्षक, पालक व विद्यार्थी उपस्थित होते. झुम्बा वर्कशॉपचा उत्साहपूर्ण अनुभव सर्वांसाठी संस्मरणीय ठरला.

# नळदुर्गमध्ये लवकरच सैनिक शाळा सुरु होणार

### मधुकरराव चव्हाण यांची घोषणा...

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.८ जुलै -**

नळदुर्ग शहराला शिक्षण क्षेत्रात पुढे नेण्याच्या उद्देशाने बालाघाट शिक्षण संस्थेच्या महाविद्यालय परिसरात लवकरच सैनिक शाळा सुरू करण्यात येणार असल्याची घोषणा संस्थेचे अध्यक्ष तथा राज्याचे माजी मंत्री मधुकरराव चव्हाण यांनी केली.

ते महाविद्यालयातील कार्यक्रमात बोलत होते. यावेळी प्राचार्य डॉ. सुभाष राठोड, प्रा.डॉ. दीपक जगदाळे, कार्यालयीन अधीक्षक धनंजय पाटील यांच्यासह प्राध्यापक व कर्मचारी उपस्थित होते. मधुकरराव चव्हाण म्हणाले की, नळदुर्ग व परिसरातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाची संधी उपलब्ध करून देण्यासाठी कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाची स्थापना करण्यात आली. आज या महाविद्यालयात सुमारे तीन हजार



विद्यार्थी शिक्षण घेत असून एनसीसीमध्ये ५३ कॅडेट्स कार्यरत आहेत. त्यामध्ये ११ विद्यार्थिनींचा सहभाग ही अभिमानास्पद बाब असल्याचे त्यांनी सांगितले.

महाविद्यालय परिसरात आतापर्यंत साडेतीन हजार वृक्षांचे संगोपन करण्यात आले असून १ जुलै रोजी माजी मुख्यमंत्री स्व. वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त २५० केशर आंब्याच्या रोपांची लागवड करण्यात आल्याची माहितीही त्यांनी दिली. त्यामुळे महाविद्यालय परिसर हिरवागार झाला असून पर्यावरण संवर्धनाचा आदर्श निर्माण झाला आहे, असे ते म्हणाले.

नळदुर्गमध्ये नर्सरीपासून पदव्युत्तर (पीजी) शिक्षणापर्यंतची सुविधा एकाच परिसरात उपलब्ध करून देण्याचे संस्थेचे ध्येय असल्याचे सांगताना, ही योजना यशस्वी झाल्यास नळदुर्गमध्ये शैक्षणिक क्रांती घडेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

तसेच, तुळजापूर येथे सुरू असलेल्या सैनिक शाळेचा अनुभव लक्षात घेऊन नळदुर्गमध्येही सैनिक शाळा सुरू करण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. ही शाळा सुरू झाल्यास परिसरातील विद्यार्थ्यांना सैनिकी शिक्षणाची संधी मिळेल आणि संरक्षण दलासह विविध क्षेत्रांतील रोजगाराच्या संधी वाढण्यास मदत होईल, असेही चव्हाण यांनी सांगितले.

महाविद्यालयाच्या प्रगतीसाठी प्राचार्य, प्राध्यापक, कर्मचारी तसेच संस्थेचे संचालक बाबुराव चव्हाण यांच्या योगदानाचे त्यांनी कौतुक केले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना, विशेषतः मुलींना, दर्जेदार शिक्षण उपलब्ध करून देण्यासाठी संस्था सातत्याने कार्यरत असल्याचे त्यांनी नमूद केले.

## अतिक्रमण हटवून वाहतूक सुरळीत करा

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.८ जुलै -**



▶▶ सकल हिंदू समाजाचे निवेदन...

नळदुर्ग शहरातील अक्कलकोट रोड, बसस्थानकासमोरील परिसर आणि शहरात जाणाऱ्या मुख्य रस्त्यावरील अतिक्रमण तातडीने हटवून वाहतूक कोंडीची समस्या दूर करावी, अशी मागणी सकल हिंदू समाजाच्या वतीने नगरपालिकेचे मुख्याधिकारी रामकृष्ण जाधव यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

निवेदनात म्हटले आहे की, अक्कलकोट रोड व बसस्थानकासमोर मोठ्या प्रमाणात अतिक्रमण झाल्याने नागरिकांना रोजच मोठ्या गैरसोयींचा सामना करावा लागत आहे. या मार्गावर शाळकरी मुले-मुली, महिला, ज्येष्ठ नागरिक तसेच सर्वसामान्य नागरिकांची दिवसभर मोठ्या प्रमाणात वर्दळ असते. मात्र मासे विक्रेते, फळ विक्रेते, हातगाड्या तसेच रस्त्यावर ठेवण्यात आलेले साहित्य यामुळे रस्ता अरुंद झाला असून पादचाऱ्यांना सुरक्षितपणे चालणेही अवघड झाले आहे.

याशिवाय बसस्थानकासमोरील मुख्य रस्त्यावर चारचाकी व दुचाकी वाहने आडवी-तिडवी उभी केली जात असल्याने वारंवार वाहतूक कोंडी निर्माण होत आहे. परिणामी बस, रुग्णवाहिका, शालेय बस व इतर वाहनांना मार्ग काढताना अडचणी येत असून अपघाताचा धोका वाढला असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

संबंधित ठिकाणांची तातडीने पाहणी करून सर्व अतिक्रमणांवर नियमानुसार कारवाई करावी तसेच रस्त्यावर बेकायदेशीरपणे दीर्घकाळ वाहने उभी करणाऱ्यांवरही कठोर कारवाई करावी, अशी मागणी सकल हिंदू समाजाने केली आहे.

या निवेदनावर गणेश मोरडे, विजय ठाकूर, सुनील गव्हाणे आणि अजित भुमकर यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## भागवत गायकवाड यांचे निधन

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.८ जुलै -**

शहरातील बँक कॉलनी येथील माजी सैनिक तथा सेवानिवृत्त



सहायक पोलीस उपनिरीक्षक भागवत लक्ष्मण गायकवाड (वय ८७) यांचे मंगळवार ७ जुलै रोजी रात्री निधन झाले.

त्यांच्या पार्थिवावर बुधवारी दुपारी अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुले, मुली, नातवंडे असा परिवार आहे.

## धाराशिवात मंगल कार्यालयातील खोलीतून सोन्याचे मंगळसूत्र चोरी

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.८ जुलै -**

समर्थ मंगल कार्यालयातील खोलीत ठेवलेल्या पर्समधून सुमारे ५० हजार रुपये किमतीचे सोन्याचे मीन मंगळसूत्र चोरीला गेल्याप्रकरणी आनंदनगर पोलीस ठाण्यात एका महिलेविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अश्विनी हनुमंत शिंदे (वय २५, रा. मालेगाव, ता. बार्शी, जि. सोलापूर) या ७ जुलै २०२६ रोजी सकाळी ११ ते दुपारी १.३० वाजण्याच्या दरम्यान धाराशिव येथील समर्थ मंगल कार्यालयातील एका खोलीत होत्या. त्यावेळी त्यांच्या पर्समधील ५० हजार रुपये किमतीचे सोन्याचे मीन मंगळसूत्र चोरीला गेल्याची तक्रार त्यांनी दिली.

या प्रकरणी स्नेहा सुरेश क्षीरसागर (रा. शिंगोली, ता. जि. धाराशिव) यांनी मंगळसूत्र चोरल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. अश्विनी शिंदे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून आनंदनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस करीत आहेत.

## जिम साहित्याच्या नावाखाली पाच लाखांची फसवणूक

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.८ जुलै -**

जिमचे साहित्य पुरविण्याच्या नावाखाली पाच लाख रुपये घेऊन साहित्य न देता तसेच पैसेही परत न करण्याची धमकी दिल्याप्रकरणी तिघांविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

१२ जून रोजी हंगरगा रोड, प्रतीक्षा नगर, कृष्णा सोसायटी, तुळजापूर येथे फिर्यादी मंथन संतोष कदम (वय २७, रा. वेताळनगर, ता. तुळजापूर) यांनी जिमचे साहित्य खरेदी करण्यासाठी आरोपींना रोख व ऑनलाइन अशा माध्यमातून एकूण ५ लाख रुपये दिले. मात्र, रक्कम स्वीकारूनही आरोपींनी जिमचे साहित्य पुरविले नाही. या प्रकरणी शुभम गाडेकर (रा. जालना), प्रितम नेताजी केवडकर (रा. तुळजापूर) आणि अमित बाबुराव (रा. घायाळनगर, जालना) यांच्याविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

# नैसर्गिक शेती अभियानांतर्गत एकुरगा येथे सोयाबीन शेतीशाळेचा दुसरा वर्ग संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.८ जुलै -**

नैसर्गिक शेती अभियानांतर्गत उमरगा तालुक्यातील एकुरगा येथे सोयाबीन शेतीशाळेचा दुसरा वर्ग उत्साहात पार पडला. तालुक्यात अद्याप समाधानकारक पाऊस न झाल्याने सोयाबीनची पेरणी रखडली असल्याच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना पेरणीपूर्व तयारी, नैसर्गिक शेतीतील तंत्रज्ञान आणि पेरणीनंतरचे व्यवस्थापन याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.






तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक एम. यू. सय्यद यांनी जीवामृत, बीजामृत, घनजीवामृत तयार करण्याची पद्धत, त्यांचा प्रभावी वापर, जैविक आच्छादनाचे महत्त्व तसेच नैसर्गिक शेतीतील विविध जैविक निविष्ठांबाबत माहिती दिली. रासायनिक शेतीमुळे मातीतील सेंद्रिय कर्ब कमी होऊन जमिनीची जलधारण क्षमता घटते, तर नैसर्गिक शेतीमुळे मातीतील सूक्ष्मजीव वाढून सुपीकता आणि पाणी साठवून ठेवण्याची क्षमता सुधारते, असे त्यांनी सांगितले. कमी खर्चात शाश्वत शेतीसाठी नैसर्गिक शेतीचा अवलंब करण्याचे आवाहनही त्यांनी केले.

सहाय्यक तंत्रज्ञान व्यवस्थापक पी.बी. गर्जे पाटील यांनी बीबीएफ पद्धतीने सोयाबीन पेरणीचे महत्त्व स्पष्ट केले. या पद्धतीमुळे अतिरिक्त पाण्याचा निचरा, ओलावा संवर्धन, मुळांची चांगली वाढ आणि उत्पादनवाढीस मदत होत असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच जैविक निविष्ठांचा योग्य वापर आणि नैसर्गिक शेतीतील तांत्रिक बाबींवरही त्यांनी मार्गदर्शन केले.

या शेतीशाळेत शेतकऱ्यांना प्रत्यक्ष कृतीद्वारे जैविक निविष्ठा तयार करण्याचे प्रशिक्षण दिले जाणार असून, त्यांचा स्वतःच्या शेतात वापर करून नैसर्गिक शेतीचा अवलंब करण्यासाठी प्रोत्साहन दिले जात आहे.

कार्यक्रमास प्रगतिशील शेतकरी किशोर करके, कृषी सखी शुभांगी करके, जेकेकुर येथील कृषी सखी नीता जाधव, प्रगतिशील शेतकरी माधव जाधव तसेच परिसरातील अनेक शेतकरी उपस्थित होते. उपस्थितांनी विविध शंकांचे निरसन करून नैसर्गिक शेतीतील तंत्रज्ञान प्रत्यक्ष शेतात राबविण्याबाबत उत्सुकता व्यक्त केली.

तालुका कृषी अधिकारी डी.बी. रीतापुरे यांच्या मार्गदर्शनाखाली उमरगा तालुक्यातील दावल मलिकवाडी, जेकेकुर आणि जवळगा बेट येथे सोयाबीन शेतीशाळा नियमितपणे सुरू असून, नैसर्गिक शेती, जैविक निविष्ठा निर्मिती, आधुनिक शेती तंत्रज्ञान आणि पीक व्यवस्थापनाचे प्रत्यक्ष प्रशिक्षण दिले जात आहे. या उपक्रमामुळे कमी खर्चात, पर्यावरणपूरक आणि शाश्वत शेतीकडे शेतकऱ्यांचा कल वाढत असल्याचे कृषी विभागाने सांगितले.